TM

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

नोंदणी क्र. एफ.१६०१४(मुंबई)

सत्यमेव जयते

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई – ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

राज्य मराठी विकास संस्था, मुंबई ही महाराष्ट्र शासनाने स्थापन केलेली स्वायत्त संस्था आहे. मराठी भाषा विभागाच्या पत्राप्रमाणे (संदर्भ क्र. मसंस २०१६/प्र.क्र.११५/२०१६/भाषा-२, दि. ३ जानेवारी, २०१७) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे '**महाराष्ट्रातील मराठी संशोधन मंडळ/ संस्थांना अर्थसाहाय्य योजना**' कार्यान्वित करण्यात आली असून या योजनेअंतर्गत महाराष्ट्रातील मराठी भाषा, साहित्य व संस्कृती वृद्धिंगत होण्यासाठी काम करणाऱ्या महाराष्ट्रातील मान्यताप्राप्त मंडळ/ संस्थांना अर्थसाहाय्य करण्यात येते.

सदर प्रकल्पांतर्गत प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई यांना राज्य मराठी विकास संस्थेद्वारे नवभारत मासिकांचे ऑक्टोबर १९४७ ते सप्टेंबर २०१७ पर्यंतच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासाठी अर्थसाहाय्य करण्यात आले होते. याअंतर्गत सदर अंकांचे संगणकीकरण करण्यात आले असून **प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई यांनी हे अंक जतन केलेले असल्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत**.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.


वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर असणार नाही.

वर्ष ३६ / अंक आठवा

मे १९८३

नवभारत



अनुक्रमणिका

अनुक्रमणिका



महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ पुरस्कृत
व प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई संचालित मासिक

नवभारत

वर्ष ३६ । अंक ८ । मे १९८३
किंमत ४ रुपये । वार्षिक वर्गणी ३० रुपये

संपादक
मे. पुं. रेगे

संपादकीय पत्रव्यवहार :
मे. पुं. रेगे,
संपादक, ' नवभारत ' मासिक,
द्वारा : प्राज्ञपाठशाळा मंडळ,
वाई–४१२ ८०३ (जि. सातारा)

व्यवस्थापकीय पत्रव्यवहार :
श्री. ग. दीक्षित,
व्यवस्थापक, ' नवभारत ' मासिक,
द्वारा : दी प्राज्ञ प्रेस, वाई–४१२ ८०३.
(जि. सातारा)

नवभारत

मे १९८३

अनुक्रम

लेखक-परिचय

★ **अनिरुद्ध कुलकर्णी :** कवी, चिकित्सक लेखक व कॉन्टिनेन्टल प्रकाशनचे मालक, विजयानगर कॉलनी, पुणे–४११ ०३०. ★ **शरद् पाटील :** मार्क्सवादी विचारवंत, लेखक व राजकीय–सामाजिक कार्यकर्ते; असंतोष, वाडी–भोकर रस्ता, धुळे–४२४ ००२. ★ **व. त्रिं. चिपळोणकर :** निवृत्त प्राध्यापक, भौतिकी विभाग, इन्स्टिटयूट ऑफ सायन्स, मुंबई; फ्लॅट नं. १०६, अभिनव अपार्टमेंट, ६९९ नवी पेठ, पुणे–४११ ०३०. ★ **अशोक चौसाळकर :** अधिव्याख्याता, राज्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर ४१६ ००४. ★ **किशोर भिडे :** एस. एन. डी. टी. कॉलेज पुणे येथे इंग्रजीचे प्राध्यापक, ११२० सदाशिव पेठ, निंबाळकर तालीम चौक, पुणे ४११ ०३०. ★ **टी. आर. भोसले :** मराठीचे प्राध्यापक, लालबहाद्दूर शास्त्री कॉलेज, सातारा.

संपादकीय

मार्क्सवादाचा हिशोब

मार्क्सवादाचा ताळेबंद कसा मांडता येईल ? तत्त्वज्ञान किंवा समाजशास्त्र किंवा अर्थशास्त्र इ. शास्त्रांचे पंडित म्हणून नव्हे, तर आजच्या युगात जगणारी सर्वसामान्य माणसे म्हणून आपण हा हिशोब केला तर मार्क्सवादापासून झालेल्या नफ्यातोटयाचे स्वरूप कसे दिसेल ? हा हिशोब करणे दोन कारणांसाठी योग्य आणि आवश्यक आहे. एक तर मार्क्सवाद ही व्यवहारात उतरलेली तत्त्वप्रणाली आहे. ती केवळ पंडित आणि विचारवंत याच्यापुरती मर्यादित राहिलेली नाही. कांट आणि हेगेल यांचे तत्त्वज्ञान हे कितीही प्रभावशाली ठरले, तरी ते विचारांचे नियमन करणारे तत्त्वज्ञान होते. ज्या अर्थाने मार्क्सवाद सामाजिक व्यवहारात उतरला, त्या अर्थाने ते कधी उतरले नाही. ह्या दृष्टीने मार्क्सची बेन्थॅम आणि मिल यांच्याशी तुलना करता येईल. त्यांचे तत्त्वज्ञानही सामाजिक कृतीची योग्य उद्दिष्टे आणि ती साधण्याची योग्य पद्धती निश्चित करणारे तत्त्वज्ञान होते; म्हणजे व्यवहाराचे नियमन करू पाहणारे तत्त्वज्ञान होते. 'तत्त्ववेत्त्यांनी फक्त जगाचा अर्थ लावला आहे, पण खरे काम आहे ते जग बदलण्याचे आहे' हे मार्क्सचे सूत्र बेन्थॅम आणि मिल यांना, विशेषतः बेन्थॅमला मान्य झाले असते.

जग बदलणे हे तत्त्ववेत्त्याचे खरे काम आहे, केवळ सत्य शोधून काढणे हे नव्हे हे जर खरे असेल तर मार्क्स हा आधुनिक काळातील सर्वश्रेष्ठ तत्त्ववेत्ता आहे असे म्हणावे लागेल. कारण मार्क्सने जग बदलले, भौतिक जग बदलले आणि वैचारिक जगही बदलले. आज अर्धे जग मार्क्सवादी जग आहे. आजच्या जगाला भेडसावणारी जी पिशाच्चे आहेत त्यांतील सर्वांत भीतिदायक पिशाच्च म्हणजे अणुयुद्धाचे. अणुयुद्ध झाले तर ते मार्क्सवादी जग आणि पाश्चात्त्य 'लोकशाही' जग यांच्यांत होईल. पण ते मार्क्सवादी जगाच्या दोन विभागांत होणार नाही असेही नाही. चीनची अणु-शस्त्रे कशासाठी, कोणाविरुद्ध आहेत ? ती रशियाविरुद्ध आहेत का ? की आशियात मार्क्सवादी क्रांती फैलावण्यासाठी आहेत ? चीनची अणु-शस्त्रे व्हिएतनामला कशी दिसतात ? की एक बलाढ्य देश म्हणून अणु-शस्त्रांचा संभार धारण करण्याचा चीनला स्वाभाविक अधिकार आहे म्हणून चीन त्यांची निर्मिती करीत आहे ? निष्ठावान मार्क्सवाद्याला घोटाळ्यात टाकणारे हे प्रश्न आहेत.

मार्क्सच्या भाकिताप्रमाणे कुठे क्रांती झाली नाही, तरी मार्क्सवादी संघटित पक्षांनी अनेक तुलनेने मागासलेल्या देशांत साम्यवादी समाजव्यवस्था निर्माण करण्यासाठी क्रांती घडवून आणली. दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीच्या वेळी पूर्व यूरोपात जेथपर्यंत लाल फौजा येऊन थडकल्या, तेथपर्यंतच्या देशांत सत्तेवर आलेले साम्यवादी पक्ष जनतेने उत्स्फूर्तपणे केलेल्या उठावाचे नेतृत्व करून सत्तेवर आले असे फक्त साधेभोळे मार्क्सवादी मानतील. चाणाक्ष मार्क्सवादी असे म्हणतील, की रशियात दृढमूल झालेल्या समाजवादी क्रांतीमुळे आंतरराष्ट्रीय भांडवलदारवर्ग आणि आंतरराष्ट्रीय कामगारवर्ग यांच्या परस्परामधील बळाचा कामगारवर्गाकडे झुकणारा जो नवीन तोल निर्माण झाला होता, त्याचे फळ म्हणून पूर्व यूरोपातील क्रांतीकडे पाहिले पाहिजे. साध्या भाषेत ही रशियाने व लाल फौजेने लादलेली क्रांती होती. अर्थात साम्यवादी पक्ष सत्तेवर आल्यानंतर ह्या देशांत जे उठाव झाले—हंगेरीत, पूर्व जर्मनीत, पोलंडमध्ये— ते जनतेचे नव्हते, ते प्रतिक्रांतिकारक होते. पण हा प्रश्न बाजूला सारू.

अनुक्रमणिका

रशियात, चीनमध्ये, क्यूबा आणि व्हिएतनाम या देशांत साम्यवादी पक्षाने उठाव करणाऱ्या जनतेचे नेतृत्व करून क्रांती घडवून आणली यात शंका नाही. आपल्यापुढील प्रश्न असा आहे, की ह्या क्रांतीचे फलित काय ? रशियातील क्रांती मार्क्सच्या भाकिताप्रमाणे झाली नाही, म्हणजे उत्पादन-साधनांची प्रचंड वाढ झाली आहे पण थोडे भांडवलदार सोडले तर उरलेल्या समाजाला व्यापून राहिलेला कामगारवर्ग अतिशय गरीब आहे व म्हणून मालाला उठाव नाही आणि उत्पादन कुंठित झाले आहे या परिस्थितीत घडून आलेली ती क्रांती नव्हती. आणि म्हणून क्रांतीनंतर उत्पादनावरील भांडवलदारांच्या वर्गीय स्वार्थाने लादलेली बंधने दूर झाली, केवळ जनतेच्या गरजा आणि इच्छा यांचे समाधान करण्यासाठी भरघोस उत्पादन सुरू झाले असा काही प्रकार घडला नाही. साम्यवादी पक्षाला नियोजन करून उत्पादनसाधने निर्माण करावी लागली. म्हणजे साम्यवादी पक्षाने सर्वंकष अशा सामाजिक अभियांत्रिकीचा (सोशल इंजिनिअरिंग) वापर करून समाजवादी समाजाची घडण करायला सुरुवात केली. मार्क्सच्या अधिकृत सिद्धांताच्या चौकटीत हा कार्यक्रम बसत नव्हता. मार्क्सने फॉएर-बाखवर जी विचारसूत्रे रचली आहेत, त्यांतील एका सूत्रात त्याने ' युटोपिअन ' समाजवाद्यांचा नेमका या कारणासाठी निषेध केला होता. मार्क्सचे म्हणणे थोडक्यात असे आहे, की युटोपिअन समाजवादी स्वतःला शहाणे मानतात, समाजाला अडाणी मानतात, ते सत्प्रवृत्त असतात, समाजाचे भले कशात आहे ह्याचे ज्ञान आपल्याला आहे असा त्यांचा ठाम विश्वास असतो आणि त्याला अनुसरून ते समाजाला आकार देऊ पाहतात. ते कारागीर असतात आणि समाज कच्ची सामग्री असते.

समाजाचे असे विभाजन मार्क्सला अमान्य आहे. समाजवादी क्रांतीचे नेतृत्व साम्यवादी पक्षाने केले तरी क्रांतीचा उपक्रम कामगारवर्गाचा म्हणजे भांडवलशाहीच्या अखेरच्या अवस्थेत सर्वसाधारण जनतेचा असला पाहिजे ही मार्क्सची धारणा होती. कारण साम्यवादी क्रांतीचे खरे उद्दिष्ट माणसाला त्याच्या मूळच्या निरामय प्रकृतीचा परत लाभ करून देणे हे असते. माणूस विषयी (सब्जेक्ट) आहे, विषयी असणे ही माणसाची प्रकृती आहे आणि कृतिशीलता हे, मार्क्सच्या मताप्रमाणे, विषयी असण्याचे सार आहे. म्हणजे स्वतःच्या उत्स्फूर्त कृतिद्वारा स्वतःच्या प्रकृतीचा बाह्यविश्वात आविष्कार करण्यात माणसाची माणुसकी, त्याचे स्वत्व असते. माणूस जर केवळ दुसऱ्याच्या कृतीचा विषय झाला, दुसरे ज्याला घडवितात, आकार देतात अशी सामग्री म्हणून माणूस जगू लागला तर तो आपले स्वत्व गमावून बसला आहे असा त्याचा अर्थ होईल. किंवा माणूस जी कृती करतो ती दुसऱ्या कुणी लादल्यामुळे करीत असला तरी त्याने आपले स्वत्व गमावले आहे असे होईल. कामगारांवर लादण्यात येणारी गरिबी हे भांडवलशाहीचे खरे पाप नाही. तर स्वतःचा मुक्तपणे आविष्कार करणारी व्यक्ती हे माणसाचे स्वरूप हिरावून घेऊन स्वतःची श्रमशक्ती विकून गुजराण करणारी व्यक्ती हे स्वरूप भांडवलशाही त्याला देते हे तिचे खरे पाप आहे. मुक्तपणे, स्वायत्तपणे जगणारी व्यक्ती ह्या माणसाच्या स्वरूपाची पुनःस्थापना करणे हे समाजवादी क्रांतीचे मुख्य उद्दिष्ट असते. सामाजिक अभियांत्रिकीने साधता येईल असे हे उद्दिष्ट नाही. आस्तिक माणसाला ईश्वराच्या काही लीला कुंठित करतात आणि त्या दृष्टिआड करणे त्याच्या दृष्टीने सोयीचे असते. काही सामाजिक घटनांच्या बाबतीत निष्ठावान मार्क्सवाद्याची अशीच स्थिती असते.

पण मार्क्सवादाने केवळ भौतिक जग बदलले असे नव्हे, म्हणजे केवळ जगाची राजकीय, सामाजिक, आर्थिक रचना बदलली असे नव्हे. त्याने आपली विचार करण्याची पद्धतीही बदलली. जशी ती फ्रॉइडने बदलली. फ्रॉइडचे विशिष्ट सिद्धांत आपल्याला मान्य असतील, नसतील, किंवा नीटसे माहीतही नसतील. पण फ्रॉइडमुळे माणसांना मानवी कृत्यांकडे आणि स्वभावाकडे पाहण्याची, इतरांच्या आणि स्वतःच्या कृत्यांकडे, हेतूंकडे पाहण्याची एक नवीन दृष्टी मिळाली. ज्या वैचारिक वातावरणात आपण जगतो त्याच्यात फ्रॉइडचे सिद्धांत नसले तरी फ्रॉइडची मर्मदृष्टी (इन्साइट) मिसळलेली

आहे. मार्क्सचेही तसेच आहे. सामाजिक वास्तवाकडे, समाजरचना आणि सामाजिक घटना यांच्याकडे, समाजावर प्रभुत्व गाजविणाऱ्या विचारप्रणालींकडे पाहण्याची एक वेगळी दृष्टी मार्क्सपासून आपल्याला मिळाली. एका दृष्टीने पाहता फ्रॉइड आणि मार्क्स हे दोघेही निराशावादी आहेत. दोघांचाही सारभूत संदेश असा, की माणसांना स्वतःच्या कृत्यांचा खराखुरा अर्थ, त्यांची खरीखुरी उद्दिष्टे त्यांच्यापासून दडलेली असतात, ती त्यांना समजलेली नसतात. अज्ञान हे काही प्रमाणात उपकारक असते कारण माणसाचा दंभ त्याच्यावर आधारलेला असतो आणि ह्या दंभामुळे माणूस समाधानाने जगू शकतो व जोमदार कृती करू शकतो. पण ह्या अज्ञानामुळे माणूस विकृत आणि कुंठित बनू शकतो. ह्या अवस्थेवर एकच खराखुरा उपाय आहे. तो म्हणजे माणसाने आत्मज्ञान प्राप्त करून घेणे, आपल्या कृत्यांचे खरे स्वरूप ओळखणे. 'तुम्ही सत्य जाणाल आणि सत्य तुम्हाला मुक्त करील.' पण ह्यानंतर फ्रॉइड व मार्क्स यांचे मार्ग भिन्न होतात. मार्क्स मूलतः धार्मिक व म्हणून आशावादी आहे. माणसाचे आत्मज्ञान म्हणजे माणूस ज्या इतिहासाची निर्मिती व वाहक आहे त्याच्या नियामक तत्त्वांचे ज्ञान. ह्या तत्त्वांना अनुसरून उलगडत जाणारा इतिहास परिपूर्ण मानवी समाजाच्या निर्मितीत फलद्रूप होणार आहे. इतिहासाच्या ह्या साररूप आणि दडलेल्या तत्त्वांचे ज्ञान झाले की माणूस त्यांच्याशी तादात्म्य पावून स्वतःला इतिहासाचे साधन बनवू शकतो आणि माणूस म्हणून स्वतःचे साफल्य साधू शकतो. फ्रॉइड अधार्मिक व म्हणून निराशावादी आहे. माणसाला आत्मज्ञान झाले, त्याच्या दडलेल्या खऱ्या प्रेरणांचे स्वरूप उघड झाले की त्यांना काबूत ठेवणे आणि विवेकाशी त्यांचा मेळ राखणे हे काम माणसाला स्वतःच्या हिंमतीवर करावे लागते. बुद्ध आणि मार्क्स यांचा समन्वय साधण्याचे प्रयत्न आपल्या परिचयाचे आहेत. कदाचित बुद्धाचे खरे नाते फ्रॉइडशी असेल. शोपेनहॉर हा त्यांच्यामधील दुवा असेल.

ते काहीही असो, मार्क्सवादी दृष्टी आजच्या बौद्धिक वातावरणात मिसळलेली आहे यात शंका नाही. एक सुव्यवस्थित विचारसरणी ह्या स्वरूपात मार्क्सवाद घेतला तर जे मार्क्सवादाचे प्रामाण्य नाकारतात तेसुद्धा मार्क्सवादी दृष्टीने अनेक सामाजिक घटनांकडे पाहू शकतात आणि पाहतात. याचे एक गमक म्हणजे आज सामाजिक शास्त्रात रूढ असलेली आणि सर्वसामान्य सुशिक्षितांच्या बोलण्यात उतरलेली परिभाषा. बौद्धिक क्षेत्रात मार्क्सने आपली सूक्ष्म, अदृश्यप्राय पण अतिशय चिवट अशी अधिसत्ता (हेजिमनी) प्रस्थापित केली आहे.

वैज्ञानिक प्रामाण्याचा दावा करणारी समाजशास्त्रीय उपपत्ती (थिअरी) म्हणून मार्क्सवादाकडे पाहिले तर सामाजिक क्रांतीविषयी मार्क्सने केलेली सर्व भाकिते चूक ठरली आहेत. मार्क्सला अभिप्रेत असलेली सामाजिक क्रांती कुठेच घडून आली नाही. भांडवलशाही देशात, उदा. मार्क्सच्या डोळ्यापुढे असलेल्या इंग्लंडमध्ये कामगारवर्ग अधिकाधिक गरीब होत गेला, अधिकाधिक संपन्न होत जाणाऱ्या भांडवलदारवर्गाचा संकोच होत गेला, मधले सर्व वर्ग कामगारवर्गात विलीन होत गेले, उत्पादन कुंठित झाले आणि क्रांती घडून आली असे कुठेच झाले नाही. भांडवलशाही देशांत कामगारांची आर्थिक स्थिती सुधारत गेली. अमेरिका आणि पश्चिम युरोप या प्रदेशांतील आजचा सुखवस्तू कामगार आणि मार्क्सने चित्रित केलेला भांडवलशाहीच्या प्रगतीबरोबर दारिद्र्याच्या खाईत अधिकाधिक खचत जाणारा कामगार यांच्यात जमीनअस्मानाचा फरक आहे. प्रगत देशातील आजच्या कामगाराच्या रक्ताचे शोषण भांडवलशाही जळवा अजून करीत असतीलही; पण तो लालबुंद दिसावा इतके रक्त त्याच्या धमन्यांतून खेळताना दिसते.

भांडवलशाही समाजावर गंभीर आक्षेप घेता येणार नाहीत असा ह्याचा अर्थ नाही. आर्थिक चक्राच्या फेऱ्यांतून उद्‌भवणारी मंदी, चलनवाढ, त्यांच्या धास्तीमुळे निर्माण होणारी अस्थिरतेची, असुरक्षिततेची भावना ह्या दोषांवर भांडवलशाही व्यवस्थेला अजून इलाज सापडलेला नाही. दुसऱ्या

महायुद्धानंतरच्या दोन दशकांत अमेरिकन भांडवलशाहीची आर्थिक कामगिरी डोळ्यात भरण्याइतकी यशस्वी होती आणि तरीही हा डोलारा कधी कोसळेल ह्याची शाश्वती नाही ही भीती भांडवलशाहीच्या धुरीणांच्या वक्तव्यांतून सतत डोकावते असे गॉल्ब्रेथ यांनी दाखवून दिले आहे. भांडवलशाही व्यवस्थेला आवश्यक असलेला लवचिकपणा टिकवून धरण्यासाठी अमूक इतके टक्के माणसे बेकार राखावी लागतात असे दिसत आहे आणि ह्या बेकारांना कितीही भत्ता आणि सुखसोयी दिल्या तरी त्यांचे हे जिणे मानवी प्रतिष्ठेशी सुसंगत आहे असे म्हणता येणार नाही. एकंदरीत संपन्न असलेल्या भांडवलशाही समाजात कुठेकुठे दारिद्र्याची बेटे टिकून राहिलेली किंवा निर्माण झालेली दिसतात. हे दारिद्र्य भारतीय दारिद्र्याइतके भौतिक दृष्टया भयानक नसले तरी माणुसकीला कोलमडून पाडायला लावणारे ते दारिद्र्य असते.

पण ह्या तांत्रिक समस्या, आर्थिक व्यवस्थापनाविषयीच्या समस्या आहेत. आणि आर्थिक प्रक्रियांविषयीचे ज्ञान वाढत जाईल व चोख होत जाईल तशा त्या सोडविण्याचे मार्ग उपलब्ध होत जातील असे म्हणता येईल. पण भांडवलशाही समाजव्यवस्थेवर गंभीर नैतिक आक्षेप घेता येतील. व्यक्तीचा स्वार्थ आणि स्पर्धा या प्रवृत्तींवर आधारलेली ही व्यवस्था आहे. आणि म्हणून या प्रवृत्तींना ती सतत जोपासत असते. व्यक्तिजीवनाचे यश तिच्या आर्थिक उत्पन्नाच्या मानदंडाने मापायचे असते, हा या व्यवस्थेचा आधारभूत सिद्धांत असतो. उत्पादनाचे रहाटगाडगे चालू ठेवण्यासाठी उत्पादित मालाला असणारी मागणी टिकवून धरावी लागते. यासाठी लोकांच्या खिशांत ह्या ना त्या मार्गाने पैसे घालणे जसे आवश्यक असते, तसेच वस्तू विकत घेण्यासाठी त्यांना प्रवृत्त करणेही आवश्यक असते. आणि म्हणून लोकांची भोगलालसा सतत तेवत ठेवावी लागते. व्यक्तीची प्रतिष्ठा, माणसाच्या व्यक्तित्वाची, सर्जनशीलतेची कदर, माणसांचा एकमेकांविषयीचा स्नेहभाव, नैसर्गिक परिसराशी माणसांचे असलेले भावनिक अनुबंध या मूल्यांना वैयक्तिक आणि सामाजिक जीवनात मध्यवर्ती स्थान लाभत नाही. सर्वच गोष्टींचे–माणसांमधील नात्यांचेसुद्धा–मूल्य पैशाच्या हिशोबाने ठरविले जाते. भांडवलशाही व्यवस्थेत जगणाऱ्या माणसाची धारणाच अशी बनावी असा तिचा रेटा असतो.

ह्या आरोपांत खूपच तथ्य आहे; पण हे खास मार्क्सवादी भूमिकेतून घेतलेले आरोप आहेत असे म्हणता येणार नाही. हे नैतिक आरोप आहेत आणि काही विशिष्ट मानवी मूल्यांविषयी बांधीलकी असलेली कुणीही व्यक्ती ते करील. उदा. गांधीवादी हे आरोप करतील. आपला मर्यादित मुद्दा असा, की भांडवलशाही व्यवस्थेच्या अटळ भवितव्याविषयी मार्क्सने केलेले भाकित खरे ठरलेले नाही. पण काल निरवधी आहे आणि अजूनही ते खरे ठरेल असे मार्क्सवादी म्हणू शकतील आणि अजून ते का खरे ठरले नाही ह्याचे मार्क्सवादी सिद्धांतांना अनुसरून स्पष्टीकरण करू शकतील. पण ह्याचा अर्थ एवढाच, की मार्क्सवादी सिद्धांतांकडे ते कोणत्याच परिस्थितीत असत्य ठरू शकणार नाहीत अशा दृष्टीने सच्चे मार्क्सवादी पाहतात. ईश्वरी कृपेवर आस्तिक मंडळींची श्रद्धा असते. इष्ट गोष्टी घडतात तेव्हा ईश्वरी कृपेचा पुरावा म्हणून सरळ त्यांचा निर्देश करता येतो. अनिष्ट गोष्टी घडतात तेव्हा हा ईश्वराच्या निष्ठुरतेचा किंवा औदासिन्याचा पुरावा आहे असे कुणी म्हणत नाही. ह्या अनिष्टातून पुढे काहीतरी इष्ट निष्पन्न होणारच, धीर धरा, श्रद्धा सोडू नका, ईश्वर परीक्षा पाहत आहे असे सांगण्यात येते. मार्क्सवाद्यांच्या श्रद्धेचेही असेच आहे. मार्क्सवादी सिद्धांतांना अनुसरून खऱ्या ठरलेल्या भाकितांत त्यांना ह्या सिद्धांताच्या सत्यतेचा पडताळा येतो. पण जी भाकिते खरी ठरली नाहीत ती (अजून) का खरी ठरली नाहीत याचे स्वतःला समाधानकारक ठरेल अशा रीतीने स्पष्टीकरण करण्यानेही त्यांची मार्क्सवादी सिद्धांतांवरील श्रद्धा बळकटच होते.

समाजवादी समाजाचे साम्यवादी पक्ष आणि नोकरशाही हे जे अभियंते आहेत त्यांचा मिळून मार्क्सच्या अर्थाने एक वर्ग होतो की नाही हा मार्क्सवाद्यांपुढील घरगुती कूटप्रश्न आहे. पण तो समाज-

वादी समाजातील, उदा. सोव्हिएट समाजातील सत्ताधीश गट आहे हे निर्विवाद आहे. हा श्रेष्ठींचा, अभिजनांचा गट आहे. असा श्रेष्ठींचा गट आर्थिक नियोजन करून समाजाचा आर्थिक विकास घडवून आणू शकतो, फारसे घोटाळे न करता उत्पादनाचे चक्र फिरते ठेवू शकतो, लोकांना शिस्त लावून, वेगळया मूल्यांना साजेशा सवयी त्यांना जडवून लोकांच्या मनोवृत्तीला इष्ट ते वळण काही प्रमाणात देऊ शकतो हे सोव्हिएट प्रयोगाने सिद्ध केले आहे. म्हणजे सर्वंकष सामाजिक नियोजनाचा कार्यक्रम व्यवहार्य आहे हे ह्या प्रयोगाने सिद्ध केले आहे. हे प्लेटोचे स्वप्न होते. प्लेटोपुढेही आदर्श समाजाचा एक आराखडा होता. पण ह्या आराखडयाबरहुकूम समाजाची पुनर्रचना करण्याच्या कामाची सुरुवातही तो करू शकला नाही. प्लेटोचा पालकवर्ग साम्यवादी पक्षाच्या स्वरूपात अवतीर्ण झाला आहे.

पण सामाजिक जीवनाच्या सर्व अंगांवर, सर्व सामाजिक संस्थांवर जबरदस्त नियंत्रण लादल्या-शिवाय हा कार्यक्रम अंमलात आणता येत नाही हेही सिद्ध झाले आहे. हे नियंत्रण किती अमानुष असू शकते ह्याचे उदाहरण स्टालिनच्या कारकीर्दीत लाभते.

जे भांडवलशाहीला विटतात त्यांतील अनेक साम्यवादाकडे वळतात. जे साम्यवादाकडे वळतात, स्टालिनशाहीचे स्थिरपणे अवलोकन करतात आणि तिला पचवू शकतात ते काय पचवू शकणार नाहीत ? ते स्टालिनशाहीला पचवू शकतात ह्याचा अर्थ असा, की त्यांची अशी खात्री असते की आपण स्टालिनच्या कारकीर्दीत रशियात असतो, तर आपले स्थान स्टालिनने शिरकाण न केलेल्या पोलिटब्यूरोच्या सदस्यांत असते, कॉन्सन्ट्रेशन कँपमध्ये नसते.

स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक निधि-संकलन अभियान

दिनांक २६-२-१९८३ ते दिनांक २८-५-८३

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर म्हणजे भारताच्या आधुनिक इतिहासातील एक चमत्कारच. या महापुरुषाच्या व्यक्तिमत्त्वाला इंद्रधनुष्यासारखे अनेक रंग, नाना पैलू होते. सारेच तेजस्वी नि मोहक ! उत्कृष्ट देशभक्त, जहाल क्रांतिकारक, ज्वालाग्राही गद्यलेखक, कुसुमकोमल कवी, थोर नाटककार, ओजस्वी इतिहासकार, शतसहस्रेषु वक्ता, तत्त्वांबाबत तडजोड न करणारा राज-कारणी आणि खंदा समाजसुधारक असा पुरुष आपल्या भूमीत होऊन गेला, हे भावी पिढयांना कदाचित खरेसुद्धा वाटणार नाही ! या महापुरुषाचा जन्मदिन २८ मे १८८३. यंदा शंभर वर्षे होतात. म्हणून १९८३-८४ हे वर्ष सावरकर जन्मशताब्दी-संवत्सर म्हणून साजरे करण्यात येणार आहे.

बलसंपन्न भारत हे होते स्वातंत्र्यवीरांचे स्वप्न. हुशार, बलदंड तरुणांनी सैन्यदलांत जाऊन देशाची सेवा करावी, हा त्यांचा सततचा संदेश असे. महाराष्ट्र भारताचा "खड्गहस्त" व्हावा अशी त्यांची इच्छा होती. सैनिकदृष्टया आपण दुर्बल नि गाफील राहीलो, तर आपल्यावर परकियांची आक्रमणे होत राहातील, हे या भविष्यदर्शी पुरुषाने ओळखले होते. म्हणूनच प्रथम आपल्या देशाच्या सीमा तपासा व शत्रूच्या छातीत धडकी भरेल असे सैनिकी सामर्थ्य उभारा, असे त्यांनी स्वातंत्र्य मिळताच सांगितले. त्यांचा संदेश मानला असता, तर अर्धा काश्मीर पाकिस्तानच्या घशात गेला नसता, १२ हजार चौरस मैलांची भूमी माओच्या चीनने गिळली नसती व ६२ सालच्या नामुष्कीचा प्रसंग आपल्यावर आला नसता.

एकात्म हिंदुसमाज हे सावरकरांचे ध्येय होते. सर्व समाज एका पातळीवर यावा, त्यात श्रेष्ठ-कनिष्ठ, स्पृश्य-अस्पृश्य असा भेद राहू नये यासाठी त्यांनी अनेक उपक्रम केले. सहभोजन, दलित दांपत्याच्या हस्ते सत्यनारायणाची पूजा हे त्यांपैकीच काही. पण रत्नागिरीत कै. भागोजीशेट वीर यांच्या सहकार्याने त्यांनी उभारलेले पतित पावन मंदिर हे त्यांच्या विचाराचे मूर्त स्वरूप मानावे लागेल. जेथे गाभाऱ्यांत जाऊन देवाच्या पायांना स्पर्श करण्यास अस्पृश्यांना मुभा आहे, असे हे भारतातले पहिलेच मंदिर ! त्यांचे अस्पृश्यता निवारण्याचे कार्य पाहिल्यावर महर्षि विठ्ठल रामजी शिंदे उद्गारले, "खरोखर, या महापुरुषाने देशावर करून ठेवलेल्या ऋणांची मोजदाद करणेही अशक्य ठरेल. माझे उर्वरित आयुष्य ईश्वराने सावरकरांना द्यावे."

स्वातंत्र्यवीरांच्या निधनानंतर मुंबईत त्यांचे उचित स्मारक करण्याचे ठरले. त्यासाठी स्मारक-समितीही स्थापन झाली. मुंबई महापालिकेने शिवाजी उद्यानाच्या मागे एक मोक्याची जागा स्मारका-साठी दिली आहे. समितीने स्मारकाची योजना अनेक तज्ज्ञांच्या सहकार्याने बनविली असून तिचा पहिला टप्पा जन्मशताब्दिवर्षात पूर्ण करण्याच्या निर्धाराने ती कामाला लागली आहे.

पहिल्या टप्प्यात स्वातंत्र्यवीरांचा पूर्णाकृती पुतळा व सर्व राज्यांतील भारतीय क्रांति-कारकांचे वस्तुसंग्रहालय या गोष्टी येतील. स्वातंत्र्यवीर सावरकर मार्गावर (दादर पश्चिम) महात्मा गांधी स्मारक तलावाच्या शेजारच्या जागेत उभारण्यात येणाऱ्या या क्रांतिकारक वस्तु-संग्रहालयात सर्व ज्ञात, अज्ञात क्रांतिकारकांची छायाचित्रे, त्यांनी वापरलेली शस्त्रास्त्रे, त्याचे ग्रंथ, त्यांची पत्रे व त्यांची वस्त्रे इत्यादी वस्तू असतील. भारतीय क्रांतिकारकांचे अशा प्रकारचे स्मारक कोठेही नाही.

स्मारकाची एकूण योजना सुमारे एक कोटी रुपयांची आहे. यापैकी पहिला टप्पा पूर्ण करण्यासाठी ६० लक्ष रुपये लागतील. स्मारकाचे काम तर यापूर्वीच चालू झाले आहे. पुतळ्याची नमुनाकृती तयार झाली असून, क्रांतिकारक वस्तुसंग्रहालयाची पायाभरणीही पूर्ण झाली आहे. जन्म-शताब्दीच्या दिवशी पुतळा व संग्रहालय दोन्हींचे अनावरण करण्याचा विचार आहे.

आतापर्यंत महाराष्ट्र शासन अडीच लक्ष रुपये व मुंबई महापालिका ३ लक्ष रुपये अशा मोठ्या देणग्या स्मारकासाठी मिळाल्या आहेत. नागरिकांनी दिलेल्या लहानमोठ्या देणग्यांनी निधीत १० लक्ष रुपयांची भर घातली आहे. पण आपले नजीकचे लक्ष्य आहे ६० लक्ष रुपये. यासाठी स्वातंत्र्यवीरांच्या आत्मार्पण स्मृतिदिनापासून (२६ फेब्रुवारी) निधि–संकलन मोहीम सुरू होत आहे. अपेक्षित निधी जमेल याबद्दल शंका वाटत नाही.

नागरिकांनी आपल्या देणग्या खालील ठिकाणी द्याव्यात. चेक "स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक" या नावे काढावेत.

१) स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक, २५२ स्वा. सावरकर मार्ग, शिवाजी उद्यान, दादर, मुंबई– ४०० ०२८

२) लोकमान्य टिळक स्मारक मंदिर, टिळक मार्ग, पुणे– ४११ ०३०

ज. श्री. टिळक
कार्याध्यक्ष

दस्तएवस्कीचे " विश्वबंधुत्व "

अनिरुद्ध कुलकर्णी

आठ जून १८८० रोजी दस्तएवस्कीने पुष्किनच्या पुतळ्याच्या अनावरणप्रसंगी मॉस्कोत भाषण केले. दस्तएवस्की वक्ता नव्हता; परंतु हे भाषण मात्र अर्वाचीन युरोपच्या इतिहासात अजरामर ठरले. अत्यंत श्रेष्ठ भाषणे म्हणून जी नेहमी उल्लेखिली जातात, त्यांत या भाषणाचा समावेश होतो.

मृत्यूपूर्वी फक्त आठ महिने आधी हे भाषण केलेले आहे. साठीतील दस्तएवस्की या वेळी कीर्तीच्या शिखरावर होता. त्याची सर्वश्रेष्ठ कादंबरी ' ब्रदर्स कारामाझोफ ' नुकतीच प्रसिद्ध झालेली होती आणि त्याचे नाव सर्वत्र दुमदुमत होते. या अनुकूल पार्श्वभूमीवर त्याने जे भाषण केले, त्यामुळे सारे श्रोते मंत्रमुग्ध झाले; भारावून गेले.

असे या भाषणात होते तरी काय ? तर या भाषणात दस्तएवस्कीने पुष्किनचा 'रशियाचा राष्ट्रकवी' म्हणून गौरव केला होता. भावी काळात रशिया महत्त्वाची ऐतिहासिक कामगिरी पार पाडणार आहे असे भाकीत केले होते. रशियातील ' युरोपिअन रशियन ' व ' स्लावोफिल रशियन ' यांनी एकत्र आले पाहिजे असे आवाहनही केले होते. दस्तएवस्कीची सारी पुण्याई या भाषणाच्या मागे उभी होती. त्यामुळे या कल्पनांनी श्रोत्यांवर अर्थातच छाप पाडली. परंतु त्याने सर्वांची मने भारून टाकली, ती त्याच्या आयुष्यभरच्या लाडक्या कल्पनेचा उद्‌घोष करून. ही कल्पना होती विश्वबंधुत्वाची कल्पना. भावी काळात सर्व जगातील माणसे एकत्र येतील, बंधुभावाने जोडली जातील आणि हे ऐतिहासिक कार्य रशियन माणसेच पार पाडतील हा जबर विश्वास त्याने ही कल्पना मांडताना प्रकट केला.

पुष्किनच्या प्रतिभेतील आणि जीवनाला सामोरे जाण्यातील विश्वात्मकता आणि विश्वबंधुता गौरविताना, या भाषणाच्या अखेरी–अखेरीस दस्तएवस्की म्हणतो—

" अरेरे, यूरोपीय लोक आपल्याला किती आवडतात याची त्यांना कल्पनाच नाही ! मला वाटते आपण म्हणजे फक्त आपणच नव्हे तर भावी रशियन, अगदी सारे जण, समजून घेऊ शकतील की अस्सल रशियन होणे म्हणजे सर्व यूरोपीय वाद-प्रतिवाद स्वतःत मिटवून टाकणे, आपल्या सर्व भूतदयावादी आणि सर्व–एकता साधणाऱ्या आत्म्यात यूरोपच्या मनोयातनेला, अँग्विशला, उत्तर शोधणे, आपल्या सर्व भावंडांना बंधुभावाच्या मिठीत घेणे आणि कदाचित सर्वांत निर्णायक म्हणजे महान वैश्विक संमीलनाचा (युनिव्हर्सल हार्मनी) उद्‌घोष करणे. ख्राईस्टच्या जीवनसंदेशाला साजेल अशा तऱ्हेच्या, सर्व राष्ट्रांच्या बंधुभावाचा उद्‌घोष करणे होय !

" मला माहीत आहे; म्हणजे मी चांगलेच जाणून आहे, की तुम्हाला माझे हे शब्द बेहोषीतील, अवास्तव आणि अद्‌भुत वाटतील. असेनात का ते तसे. ते उच्चारले म्हणून मी काही खजिल झालेलो नाही. हे असेच घडणार होते. विशेषतः या विजयी क्षणाच्या वेळी, आपल्या थोर प्रतिभावंताचा स्मृतिदिन साजरा करताना. ज्याने सर्जलशील साहित्यात नेमक्या याच कल्पनेचा, बंधुतेचा, आविष्कार केला आहे अशा प्रतिभावंताचा. तसे पाहिले तर मी काही नवे सांगतोय अशातला भाग नाही. हे पूर्वीही सांगितले गेले आहे. थोडेसे चतुराईचे वाटेल, पण मोल आहे ते याचे –खरोखरच हे सद्‌भाग्य आपल्यासारख्या ओबडधोबड देशाच्या वाट्याला येणार आहे काय ? मानवजातीला आपण नवा संदेश देणार आहोत काय ? लक्षात घ्या; आर्थिक भरभराटीची ख्याती, लष्करी सामर्थ्य किंवा वैज्ञानिक प्रगती यांची प्रसिद्धी हे माझ्या

अनुक्रमणिका

मनात नाहीत. मी फक्त मानवी बंधुतेला (brotherhood of men) आणि वैश्विक, सर्वव्यापी भूतदयेच्या संबंधांना, इतर कोणत्याही राष्ट्रापेक्षा रशियन हृदय जास्त अनुकूल, योग्य आहे असे सांगतो आहे. आपला इतिहास आपले प्रतिभावान राष्ट्रपुरुष आणि पुष्किनचे प्रतिभाशाली व्यक्तिमत्त्व यांत मला हेच दिसते आहे. आपला देश असेना का गरीब. पण या गरीब भूमीने या गुलामांच्या वेषातील ख्रिस्ताने सारे काही धुंडाळले आहे. त्याच्यावर वरदहस्त आहे. तर आपण त्याच्या अंतिम शब्दाला का बिलगू नये ? स्वतः ख्रिस्त गव्हाणीतच जन्माला आला नव्हता काय ? " (डायरी ऑफ ए रायटर, पृष्ठ ९८०)

आज ह्या शब्दांतील मोलही जाणवते आणि त्यांतील स्वप्नाळूपणाही समजू शकतो. भावी काळात म्हणजे विसाव्या शतकात रशिया ऐतिहासिक महत्त्वाची कामगिरी पार पाडेल हे भाकीत तर खरंच ठरले आहे. रशियात क्रांती झाली आणि जागतिक समाजवादी चळवळीचे नेतृत्वच रशियाने केले. परंतु सोव्हिएत रशियाने विश्वबंधुत्वाचा आविष्कार मात्र घडविलेला नाही. ही दस्तएवस्कीची लाडकी कल्पना बोलशेविक वारसा सांगणाऱ्या सोविएत रशियाने लष्करी टाचांखाली चिरडून टाकली आहे. इतक्या कॉम्रेड्सचे शिरकाण त्यांनी केले आहे, की बंधुत्व आणि विश्वबंधुत्व यांसारख्या उदात्त कल्पनांवर जणू त्यांचा नैतिक हक्कच उरलेला नाही. मौज म्हणजे समाजवादी हेच बंधुतेचा कसा बळी घेतात याचेही चित्रण दस्तएवस्कीने केलेले आहेच. त्याला अंदाज लागला नाही तो याचा, की नेमके हेच समाजवादी पुढे विजयी होतील, सर्वंकष सत्ता ताब्यात घेतील आणि त्याच्या लाडक्या स्वप्नकल्पनेचा, बंधुभावाचा, निकाल लावतील.

अर्थात प्रस्तुत ठिकाणी महत्त्वाची गोष्ट ही आहे, की एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस दस्तएवस्कीसारख्या केवळ असामान्य प्रतिभावंताने ज्या मूल्यांचा उच्चरवाने पुरस्कार केला, ते क्रांतिमूल्य बंधुभावाचे होते, विश्वबंधुत्वाचे होते. बुद्धिवाद, वैज्ञानिक प्रगती, सुखवाद यांसारख्या गोष्टी त्याने बाजूस ठेवल्या आणि बंधुतेची द्वाही फिरविली. स्वतःची लाडकी, जिवाभावाची कल्पना म्हणून बंधुतेची कल्पना त्याने जगासमोर ठेवली. आणि ही केवळ एखाद्या व्याख्यानाची बाब नव्हती. स्वतःच्या कथा-कादंबऱ्यांतूनही तो याच कल्पनेचे सूत्र गोवीत गेला होता.

स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांभोवती गुंफले गेलेले सामाजिक तत्त्वज्ञान हे दस्तएवस्की तरुण असतानाचे, म्हणजे एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील यूरोपचे नवे व प्रभावी तत्त्वज्ञान होते. ब्रिटिशांचा 'उदारमतवाद' आणि फ्रान्समधील 'समाजवाद' ही या तत्त्वज्ञानाची तत्कालीन प्रसिद्ध रूपे होती. बाकुनिनचा अराजकी समाजवादही होताच. शास्त्रीय समाजवादाचा म्हणजेच कम्युनिझमचा उदय एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात झाला. त्याची चाहूलच फक्त दस्तएवस्कीला लागलेली होती. त्याचा प्रभाव त्याच्यावर पडण्याचा प्रश्न नव्हता.

'फ्रेंच समाजवादा'चा आणि दस्तएवस्कीचा प्रत्यक्ष परिचय १८४६ मध्ये झाला. म्हणजे तो ऐन गद्धेपंचविशीत असताना झाला. तशी किंचितशी तोंडओळख थोडी आधीची होती. ज्या थोर रशियन टीकाकाराने दस्तएवस्कीची पहिली कादंबरी– 'पूअर फोक'– वाखाणली तो बेलिन्स्की समाजवादी विचार जाणणारा व मांडणारा होता. पण खरा परिचय १८४६ सालीच झाला.

पीटर्सबर्गमध्ये त्यावेळी पेत्राशेवस्की मंडळ नावाचा समाजवादी विचारसरणी असलेल्या लोकांचा एक क्लब होता. तसा अज्ञातच. मिखाईल आणि फ्योदोर या दोघाहीं दस्तएवस्की बंधूंचा या मंडळाशी परिचय झाला आणि दोघांचेही या लोकांमध्ये जाणेयेणे सुरू झाले. ही मंडळी फार 'जहाल' होती असे नव्हे; पण जुलुमी झारशाही आणि 'ऑर्थोडॉक्स' रशियन चर्च यांच्या विरुद्ध मोकळेपणे आपापसात विचार मांडणारी होती. गुलामगिरीला तर त्यांचा निश्चितच विरोध होता. मंडळात मोंबोली किंवा स्पेशनेफ यांच्यासारखे जहाल, दहशतवादी क्रांतिकारी समाजवादी होते पण खुद्द केंद्रस्थानी असणारा पेत्राशेवस्की मात्र मवाळ समाजवादी होता. फूरिए या युटोपिअन समाजवादाचा तो चाहाता होता. फूरिएची पुस्तके

अनुक्रमणिका

सदस्यांकडून वाचून घेण्याची कामगिरी तो हौसेने पार पाडीत असे. एकंदरीत मंडळी उदारमतवादी विचारसरणीची असली, तरी त्या मंडळाचे ' ब्रदर हूड ' गुप्त स्वरूपाचे असावे, त्याचा जाहीर गवगवा नसावा हे सर्वांचेच मत होते. तरी मंडळाविषयी काही माहिती कोणी झारच्या अधिकाऱ्यांना फोडल्यास त्या सदस्याला ठार मारावे असे सर्वांचे मत कधीच नव्हते.

पेत्राशेवस्की मंडळाचे सदस्य दर शुक्रवारी भेटून विविध राजकीय व सामाजिक विषयांवर चर्चा करीत असत. या चर्चा शांतपणे ऐकण्याचेच काम दस्तएवस्की प्रामुख्याने पार पाडीत असे. गुप्तता अशाकरता होती, की मवाळ स्वरूपाचा समाजवाददेखील झारशाहीला मंजूर नव्हता; कारण मवाळ झाला, तरी समाजवादाचा राजेशाहीला विरोध हा मुळातच होता आणि असतो. झारशाही नष्ट करावी, झार व त्याच्या सहकाऱ्यांना ठार मारावे, ऑर्थोडॉक्स चर्च ही रशियन धर्मसंस्था संपुष्टात आणावी, सर्व जमीन आणि उद्योगधंदे यांची खाजगी मालकी नष्ट करून तिचे सरकारीकरण करावे ही जहाल मते स्पेशनेफसारख्या थोड्यांची होती. रशियात लवकरच प्रचंड, रक्तरंजित क्रांती घडून येणार आहे आणि तिच्यात सहभागी होण्यासाठी आपण एकत्रित आलो आहोत ही भावना बाकुनिनच्या जहाल अनुयायांत असे, तशी भावना पेत्राशेवस्की मंडळीत नव्हती. परंतु काहीही असले तरी हा क्लब लवकरच उघडकीस आला आणि त्याचा परिणाम म्हणून दस्तएवस्कीला " जवळ जवळ " फाशी जावे लागले. त्यातून सुटका झाली तरी पुढे सैबेरियात ओम्स्क येथे चार वर्षे सक्तमजुरीचा कारावास आणि पुढे सहा वर्षे सक्तीची लष्करभरती हे खडतर जीवन त्याच्या वाट्याला आले.

या खडतर जीवनाची धग बसल्यावर दस्तएवस्कीचा यूरोपीय समाजवादही निवळला. त्याच्या समाजवादाच्या कल्पनेत मोठे परिवर्तन घडून आले. पूर्वी त्याचा समाजवाद पुस्तकी आणि अमूर्त होता. आता तो अनुभवाचा आणि मूर्त बनला. समाजवाद हा नास्तिकता, जडवाद आणि बुद्धिवाद यांच्यावर अधिष्ठित असण्याऐवजी बंधुत्वाच्या भावनेवर आधारलेला पाहिजे असे त्याला वाटू लागले. स्वातंत्र्य आणि समता यांना शुष्क बुद्धिवादाची जोड देण्याऐवजी प्रेमाचा ओलावा पुरविणे आगत्याचे आहे हे त्याला उमगले. आणि एकोणिसाव्या शतकात तरी दस्तएवस्कीइतक्या सामर्थ्याने ही जाण कोणीच व्यक्त केलेली नाही. त्या काळचे ' ख्रिश्चन समाजवादी ' आज विस्मरण पावले आहेत; परंतु दस्तएवस्की मात्र त्याच तेजाने तळपतो आहे आणि अनेक मनांना प्रभावित करू शकतो आहे.

पुढे १८६२ साली दस्तएवस्की पहिल्यांदा यूरोपात गेला. ' स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व ' यांचे नवे सामाजिक तत्त्वज्ञान स्वीकारलेल्या यूरोपबद्दल आणि विशेषतः फ्रान्सबद्दल त्याच्या मनात उसळते कुतूहल होते. पहिल्यापासूनच होते. परंतु प्रत्यक्षात त्याची निराशा झाली. पॅरिस आणि पॅरिसवासीयां संबंधी त्याचे वाईट मत बनले. फ्रान्समधील पुरुष त्याला पैशामागे धावणारे वाटले तर स्त्रिया रखेल्यांप्रमाणे चवचाल वाटल्या.

क्रांतिकारक तत्त्वे फसलेली होती. महागाई इतकी होती, की सामान्यांच्या स्वातंत्र्याला काहीच अर्थ नव्हता. विषमता होतीच. बंधुत्वाची भावना असणार तरी कोठून ? कारण लोक व्यक्तिवादाने आणि स्वार्थाने पछाडलेले होते. ते आक्रमकही होते. बंधुभाव असायला हवा, तर समाजासाठी काहीतरी त्याग करायची तयारी हवी. उहापोह न करता समाजासाठी काहीतरी झीज सोसायची इच्छा हवी. त्याच्या बदल्यात समाजानेही व्यक्तीच्या स्वातंत्र्याची व सुरक्षिततेची हमी द्यावयास हवी. फ्रान्समधील " दुसऱ्या साम्राज्यात " हे काहीच नव्हते.

क्रांतिकारी सामाजिक तत्त्वज्ञानाची १८४८ च्या फसलेल्या क्रांत्यांमुळे झालेली पीछेहाट दस्तएवस्कीने पाहिली परंतु तो मार्क्स किंवा नीत्शे यांच्या मार्गाने गेला नाही. मार्क्सने लाल समाजवाद जहाल आणि ' शास्त्रीय ' स्वरूपात मांडला. वर्गसंघर्ष हा समाजवादी लढ्याचा आत्मा मानला. तर नीत्शेने समाजवादाचाच निषेध करून महामानवाचे, पुढे फॅसिस्ट विचारसरणीला प्रेरणा देणारे तत्त्वज्ञान रचले. दोघांनीही हुकूमशाहीचा पुरस्कार केला.

पुढे विकृत आणि वेडसर, म्हणून ज्याचा उपहास झाला तो दस्तएवस्की मात्र रस्ता चुकला नाही. त्याच्या ' विंटर नोट्स ' याचीच साक्ष देतात आणि त्याच्या कादंबऱ्याही हेच दाखवून देतात. समाजवादाचे अधिष्ठान माणसामाणसांतील प्रेमसंबंध हेच असले पाहिजे; कट, कारस्थाने, दडपशाही, हत्याकांड, हे असता कामा नयेत, हा त्याचा आग्रह काही काळ विसरला गेला तरी मुळात योग्यच होता हे पुढे काळानेच सिद्ध केले.

मार्क्सवाद शस्त्रबळावर लोकांवर लादला गेला. दस्तएवस्कीने लोकांची मने जिंकली. आन्द्रे झीद, केस्लर, सार्त्र, काम्यू, पास्तरनाक, सोल्झेनित्सिन, अशा अनेक प्रतिभाशाली साहित्यिकांच्या आणि विचारवंतांच्या विश्वासास आणि आदरास तो पात्र ठरला. दस्तएवस्कीचा उत्स्फूर्त पंथ निर्माण होऊ शकला. मौज म्हणजे स्तालीनसारखा हृदयशून्य दडपशहा देखील दस्तएवस्कीच्या कादंबऱ्या दडपू शकला नाही, आणि गोर्कीसारखे 'वास्तववादी ' आणि त्याचे भगतगणदेखील दस्तएवस्कीच्या स्थानाला धक्का पोहोचवू शकले नाहीत.

मानवी जीवनाला अर्थ प्राप्त करून देणाऱ्या मूलभूत कल्पना सुदैवाने सोप्या आहेत आणि माणसामाणसांतील बंधुभाव ही कल्पना त्यांपैकीच आहे याचा ऐतिहासिक प्रत्यय दस्तएवस्कीने आणून दिला.

असे मात्र समजता कामा नये, की ' बंधुत्व ' या कल्पनेचे दस्तएवस्कीमधील कार्य फक्त समाजवादाला आधार देण्याचे आहे. बंधुत्व हे मूलभूत मानवी मूल्य म्हणून स्वीकारल्यामुळे दस्तएवस्कीचे माणसामाणसांतील संबंधांचे आकलन सखोल होताना दिसते. उत्तरोत्तर त्याचे गांभीर्य आणि मनोज्ञता वाढत जातात. तर तिसरे म्हणजे या उत्कट बंधुभावनेच्या जोपासनेमुळे त्याचे ख्रिस्ताच्या प्रतिमेशी असलेले नाते अधिकच गहिरे होते; इतके, की ख्रिस्ताकडे दस्तएवस्की विश्वात्मक बंधुभावाचा सर्वोच्च आदर्श म्हणून पाहतो.

ख्रिस्त आणि बंधुभाव यांची सांगड दस्तएवस्कीने घातली याचे प्रमुख कारण तुरुंगवासात त्याने केलेले ' नव्या करारा'चे सखोल वाचन हे आहे. तुरुंगातील कैद्यांना, त्याकाळच्या रशियात एकमेव वाचायला मिळू शकणारे पुस्तक म्हणजे बायबलचा 'नवा करार'. परंतु या वाचनाचा दस्तएवस्कीवर विलक्षण खोल ठसा उमटला तो कायमचाच. सर्वसामान्य माणसासाठी क्रॉसवर चढणाऱ्या ख्रिस्तात त्याला स्वतःच्या चेहऱ्याचेही प्रतिबिंब आढळले; आणि मानवातील बंधुभावाला ईश्वर आणि ख्रिस्त यांचा वरदहस्त लाभणे लाखमोलाचे आहे हा त्याचा दृढविश्वास बनला. 'सत्य जर ख्रिस्ताला सोडून गेले आणि सत्य आणि ख्रिस्त यांच्यात निवड करायची झाली तर मी ख्रिस्ताबरोबर राहीन ' हे त्याचे उद्गार याच दृढविश्वासाचे द्योतक आहेत. " सत्यधर्म " आणि विश्वबंधुत्व मानणारा " संतधर्म " यात आपण संतधर्म निवडू हा दस्तएवस्कीच्या या उद्गाराचा मथितार्थ आहे.

पुष्किनच्या पुतळ्याच्या अनावरणप्रसंगी केलेले जगद्विख्यात भाषण, अनेक निबंध, आणि ' विंटर नोट्स ' यांमधून दस्तएवस्कीचे ' विश्वबंधुत्व ' डोकावते; पण त्याचे मनोज्ञ दर्शन घेण्यासाठी मात्र आपल्याला त्याच्या कादंबऱ्यांकडे वळावे लागते. अर्थात येथे बंधुभावाची ' चित्रे ' दिसतात. आणि वैचारिक मांडणी अधूनमधूनच येते. 'दि डायरी ऑफ ए रायटर'मध्ये भेटते ते विश्वबंधुत्व, तर कादंबऱ्यांतून भेटते ते बंधुत्व, माणसामाणसांतील सौहार्दपूर्ण संबंधांचे चित्रण. या चित्रणातून दस्तएवस्कीचे " बंधुत्व " म्हणजे (१) परस्परांचा एकमेकाविषयीचा पूर्ण विश्वास, (२) परस्परांविषयीचा अकृत्रिम जिव्हाळा, (३) एकमेकांना मदत करण्याची आणि त्यासाठी ' सोसण्याची ' तयारी, (४) निखळ क्षमाशीलता आणि (५) दरिद्री, अपंग, विकृत, गुन्हेगार, रुग्ण यांच्याविषयी जिवंत सहानुभूती ही होत, असे स्पष्टपणे समजू शकते. मूलभूत बंधुभावात आड येणाऱ्या आणि प्रसंगी त्याचा नाश करणाऱ्या गोष्टी म्हणून दस्तएवस्की नेहमी आत्मकेंद्रितपणा, सत्तेचा हव्यास, पैशाची लालसा, आणि नास्तिकता यांच्यावर हल्ला करतो.

बंधुभावाचे चित्रण दस्तएवस्की अगदी टोकाला जाऊन करतो आणि त्यामुळेही ते लक्षात राहते. रंजले, गांजलेले, दलित, अपंग यांच्याविषयीचा त्याचा बंधुभाव आपण समजू शकतो. परंतु तो

यापुढे जाऊन क्रांतिकारक चित्रण करतो. गुन्हेगार, जुगारी, खुनी, आत्महत्त्यारी, बलात्कार करणारे, विकृत किंवा वेडसर यांनाही बंधुभावाचीच वागणूक दिली पाहिजे असे तो वारंवार सुचवीत राहातो, दस्तएवस्कीची ही भूमिका विकृत किंवा वेडसर यांच्या बाबतीत मान्य होण्यासारखी असली तरी सरसकट सामाजिक भूमिका म्हणून आजही मान्य होईलसे नाही. परंतु ही भूमिका दस्तएवस्कीनी मांडण्यात मोठा अर्थ भरलेला आहे. अशा वेडसर, गुन्हेगार आणि विकृत व्यक्तीं-विषयी दस्तएवस्कीनी प्रत्यक्ष जीवनात बंधुभावाचीच मशागत केली; आणि मग त्यांची अविस्मरणीय ठरलेली चित्रे रेखाटली. विकृत, कुरूप, दुष्ट आणि गुन्हेगार अशा व्यक्तींविषयी त्याला अतूट आकर्षण आणि आत्मीयता वाटत असे, असे त्याच्या अनेक निकटच्या स्नेह्यासोबत्यांनी लिहून ठेवले आहे. या पराकोटीच्या बंधुभावाचे स्पष्टीकरण शोधण्याचा प्रयत्न अनेकांनी त्याच्या तुरुंगवासात आणि त्याला येणाऱ्या एपिलेप्टिक फिट्स्‌मध्ये केलेला आहे. स्वतः दस्तएवस्कीच सुष्ट आणि दुष्ट शक्तींच्या संघर्षाचे रणमैदान होता हे टॉल्सटॉय-सारख्या साहित्यिकांनीही मान्य केले आहे.

दस्तएवस्कीचा बंधुत्वविचार असा टोकाला जाऊन रंगविला गेलेला असला, त्यात सुखी व समाधानी जिवाच्या बंधुभावाला स्थान नसले, तरी हे लक्षात घेतले पाहिजे की, हा विचार उपदेशात्मक नाही तर आवाहनात्मक आहे आणि वास्तवातील बंधुभावाचे सखोल दर्शन घडवूनच तो मांडला गेलेला आहे. हे दर्शन आल्हाददायक किंवा प्रसन्नही नसेल आणि पापभावना, खंत कडवटपणा यांच्यातून ते उमलत असेल; परंतु हे दर्शन अंतिमतः दिलासा देते आणि आश्वासक ठरते.

'ब्रदर्स कारामाझोफ' या दस्तएवस्कीच्या कादंबरीच्या नावातच 'ब्रात्या' – भावंडे – हा शब्द आहे, आणि या कादंबरीचे खरे केंद्र 'बंधुभाव' हेच आहे. अनेक टीकाकारांना ही गोष्ट जाणवलेली आहे. कारामाझोफ बंधूंतील सर्वांत धाकट्या भावाचे नाव आलेक्सी हे आहे. 'आलेक्सी'चा शब्दशः अर्थ मदतगार. 'आलेक्सी' सर्वांनाच बंधुभावाने मदत करतो. आल्येशा-मुळे कातेरिना इवानोवना, ग्रूशेका, राकीतीन, लिझा, स्नेगिरेफ, कोल्या या व्यक्तिरेखांना केंद्र सापडते. स्वतःचे स्वतःला दर्शन घडते. असे असले, तरी बंधुत्व हेच सर्व कादंबरीला गुंफणारे सूत्र ठरते. आल्येशा म्हणजे आत्मा, दामित्री म्हणजे भावना, इव्हान म्हणजे बुद्धी आणि स्मेर्द्याखोफ म्हणजे अबोध मन. या सर्वांना हा बंधुभाव एकत्र आणतो, असेही प्रतीकात्मक पद्धतीने दाखविले जाते.

बंधुतेच्या मूल्याचे आकलन फादर झोसिमाला, मिखाईला या लष्करी अधिकाऱ्याकडून होते. तो ते आल्येशाला करून देतो आणि आल्येशा कोल्याला आपला वारस म्हणून निवडतो. बंधुतेचा विचार हा आचरणातून समजावून घेण्याचा विचार आहे; परंतु प्रत्येक पिढीने भावी पिढीला तो विश्वासात घेऊन समजावून द्यायचा आहे हे दस्तएवस्की कौशल्याने सूचित करतो.

'ब्रदर्स कारामाझोफ' हे भावांचे पुनर्मिलन आहे. पण या कादंबरीत आणखीही एक पुनर्मिलन आहे. तितकेच मनोज्ञ आणि हृदय हेलावून टाकणारे. शाळेतील मुले, कोल्या क्रासोतकीन हे एका बाजूला आणि वडिलांच्या अपमानाने पेटलेला बच्चा इल्युशा दुसऱ्या बाजूला यांचा संघर्ष होतो. आल्येशा या सर्वांत समझोता घडवून आणतो आणि बंधुभावाचे आवाहन करतो. महाकाव्यातील हे उपाख्यान अक्षरशः गलबलून टाकणारे आहे.

झोसिमा आणि आल्येशा हे बंधुतेचा आविष्कार घडविणारे गुरु–शिष्य आहेत. आल्येशा हा झोसिमाला त्याच्या ऐन तारुण्यात वारलेल्या भावाप्रमाणे वाटतो; कारण आल्येशाचे विचारी वागणे आणि प्रसन्न चेहरा. तर आल्येशाला झोसिमा आदरणीय मोठ्या भावाप्रमाणे वाटत राहतो. पण बंधुत्वाविषयी अविस्मरणीय शब्द मात्र उच्चारतो तो मिखाईल. मिखाईल हा खुनी आहे. एका श्रीमंत विधवेचा खून तो करतो पण पुढे त्याचे वर्तन इतके उदात्त राहते की त्याने स्वतःहून जाहीर केले, तरी त्यानेच खून केला आहे यावर कोणी विश्वासच ठेवत नाही. हा मिखाईल म्हणतो–

अनुक्रमणिका

"या जगाची जर निर्मिती नव्याने करायची असेल तर प्रथम माणसांची अंतःकरणे पालटली पाहिजेत. दुसऱ्या प्रत्येक माणसाचे बंधू म्हणून रूपांतर झाल्याशिवाय प्रत्यक्षात मानवी बंधुता अवतरणार नाही. कुठलीही वैज्ञानिक प्रगती आणि सामूहिक उद्दिष्टे माणसांना त्यांची संपत्ती व हक्क यांची न्याय्य विभागणी करून द्यायला भाग पाडू शकणार नाहीत. त्यांचे समाधान होईल इतके पुरेसे त्यांना कधीच मिळणार नाही. ते नेहमीच कुरकूर करतील, मत्सर करतील आणि एकमेकाचा विनाश करतील. मग ते (नंदनवन) अवतरेल तरी केव्हा, असे तू मला विचारशील. ते अवतरेल हे खरे; पण त्यासाठी माणसाचा एकलकोंडेपणाचा कालखंड संपायला हवा. आज प्रत्येकजण स्वतःचे व्यक्तित्व जपायचा जास्तीतजास्त प्रयत्न करतो. प्रत्येकजण स्वतःमध्येच जीवनाची परिपूर्णता अनुभवायचा प्रयत्न करतो. पण यामुळे परिपूर्णता प्राप्त होण्याऐवजी हे प्रयत्न त्याला आत्मविनाशाकडेच खेचून नेतात. स्वतःची परिपूर्णता दूरच राहाते; उलट, ते एकलकोंडेपणाच्या खाईत लोटले जातात. सर्व माणसांचे जणू अलगअलग तुकडे झालेत. जो तो स्वतः-च्या बिळात जाऊन बसतो. स्वतःच्या शेजाऱ्याला चुकवितो आणि दडून बसतो. स्वतःजवळचे सारे काही दडवितो. इतरांपासून स्वतःला दूर ठेवतो आणि इतरानांही दूर सारतो. प्रत्येकजण स्वतः संपत्ती गोळा करतो आणि स्वतः समर्थ व सुरक्षित आहोत असे मानतो. त्याला हे उमगतच नाही, की या वेडाच्या भरात तो जेवढी संपत्ती गोळा करतो तेवढा तो आत्मघातकी नपुसकतेत खोलखोल रुतत जातो; कारण त्याला स्वतःवर विसंबण्याची सवय होते. संपूर्णापासून तोडून वेगळा केलेला घटक म्हणूनच तो वाढलेला असतो. मानवजात, इतर माणसे यांच्याकडून मदत घेणे यावर त्याचा विश्वासच नसतो. ती सवयच नष्ट झालेली असते. संपत्ती आणि स्वतःला मिळालेले खास हक्क गमाविण्याचीच भीती त्याला वाटत असते. पण माणसाची खरी सुरक्षितता त्याच्या वैयक्तिक प्रयत्नात नसून वैश्विक मानवी एकतेत (सॉलिडॅरिटीत) आहे ही जाणीवच अलीकडे माणसाचे संशयी मन गमावून बसत आहे. पण हे भयावह एकलकोंडेपण नष्ट होण्याचा दिवस नक्की उजाडेल आणि माणसांना आपण अनैसर्गिकपणे एकमेकांपासून किती दूर गेलो आहोत हे कळून येईल."

या ठिकाणचे नंदनवन म्हणजे अर्थातच भौतिक सुखसमृद्धी आणि प्रगत यंत्रांनी गजबजलेला प्रदेश नव्हे, तर सुखसमृद्धी व प्रगती असलेला परंतु माणसामाणसांतील बंधुप्रेमाची नाती साकार करणारा प्रदेश होय. इंग्लंडमधील 'क्रिस्टल पॅलेस' हे स्वातंत्र्य आणि समतेबरोबरच मानवी न्याय आणि विश्वबंधुत्व जपणारे राज्य होय. या राज्यात ख्रिस्ताचे विस्मरण होत नाही, हे ओघानेच आले.

'माणसामाणसांतील सौहार्दाचे संबंध' हे फार व्यापक ध्येय आहे; पण या संदर्भात 'अ रॉ यूथ' या जरा कमी लोकप्रिय कादंबरीत दस्तएव्स्कीने खूपच निश्चित असा विचार मांडला आहे. या कादंबरीतील वेर्सिलोफची (आर्कादी या नायकाच्या वडिलांची) व्यक्तिरेखा केवळ अप्रतिम आहे. वेर्सिलोफ हा तरुण असताना समाजवादी असतो. तो जगात बंधुभाव निर्माण करण्याची भाषा करीत असतो. अमूर्त कल्पना आणि मनःचक्षूंसमोर तरळणारे नंदनवन (युटोपिया) यांमुळे तो भारावलेला असतो; परंतु त्याचे व्यवहारातील वागणे मात्र प्रत्यक्षात बंधुभाव आणि प्रेम यांच्यापासून दूर गेलेले असते.

परदेशात–जर्मनीत–असताना त्याच्या एकाकी अवस्थेत वेर्सिलोफला उलगडते, की मानवतेच्या प्रेमाची भाषा ठीक आहे; परंतु ती अमूर्त आणि धूसर आहे. याविषयीचे व्यावहारिक सूत्र मांडताना वेर्सिलोफ म्हणतो, – "प्रत्येकाने स्वतःच्या आयुष्यात एकतरी संबंधित माणूस प्रत्यक्षात खरोखर आनंदी करणे हेच प्रत्येक सुशिक्षित माणसाचे सक्त कर्तव्य आहे, असा मी नियम करीन. प्रत्येक शेतकऱ्याने रशियातील जंगलतोडीला उत्तर देण्यासाठी म्हणून आयुष्यात एकतरी झाड लावावेच त्याप्रमाणे ...(पृ. ५१६)... सुशिक्षित आणि सुसंस्कृत माणूस उच्च ध्येयांच्या नादी लागून हे मूळ वास्तव विसरतो आणि परिणामी हास्यास्पद, लहरी आणि बेफिकीर बनतो या पार्श्वभूमीवर एकतरी संबंधित माणूस खऱ्याखुऱ्या अर्थाने आनंदी करणे हे सूत्र

वरवर व्यस्त (अॅब्सर्ड) वाटले तरी प्रत्यक्ष आचरणात ते तसे वाटत नाही."

हे सूत्र प्रत्यक्षात आचरणात आणण्याचा विचार वेर्सिलोफ जेव्हा गांभीर्याने करतो, तेव्हा त्याला त्याच्या अडाणी व गुलामवर्गातून आलेल्या बायकोविषयी खरेखुरे प्रेम वाटू लागते. शारीरिक आकर्षणाचा पडदा गळून पडतो व सोनियाचे आंतरिक सौंदर्य त्याला जाणवू लागते. तिच्याबद्दल नवे आकर्षण आणि आदर त्याच्या मनात निर्माण होतात. तिच्यातील रशिअन 'साधेपणा' तो समजून घेऊ शकतो व त्यांचे दुरावलेलेले संबंध परत प्रस्थापित होतात.

बंधुत्वाची कल्पना स्त्री-पुरुषातील संबंधांनाही लागू आहे. या बंधुत्वभावनेचा उगम सांगताना दस्तएवस्कीने वेर्सिलोफच्या तोंडी पुढील उद्‌गार घातले आहेत; – " होय आर्कादी, मी तुला परत सांगतो. रशियन उच्चभ्रू माणूस (नोबलमन) म्हणून मला माझ्या स्थानाचा अभिमान वाटल्यावाचून रहात नाही. जगात कोठेही आढळणार नाही असा अत्युच्च संस्कृतीचा आविष्कार काळाच्या ओघात आमच्यात घडून आला आहे. ही माणसे अशी आहेत, की ज्यांना जगातील सर्वांविषयी कणव, सहानुभूती वाटते. परंतु हा एक अगदी वरच्या सुसंस्कृत माणसांचा स्तर असल्याने त्यांचा प्रतिनिधी बनण्याचे भाग्य माझ्या वाट्याला आले आहे. ही माणसे रशियाच्या भवितव्याची राखणदार आहेत. अशी माणसे कदाचित हजारभरच असतील, जरा जास्त किंवा कमी देखील असतील; परंतु ती निर्माण करण्यासाठीच जणू सारा रशिया जगत आला आहे. असे असेल तर हे निष्पन्न, शेकडो वर्षांचा आणि लक्षावधी माणसांच्या तुलनेने अगदीच किरकोळ आहे असे काहीजण म्हणतील. मला मात्र ही लहानसहान गोष्ट वाटत नाही" (पृ. ५१०).

वेर्सिलोफमध्ये दस्तएवस्कीच्या तरुण वयातील बंधुभावविषयक चिंतनाचे प्रतिबिंब आढळते. वेर्सिलोफच्या या चिंतनावर ख्रिश्चॅनिटीतील बंधुत्वविचाराचा प्रभाव नाही. वेर्सिलोफ युरोपीय क्रांतिकारी समाजवादी आहे. परंतु 'अ रॉ यूथ' याच कादंबरीत माकार दोलगोरुकीची व्यक्तिरेखा दस्तएवस्कीने रंगविली आहे. 'स्तारेत' झोसिमाच्याच तोडीची ही हृदयंगम व्यक्तिरेखा आहे. बंधुत्वाच्या आदर्शाचा हा 'ख्रिश्चन' आविष्कार आहे. परंतु एक वेगळीच समस्या माकारच्या मुखाने दस्तएवस्की मांडुन जातो. एक दिवस रस्त्याने जाता जाता अनुभवी व वयस्क माकार तरुण व रांगड्या आर्कादीला म्हणतो–

"पोरा, माणसे जशी आहेत तशी स्वीकारून त्यांच्यावर प्रेम करणे हे अशक्य आहे. आणि तरीही तेच करावे लागते. म्हणुन तुमच्या भावना दूर ठेवून तुमचे नाक समोर ठेवून आणि डोळे मिटून त्यांच्यासाठी काहीतरी चांगले करा. ते वाईट वागले तरी राग येऊ न देता ते सहन करा, आणि त्यासाठी तुम्हीदेखील माणूसच आहात याचे स्मरण ठेवा. तुम्ही त्यांच्यापेक्षा जरा जास्त बुद्धिमान असाल, तर त्यांच्याशी कठोरपणे वागावे असे तुम्हाला वाटणारच. माणसे स्वभावतःच अधम असतात आणि भीतीपोटी ती दुसऱ्यावर प्रेम करतात. परंतु अशा प्रेमाला बळी पडू नका. अशा प्रेमाचा तिरस्कारच करा...

"शेजाऱ्यावर प्रेम करणे आणि तरीही त्याचा तिरस्कार न करणे... हे अशक्य आहे. मला वाटते, की शेजाऱ्यावर प्रेम करणे हे माणसाच्या शरीरधर्मातच नसावे. या ठिकाणी पहिल्यापासूनच काही तरी शाब्दिक घोटाळा असावा. आणि 'मानवतेविषयी प्रेम' याचा अर्थही समजावून घेतला पाहिजे. तुमच्या मनात तुम्ही जी मानवता कल्पिली असते तिच्याविषयी प्रेम असा तो असावा. (दुसऱ्या शब्दांत म्हणजे तुम्ही स्वतःला निर्माण केले आहे आणि तुमचे प्रेम हे तसे तुमच्याविषयीच आहे) आणि त्यामुळेच हे वास्तवात असणार नाही."

शेजाऱ्यावर प्रेम करताच येत नाही आणि मानवतेविषयीचे प्रेम अखेरीस स्वतःविषयीचेच प्रेम ठरते ही अडचण माकारने मांडली आहे. म्हणूनच माणसांवर प्रेम करताना 'एक श्रद्धा' म्हणूनच ते करावे लागते असा निष्कर्ष तो मांडतो.

माकारच्या उद्‌गारांना फार महत्त्व आहे कारण त्याचा त्याग विलक्षण आहे. माकार दोलगोरुकी हा गुलामवर्गातील असतो आणि वेर्सिलोफचा 'सर्फ' असतो, गुलाम असतो. त्याची पत्नी सोनिया ही

गावंढळ असली तरी सुंदर असते. त्याच्या गैरहजेरीत वेसिलोफ आणि सोनियाचे प्रेम जुळते आणि शरीर-संबंधही येतो. या परिस्थितीत माकार अगतिक न होता सोनियावरील स्वतःचा हक्क सोडून देतो आणि यात्रेला निघून जातो. पत्नी गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी स्वतः त्याग करतो, आणि उर्वरित आयुष्य लोकसेवा व धार्मिक चिंतन यांत घालवितो.

बंधुभावापोटी दस्तएवस्कीची पात्रे अशा विलक्षण कृत्यांना जन्म देतात. अनेक म्हणजे अनेक उदाहरणे आहेत. परंतु ' इडियट ' या कादंबरीतील एक प्रसंग आणि त्यातून प्रतीत होणारा बंधुतेचा गहिरा अर्थ अगदी अविस्मरणीय आहेत.

प्रिन्स मिश्किन हा ' इडियट ' या कादंबरीचा नायक. काहीसा वेडसर पण तरल बुद्धिमत्तेचा आणि हळुवार मनाचा. रोगोझिन हा पक्का बदमाश आणि 'खुनी ' मनाचा. नास्तासिया ही चंचल पण विलक्षण सुंदर स्त्री या दोघांवरही सारखेच प्रेम करते आणि हे दोघेही तिच्यावर भाळलेले असतात. पण मिश्किनचे प्रेम दुबळे असते, तर रोगोझिनचे प्रेम विकृत असते. तो अखेरील नास्तासियाचा खून करतोच. आणि तो खून करणार हेही या तिघांना पहिल्यापासूनच सारखे जाणवत असते. पण या खुनाकडेच तिघेही वेगाने ओढले जातात. प्रवाहातून कोणीच बाहेर पडू शकत नाहीत. मिश्किन नास्तासियाला म्हटले तरी वाचवू शकत नाही.

प्रिन्स मिश्किन एक दिवस रोगोझिनला भेटायला त्याच्या घरी जातो. रोगोझिनचे घर गूढ आणि गुन्हेगारीच्या परंपरेचा संस्कार सूचित करणारे असते.

या भेटीत 'पारमार्थिक' गप्पा होतात. शेवटी प्रिन्स जायला निघतो. गप्पांमध्ये प्रिन्सने आपल्याला एका सैनिकाने त्याचा क्रॉस कसा दिला हे सांगितलेले असते. हा (जस्ताचा) क्रॉस त्यावेळी प्रिन्सच्या गळयात आहे का ? असे रोगोझिन विचारतो. प्रिन्स होकार देऊन तो क्रॉस रोगोझिनला दाखवितो. त्यावर रोगोझिन त्याला स्वतःचा सोन्याचा क्रॉस देऊन त्याबदल्यात तो चांदीचा (खरा जस्ताचा) क्रॉस मागतो. दोघेही क्रॉसची अदलाबदल करतात. प्रिन्स त्याला म्हणतो ' क्रॉसची अदलाबदल झाली हे ठीक, पण आतापासून एकमेकांचे भाऊ झालो वरं का ! '

यानंतर रोगोझिन प्रिन्सला स्वतःच्या आईकडे नेऊन तिचे आशीर्वाद त्याला देववितो. आणि त्यानंतर प्रिन्सला त्याचा प्राण घेणार नाही असे वचन देतो. परंतु त्याचे ओठ थरथरत असतात आणि चेहरा पांढराफटक पडलेला असतो. नजर नेहमीपेक्षा जास्त भीतिदायक झालेली असते. अगदी शेवटी तो प्रिन्सला म्हणतो, "ज्याच्या नशीबात असेल ते त्याला मिळते. नास्तासिया तुझीच आहे आणि ती तशीच राहू दे. मी ती तुला देऊन टाकली आहे. पण एक कर. तुझ्या या मित्राला परपयोन रोगोझिनला मात्र विसरू नकोस."

ही मैत्री आणि बंधुभाव पुढे टिकतात. इतके, की नास्तासियाचे प्रेत जेव्हा पोलिस ताब्यात घेतात तेव्हा तेथे भ्रमिष्ट रोगोझिनबरोबर प्रिन्स मिश्किनही त्यांना सापडतो. बंधुभावाचे चित्रण करताना दस्तएवस्की किती टोकाला जातो, याचे हे उत्तम उदाहरण आहे. हे इडियटमधील बंधुभावाचे आगळे चित्रण आणि हा क्रॉसच्या अदलाबदलीचा प्रसंग हे अजरामर झाले आहेत. क्रॉसच्या अदलाबदलीच्या प्रसंगाचा अन्वयार्थ अनेकांनी अनेक तऱ्हेने लावला आहे. परंतु गुन्हेगाराच्या खुनासारख्या कृत्यात आणि त्याच्या पापभावनेत देखील सहभागी होण्यापर्यंत हे ' बंधुत्व ' मजल मारते हे खरे.

' दि इटर्नल हजबंड ' मध्येही दस्तएवस्कीने बंधुभाव साकारणाऱ्या मैत्रीचे असेच आगळेवेगळे दर्शन घडविले आहे. पावेल पावलोविच आणि वेल्यानिनोफ हे दोन मित्र अनेक वर्षांनी एकत्र येतात. अपघाताने त्यांची गाठभेट होते. आणि मग त्यातूनच जुनी मैत्री कशी नवी होते आणि पावेल पावलोविच हा वेल्यानिनोफला ठार मारायला कसा उठतो हे दस्तएवस्कीने रंगविले आहे. पावेलची मुलगी लिझा ही प्रत्यक्षात वेल्यानिनोफपासून झालेली असते आणि पावेलला आपल्या बायकोच्या या दुर्वर्तनाची कल्पना असते, ही या कथेतील महत्त्वाची घटना आहे. या मैत्रीचे वर्णन करताना दस्तएवस्की म्हणतो– "द्वेषभावनेपोटी तो (पावेल) माझ्यावर (वेल्यानिनोफवर) प्रेम करीत होता. सगळ्या प्रेमात हे अगदी विचित्र असते."

अनुक्रमणिका

खरोखरच दस्तएवस्की बंधुभावाची नाती ढोबळपणे कधीच रंगवीत नाही. तो गुंतागुंतीची असतात आणि त्यांच्यात बिघाड झाला की त्यातून द्वेष, तिरस्कार या भावनाही कशा पेटतात हे तो अतिशय कौशल्याने दाखवितो. या द्वेषातून माणूस कोणत्या थराला जाऊ शकतो हे पाहून आपण स्तिमित होतो.

ही बंधुत्वाच्या नात्यातील गुंतागुंत त्याच्या अगदी सुरुवातीच्या ' दि लँडलेडी ' सारख्या कादंबरिकेतही आहे. ऑर्दिनोफ आणि लिझा यांचे संबंध असेच संमिश्र आहेत. काही वेळा ते प्रियकर-प्रेयसीचे तर काही वेळा ते बहीण-भावंडांचे तर काही वेळा ते मित्र-मैत्रिणीचे असे वाटत राहतात. 'दि ह्यूमिलिएटेड अँड इन्सल्टेड' मधील ' लेखक' नेलीवर तर बहिणीप्रमाणे प्रेम करतोच; पण त्याच्या प्रेयसीचा प्रियकर प्रिन्स आल्येशाही त्याचा शत्रू न होता जवळचा मित्र बनतो. प्रिन्स मिश्किनने रोगोझिनविषयी बाळगावा त्याच्यापेक्षा कितीतरी अधिक निरामय भ्रातृभाव तो आल्येशाविषयी बाळगतो.

दस्तएवस्कीला ' नॉर्मल ' माणसांमधील बंधुभाव रंगविता येत नाही असे मात्र नाही. " क्राइम अँण्ड पनिशमेण्ट " मधील रास्कोलनिकोफ आणि राझुमिहिन यांची मैत्री अशीच हृद्य परंतु साधीसरळ आहे. या संबंधाचा शेवट राझुमिहिन आणि रास्कोलनिकोफची बहिण दुन्याशा यांचा विवाह होण्यात होतो हेही सरळ आहे. परंतु यात राझुमिहिन रास्कोलनिकोफला अखेरपर्यंत किती हळुवारपणे आणि कौशल्याने सांभाळतो याचे हृद्य चित्रण दस्तएवस्कीने केले आहे. दस्तएवस्कीची बंधुत्वकल्पना न्याहाळावयास कोणी निघाले, की चटकन राझुमिहिन डोळ्यांसमोर उभा राहतो ते काही उगीच नाही.

विशेष म्हणजे स्त्री–पुरुषातील उत्कट प्रेम रंगवितानादेखील बंधुभावाचा धागा दस्तएवस्की विसरू शकत नाही. पूर्ण वैषयिक प्रेम, शृंगार यांचे चित्रण तो क्वचितच करसो. संभोगवर्णनांचा तर प्रश्नच उद्भवत नाही. प्रिन्सला नास्तासिया विषयी वाटणाऱ्या प्रेमात वैषयिकता फार कमी आहे. तिला वाचविण्याच्या भावनेतून हे प्रेम निर्माण होते. भावाने बहिणीचे संरक्षण करावे अशा धडपडीचे स्वरूप त्याच्या प्रेमाला येते. नास्तासियाच काय परंतु अग्लायावरील प्रेमातही हे रंग डोकावतात.

रास्कोलनिकोफ आणि सोनिया यांचेही नाते विशुद्ध स्त्री–पुरुष प्रेमाचे नाही. रास्कोलनिकोफ ' लाझारस ' तर सोनिया ' ख्राईस्ट ' आहे. बंधुत्वभावाच्या पोटीच सोनिया रास्कोलनिकोफला ' वाचविते ', आणि पापमुक्तीच्या वाटेवर आणून सोडते. झोसिमा मिखाईलला वाचवितो त्याच प्रमाणे ती रास्कोलनिकोफला वाचविते. रास्कोलनिकोफने पाडलेले खून हे ' पाप ' आहेत. आणि त्यासाठी शिक्षा सोसून परिमार्जन करणे हे आवश्यक आहे. हे परिमार्जन केल्याशिवाय तो नव्याने जीवनाला सुरुवात करूच शकणार नाही ही श्रद्धा ती त्याला अखेरीस स्वीकारायला लावते. पांगळ्या मेरी लेब्यातकिनला स्तावरोजिन तर पांगळ्या लिझाला आल्येशा त्यांच्या प्रेमाने असेच वाचवू पाहत नाहीत काय ?

बंधुत्वाचे सामर्थ्य दस्तएवस्की रंगवितो. पण हेच बंधुत्व कसे नष्ट होते, हेही तो तितक्याच सामर्थ्याने ' डेव्हिल्स ' मध्ये रंगवितो. समाजवादी जहाल क्रांतिकारक बंधुतेविषयी बोलतात, स्वतःला ' कॉम्रेड ', ' साथी ' म्हणवून घेतात आणि आंतरराष्ट्रीय बंधुभावाचा उद्घोष करतात. परंतु त्यांची गुप्तता, कट, कारस्थाने, साधनांबिषयीची बेपर्वाई यामुळे ते स्वतःचेच सहकारी व नंतर विरोधक ह्यांना कसे ठार करतात आणि पर्यायाने बंधुत्वाचीच कशी होळी करतात याचे भेदक चित्रण दस्तएवस्कीने या त्याच्या विख्यात कादंबरीत केले आहे. बंधुतेला समाजवादी क्रांतिकारक कशी तिलांजली देतात आणि नवी हुकूमशाही व गुलामगिरी निर्माण करतात यावरील अनेक कादंबऱ्या आज उपलब्ध आहेत. ' दि डार्कनेस अॅट नून ', ' डॉक्टर झिवागो ' किंवा 'दि फर्स्ट सर्कल' ही तर सुपरिचित उदाहरणे. परंतु अशा सर्व कादंबऱ्यांचे ' उगमस्थान ' डेव्हिल्स आहे हे आवर्जून लक्षात ठेवण्यासारखे आहे. डेव्हिल्स मधील पीटर वेरहोवेन्स्की ही व्यक्तिरेखा बीजरूपाने स्तालीनच आहे हे अगदी सहजपणे समजू शकते. दस्तएवस्कीचे हे चित्रण इतके तंतोतंत खरे ठरणारे भाकीत होईल याची दस्तएवस्कीमधील प्रेषितालाही इतकी कल्पना असेल काय ?

अनुक्रमणिका

बुद्धिवाद, कमालीचा आत्मकेंद्रीपणा, पैसा आणि सत्तेचा मोह, हे बंधुभावनेला कसा सुरुंग लावतात हे दस्तएवस्की दाखवितो. परंतु जातीयता किंवा धर्मांधता हेही कसा बंधुभावाचा बळी घेऊ शकतात हे त्याने कोठेही चित्रित केलेले नाही. त्यांचा डावपेचात्मक तर उपयोग कोठेच नाही. म्हणजे ख्रिश्चन मुलगा आणि मुसलमान तरुणी यांचे प्रेमप्रकरण होणार आणि मग त्याला दोन्ही बाजूच्यांचा विरोध होणार किंवा ज्यू आणि रशियन मित्रांच्या मैत्रीचा आविष्कार या दोन समाजातील दंगलीच्या पार्श्वभूमीवर दाखवायचा किंवा फ्रेंच सैनिकाला एखादा रशियन सैनिक कसा सहानुभूतीपोटी मारायचे सोडून देतो असे दाखवायचे असे प्रकार तो कधी करीत नाही. बंधुभावाची कल्पना सहजपणे त्याच्या विचार-विश्वात शिरताना दिसते आणि तितक्याच सहजपणे कादंबऱ्यांत महत्त्वाची भूमिका पार पाडताना दिसते. उत्तरोत्तर तिचे तेज जास्तच प्रखर होत जाते.

दस्तएवस्कीचा 'बंधुत्वविचार' आज आपल्याला जास्तच विचार करायला लावतो. कारण या क्रांतिकारक भावनेचे, या मूलभूत मूल्याचे जुने शत्रू आजही जिवंत आहेतच. उलट यांत्रिक जीवन, विभक्त कुटुंबसंस्थेचीही मोठी पडझड, आणि जीवघेणी जीवन 'स्पर्धा' हे नवीन शत्रू आता तिला ग्रासत आहेत. अशा वेळी दस्तएवस्कीचा बंधुत्वविवेक आठवणे अपरिहार्यच होय. ज्या समाजाला वेश्या, गुन्हेगार, अपंग, विकृत, मनोरुग्ण यांचे खऱ्या अर्थाने पुनर्वसन घडवून आणावयाचे आहे, त्यांना माणूस म्हणून वागणूक देऊन विकसित करावयाचे आहे त्याला दस्तएवस्की नेहमीच प्रेरणा देत राहील. ज्यांना देश, भाषा यांच्या मर्यादा ओलांडून जगाचे वाङ्मय, इतिहास, यांचे आकलन करावयाचे आहे, जगाचे नागरिक बनण्याची ज्यांची आकांक्षा आहे त्यांनाही दस्तएवस्कींचे विश्वबंधुत्व मार्गदर्शक ठरेल. दस्तएवस्कीचे 'बंधुत्व' ही आधुनिकतेची आध्यात्मिकताच आहे असे म्हटले पाहिजे.

समाजात विकृत आणि आजारी माणसे, गुन्हेगार, खुनी आणि आत्महत्यारी लोक, स्त्रियांची अब्रू लुटणारे गुंड निर्माणच होऊ न देणे आणि त्यासाठी अहर्निश सावधपणे झटणे हे कनफ्यूशसमार्गी, रामदासी शहाणपण होय. परंतु अशी माणसे निर्माण तर होतातच. त्यांच्या पुनर्वसनासाठी आणि मुक्तीसाठी सुजाण प्रयत्न करणे हे ख्रिस्ताचे आणि दस्तएवस्कीचे शहाणपण होय. पहिले शहाणपण प्रतिबंधक, दक्षता स्वरूपाचे आहे तर दुसरे शहाणपण इलाजात्मक, निवारक स्वरूपाचे आहे. या दोहोंचीही आज आपणास सारखीच आवश्यकता आहे.

डॉ. मेहेंदळेंच्या परीक्षणाचा परामर्श

शरद् पाटील

'नवभारत'च्या एप्रिल अंकात आलेला माझा लेख डॉ. म. अ. मेहेंदळेंनी केलेल्या माझ्या पुस्तकाच्या परीक्षणाची प्रतिक्रिया म्हणून नव्हता. त्याचे प्रयोजन वेगळे होते. तरीही तो काहीसा डॉ. मेहेंदळेंच्या परीक्षणाच्या 'इन अँटिसिपेशन' होता. त्याचे प्रयोजन वेगळे असल्यामुळे व डॉ. मेहेंदळेंचे परीक्षण मला वाचायला मिळण्याआधीच तो नवभारतला पाठवला गेल्यामुळे त्यांच्या सर्व मुद्द्यांचा परामर्श घेता येणे मला शक्य नव्हते. या लेखात मी तो प्रयत्न करणार आहे.

शब्दाचा सामाजिक संदर्भ

'महारतातील नियति व आयति' (नवभारत, फेब्रु. ८३) या लेखात डॉ. मेहेंदळेंचा दृष्टिकोन नियतिवादी, परत्वे अध्यात्मवादी, असल्याचे मी दाखवले आहे. त्यांच्या प्रस्तुत परीक्षणावरून त्यांचे प्रमाणशास्त्र प्रतिबिंबवादी असल्याचे दिसते. व्याकरणात वा शब्दकोशात दिलेल्या शब्दाच्या अर्थापलीकडे त्याचा अभिप्रेत वा सामाजिक संदर्भातला अर्थ ते मान्य करायला तयार नाहीत.

शब्दाचा सामाजिक संदर्भातला अर्थ दोन प्रकारे घ्यावा लागतो. एक प्रकार आहे तत्कालीन सामाजिक संदर्भातला अर्थ. 'भारतीय विवाहसंस्थेचा इतिहास' मध्ये वि. का. राजवाडे 'अयोनिज' शब्दाचा अर्थ तत्कालीन सामाजिक संदर्भातून देतात. 'यज्ञमंडपात वामदेव्य व्रत करीत असलेल्या ऋत्विजाशी महिषीने संभोग करून झालेले अपत्य' हा 'अयोनिज'चा अर्थ त्यांनी तत्कालीन सामाजिक संदर्भातून दिला आहे.

पण, सामाजिक संदर्भ नित्य नसतो; तो अनित्य असतो. त्यामुळे शब्दाचे काही अर्थ लुप्त होतात. हे लुप्त अर्थ देण्यासाठी शब्दाचा अर्थ ऐतिहासिक विकासक्रमाच्या संदर्भातूनही लावावा लागतो. गणिका या शब्दाचा 'उत्तमा वेश्या' हा अर्थ बुद्धकालीन दासप्रथाक संघगण (oligarchy) समाजव्यवस्थेतला आहे. पण त्याच समाजात गणी व संघी या शब्दांचे अर्थ अनुक्रमे गणप्रमुख व संघप्रमुख असे होत होते. गणिकेचे संघगणसमाजात तोपर्यंतही पवित्र व अभिवृद्धिकारी असलेले पद व गणिका अम्बपाली करीत असलेले भूमातेचे धार्मिक प्रतिनिधित्व यांचा मेळ घातला, की गणिकेचा मूळ अर्थ आपल्या हाती लागतो– स्त्रीसत्ताक गणाची राणी !

तत्कालीन सामाजिक संदर्भातला अर्थ हा जरी तर्कशुद्ध अनुमानाने काढलेला असला, तरी तो तत्कालीन सामाजिक जाणिवेतलाच असतो. ऐतिहासिक संदर्भातला अर्थ मात्र गत व लुप्त झालेला असल्यामुळे तो तत्कालीन सामाजिक नेणिवेतला असतो. **म्हणून, शब्दाचा सम्यक् अर्थ लावायचा, तर तत्कालीन सामाजिक जाणीवनेणिवेआधारेच त्याची 'पुनर्रचना' करावी लागते. शब्दार्थ अशा प्रकारेच इतिहासआकलनाचे साधन बनू शकतो. अनित्यात्मक ज्ञानोपलब्धीच्या प्रमाणशास्त्राची (*epistemology*) घडण म्हणूनच केली गेली आहे.**

प्रतिबिंबवादी व्युत्पादन

डॉ. मेहेंदळेंचे व्युत्पादन नित्यात्मक प्रतिबिंबवादी असले, तरी दिसायला शिस्तबद्ध व संयुक्तिक वाटते, अभिजात व्याकरणाचे व व्युत्पादनाचे संरक्षक वाटते–

'(३) भाषेतल्या शब्दांचे नाम †, आख्यात §, उपसर्ग ¶ व निपात $ असे चार प्रकार निरुक्तात सांगितले आहेत (१.१). पैकी नाम, आख्यात व निपात यांना स्वतंत्रपणे अर्थ असतो ह्याबद्दल वाद

† Noun ¶ Preposition
§ Verb $ Particle

अनुक्रमणिका

नाही. फक्त उपसर्गांना स्वतंत्रपणे अर्थ असतो की नाही– कारण भाषेत त्यांचा उपयोग नामाख्यातांशी संबद्ध स्वरूपात आढळतो– ह्याविषयी वाद होता. त्याबाबतीत गार्ग्य व शाकटायन यांची भिन्न मते होती (नि. १.३). उपसर्गांच्या योगामुळे नामाख्यातांचा अर्थ बदलतो. गार्ग्याच्या मते हा जो अर्थात बदल घडून येतो, अर्थविकार निर्माण होतो, तो उपसर्गाचाच स्वतंत्र अर्थ समजावा. दुसरे मत शाकटायनाचे. त्याच्या मते उपसर्ग जेव्हा नामाख्यातांशी संबद्ध नसतात, तेव्हा त्यांना स्वतंत्र शब्द म्हणून अर्थ असत नाही. परंतु जेव्हा ते संबद्ध असतात, तेव्हा नामाख्यातांना त्यांच्या मूळ अर्थाहून जो निराळा अर्थ प्राप्त होतो, त्यांचा त्या अर्थाशी जो दुसरा संयोग (उपसंयोग) घडून येतो त्या संयोगाचे उपसर्ग केवळ द्योतक असतात, त्या विशेष अर्थाचे ते वाचक असत नाहीत.

'ही दोन मते मला जशी समजली तशी सांगण्याचे कारण असे, की श्री. पाटील यांनी शाकटायनाचे म्हणून मत सांगताना– ज्यापासून त्यांनी स्वतःला सोयीचा असा निष्कर्ष काढला आहे– घोटाळा केला आहे. ते म्हणतात : "दुसऱ्या एका वैयाकरणाचे, शाकटायनाचे, प्रतिपादन मात्र समाधानकारक विवरण करते– 'न जोडलेले उपसर्ग... अर्थविहीन असतात; ते नामे व क्रियापदे यांचेच साहाय्यक अर्थ व्यक्त करतात.' या सिद्धांताप्रमाणे निर् हा उपसर्ग ऋतिचा अर्थ उलटा करीत नाही, तर ह्याला पुष्टीच देतो". (पृ. १०२).

'श्री. पाटील यांचा शाकटायनाच्या मताविषयीचा खुलासा कोणी मान्य करील असे वाटत नाही. ...श्री. पाटील यांना 'निस्' या उपसर्गापासून पुष्टि देणारा अर्थ मिळवायचा होता तर त्यासाठी शाकटायनाच्या मताचा विपर्यास करण्याची आवश्यकता नव्हती....'

संदिग्धता राहू नये यासाठी वै. का. राजवाडेंनी 'निरुक्ताचे भाषांतर'मध्ये याबाबत जे विवरण केले आहे त्याचा कित्ता देतो–

'न निर्बद्धाः उपसर्गाः अर्थान् निराहुः इति शाकटायनः।

'उपसर्ग जर नामांना व क्रियापदांना जोडले नसले (निर्बद्धाः) तर त्यांना काही अर्थ नसतो असे शाकटायन म्हणतो.

'**टीप** :– स्वतः उपसर्गांना काही अर्थ नसतो. नामे व क्रियापदे यांमध्ये लपून राहिलेला अर्थ उपसर्ग बाहेर काढतात एवढीच त्यांची कामगिरी असे महाभाष्यकारांचे मत आहे.

'नामाख्यातयोः तु कर्मोपसंयोगद्योतकाः भवन्ति।

'नामे व क्रियापदे ह्यांच्यामध्ये काही ज्यास्त अर्थ आला आहे (कर्मोपसंयोग), हे फक्त उपसर्ग दाखवतात (द्योतकाः भवन्ति). उपसर्गांना स्वतःचा अर्थ नाही, ते नामे आणि क्रियापदे ह्यांचा ज्यास्त अर्थ दाखविणारी केवळ चिन्हे होत. 'तु' या निपाताने दोन मतांपैकी शाकटायनास कोणते मत पसंत होते हे दाखविले आहे.

'उच्चावचाः पदार्थाः भवन्ति इति गार्ग्यः।

'उपसर्ग पदे असून त्यांचे नानाप्रकारचे अर्थ होतात असे गार्ग्य म्हणतो.

'**टीप** : पदार्थाः – पदानां अर्थाः। उपसर्गाः पदानि। तेषां पदानां उच्चावचाः अर्थाः असा अन्वय केला पाहिजे.

'तत् यः एषु पदार्थः प्राहुः इमे तम्।

'ह्यांच्यामध्ये जो अर्थ दिसतो तो हे सांगतातच.

'**टीप** : यः एषु पदार्थः ह्याची एषु पदेषु यः अर्थः अशी फोड केली पाहिजे. उपसर्ग ह्या पदांमध्ये जो अर्थ दिसतो तो त्यांचाच अर्थ आहे : 'नामे व आख्याते' ह्या पदांचा तो अर्थ नाही असे गार्ग्य ठासून सांगतो.' (पा. ९–१०).'

वैदिक व्याकरणातील दोन पक्ष

या दोन वैयाकरणांत दार्शनिकही मतभेद होते हे लक्षात घ्यायला डॉ. मेहेंदळे तयार नाहीत. आमचे हे वैयाकरण आपल्या मतांचा व मतभेदांचा पुरस्कार दार्शनिक पद्धतीने करीत असत. त्यांचे दार्शनिक दृष्टिकोन समजून घेतल्याशिवाय त्यांचे मतभेद किती मूलाग्रही व तीव्र होते हे समजणार नाही.

शाकटायन म्हणतो की, उपसर्ग हे पद नसल्याने निरर्थक असते, तर गार्ग्य म्हणतो की, उपसर्ग हे पद असल्याने त्याला स्वतःचा अर्थ असतो. शाकटायन म्हणतो की, नामधातूंच्या अर्थात बदल त्यांच्यांतच अंतर्हित असून उपसर्गाशी झालेल्या त्यांच्या '**उप-**

संयोगाने' तो केवळ **आविष्कृत** होतो, तर गार्ग्य म्हणतो की, नामधातूंच्या अर्थात बदल त्यांच्यांत अंतर्हित नसून उपसर्गाशी झालेल्या त्यांच्या '**संयोगाने**' तो **जन्माला** येतो. शाकटायनोक्त बदलाला भारतीय दर्शनात खास शब्द आहे– 'सत्कार्यवाद'; म्हणजे, कार्य कारणातच अनाविष्कृत अवस्थेत अस्तित्वात असणे (कार्यं सत्।). तसेच गार्ग्योक्त बदलाला खास शब्द आहे– 'असत्कार्यवाद'; म्हणजे, कार्य कारणात अस्तित्वात नसणे (कार्यम् असत्।) व नव्याने जन्माला येणे. शाकटायनोक्त सिद्धान्त सांख्य दर्शनाचा आहे: सर्व बदल प्रकृतीतच अनाविष्कृत अवस्थेत अस्तित्वात असतात आणि पुरुषांशी होणाऱ्या 'उपसंयोगांतून' ते केवळ आविष्कृत होत जातात. सांख्य दर्शन स्त्रीसत्तेच्या 'पदार्थांमधून' (categories) कसे जन्माला आले हे मी 'दास–शूद्रांची गुलामगिरी'च्या १ ल्या भागात दाखवले आहे. ते मुळातच अब्राह्मणी कसे होते हे गार्बेने 'सांख्य फिलॉसफी'त सिद्ध केलेले आहे, तर ते अवैदिक कसे होते हे देवीप्रसाद चट्टोपाध्यायांनी 'लोकायत'मध्ये सिद्ध केले आहे. याउलट, वस्तूत बाहेरून बदलाचा गार्ग्योक्त सिद्धान्त न्याय–वैशेषिक या ब्राह्मणी दर्शनाने उपनिषदीय परंपरेतून पुरस्कारलेला होता. बदलाच्या या दोन सिद्धान्तांत कोणता जास्त वास्तविक व वैज्ञानिक हे मत मांडायचा वा बाजू घ्यायचा येथे प्रश्न नाही. भारतीय व्याकरणात असलेले दार्शनिक पक्ष समजून घ्यायचा प्रश्न आहे.

विरोधाची तीव्रता

या दोन पक्षांत विरोध किती व कसा तीव्र होता हे महामहोपाध्याय काशीनाथशास्त्री अभ्यंकर 'व्याकरण महाभाष्य'च्या प्रस्तावनाखंडात सांगतात–

'...भाषेतील प्रत्येक शब्द धातुसाधित असतो व त्याप्रमाणे प्रत्येक शब्दाची व्युत्पत्ति देता येते असे निरुक्तकारांचे म्हणणे होते, तर वैयाकरणांचे म्हणणे सर्वच शब्द धातुसाधित नसतात असे होते. पाणिनिकाली व त्यानंतर हे मतभेद फार तीव्र स्वरूपाचे झाले; ते इतके की, जर एखाद्या व्याकरणकर्त्याने नैरुक्त मताचे प्रतिपादन केले तर त्याची वैयाकरणांमध्ये निन्दा होत असे. शाकटायनाचीही त्यावेळी अशा प्रकारे निंदा होत असे हे "नाम च धातुजमाह निरुक्ते व्याकरणे शकटस्य च तोकम्" (नाम म्हटले को ते धातूपासून साधले जाते असे निरुक्तकार म्हणतात, पण शाकटाचे पोरही तेच म्हणू लागले. म. भा., भाग ३, पृ. २८४) या भाष्यकारांनी उद्धृत केलेल्या श्लोकार्थावरून स्पष्ट होते. भाष्यकार एवढा शेरा देऊनच थांबले नाहीत. शाकटायन शब्दाचीही व्युत्पत्ति केल्यास पाणिनीने नडादि गणामध्ये शकट शब्द घालून शकट शब्दापासून शाकटायन शब्द साधल्यामुळे शकट हा आपला पूर्वज असला पाहिजे असेही शाकटायनाला कबूल करावे लागेल असे म्हणण्यापर्यंत त्यांनी मजल मारली आहे; व 'हा शाकटायन वेड्यासारखा बैलगाड्यांच्या रस्त्यावर बसला असता शेजारून शेकडो बैलगाड्या गेल्या तरी त्याला दाद लागली नाही,' असे म्हटले आहे † (म. भा., भाग ३, पृ. २५०) ...' (पा. १२८)

शाकटायनाने सर्व नामे धातुसाधित असतात या मताचा का पुरस्कार केला? कारण धातु हे 'प्रकृति' असल्याचे दुर्ग सांगतो. (वै. का. राजवाडे, उक्त, पा. १५१). प्रकृतिपासून विश्व, त्याप्रमाणे धातूंपासून नामविश्व, या सांख्यमताचा शाकटायनाने पुरस्कार करणे स्वाभाविक होते.

निरुक्तकार यास्क इसवीपूर्व ८ व्या ते ७ व्या शतकात होऊन गेला. यास्काने शाकटायनाचा उल्लेख केलेला असल्यामुळे तो यास्कपूर्व होता हे उघड आहे. मग, पतंजलि यास्काऐवजी शाकटायनावरच एवढा का घसरतो? कारण शाकटायन अब्राह्मणी परंपरेतला होता. शाकटायन नावाचा दुसरा वैयाकरण इ. स. ८१७–८७७ मध्ये होऊन गेला. तो जैन होता. अब्राह्मणी जैन पंथाच्या एका वैयाकरणाने शाकटायन नाव स्वीकारावे यात आद्य शाकटायनाची एवंविशिष्टता दिसून येते. म्हणून कल्पसूत्र अभिमानाने सांगते की, महावीराचे निर्वाण निर्ऋति

† बुद्धाने स्वतःची अशी एकाग्रता गौरवाने सांगितली होती [राहुल सांकृत्यायन व जगदीश काश्यप, दीघनिकाय (हिंदी अनुवाद), पा. १३७–१३८.]

नावाच्या रात्री झाले– 'देवाणन्दा नामं रयणी निरतित्ति पवुन्चइ।' समयसुंदर गणी भाष्य करतो– 'देवानन्दा नाम सा अमावास्या–रजनी निर्ऋतिर् अप्य् उच्यते।'

शकट हे नाव हरिवंशानुसार (२.६) एका राक्षसाचे होते ज्याचा कृष्णाने बालपणी वध केला. येथे पुन्हा अब्राह्मणी परंपरा दृग्गोचर होते. शकट शब्दाचे व्युत्पादन श(स)+कट असे केले, तरच हे नाव एवढे वादळी का याचा अर्थबोध होतो. कटंकटी हे मातृदेवतेचे बिरुद आहे. कट म्हणजे देवीक्षेत्र, चौपटावरील सोंगटीचे अभयस्थान व द्यूतातील जिंकायचा डाव. पुरुषसत्ताक इंद्राने उषावधाबरोबर शकट–(अनस्–) भंजन करून ज्याप्रमाणे मातृवंशक सिंधुसंस्कृतीचा विध्वंस सूचित केला, त्याप्रमाणे पुरुषसत्ताक कृष्णाने शकटभंजनाबरोबर पूतनावध करून तत्कालीन स्त्रीसत्तेचा विध्वंस सूचित केला. या प्रदीर्घ सामाजिक संघर्षाचे प्रक्षेपण व्याकरणात होणे क्रमप्राप्त होते. कारण माणसाचे सामाजिक संघर्षाचेही माध्यम भाषाच असते.

अध्यात्मवादी प्रमाणशास्त्राचे वैशिष्ट्य हे की, ते व्याकरणात सामाजिक संदर्भाप्रमाणे सामाजिक संघर्षही पाहायचे वा मान्य करायचे टाळते. निस् उपसर्ग पुष्टिकारकही आहे हे जर मी शाकटायन विरोधी गार्ग्य यांच्या संघर्षाबाहेर पाहिले तर ते डॉ. मेहेंदळेंना मंजूर आहे!

'...तेव्हा नामाख्यातांच्या अर्थाला उलटा करणारा 'निस्' उपसर्गाचा अर्थ त्यांना निर्ऋति ह्या शब्दात नको होता, तर ते तो एरव्हीही टाळू शकले असते. निस् उपसर्गाचा "it has the sense of a strengthening particle: 'throughly', 'entirely', 'very' असा अर्थ कोशात आढळतो. तेव्हा श्री. पाटील निस् उपसर्गाचा हा 'पुष्टि' देणारा अर्थ घेऊ शकले असते. यास्काने जरी निस् उपसर्गाचा 'अभिपूजनाच्या' उलट असा एकच अर्थ दिला आहे (१.३), तरी खुद्द त्याच्या ग्रंथाचे जे 'निरुक्त' असे नाव आहे त्यातील 'निस्'चा 'निःशेषेण', 'निराकाङ्क्षतया' असा पुष्टिकरच अर्थ टीकाकार देतात.'

म्हणजे 'निस्' चा जो अर्थ यास्काला मान्य नाही तो त्याच्या ग्रंथाच्या निरुक्त या नावाधारे मी दिला असता, तर मी तो अनधिकाराने लावल्याचाही आक्षेप डॉ. मेहेंदळेंनी मग घेतला असता! सर्व नामे धातुज असतात या शाकटायनाच्या सिद्धान्ताशी यास्क जरी सहमत होता, तरी व्याकरणातील बाकी सैद्धान्तिक संघर्षात तो ब्राह्मणी पक्ष उचलून धरीत असल्यामुळेच तो शाकटायनाप्रमाणे ब्राह्मणी हल्ल्याचे लक्ष्य झाला नाही.

वैराज्य

संस्कृत भाषेतील यौगिक (धातुज) व रूढ (अधातुज) हे शब्दांचे भेदच सांगतात की, ती आर्ष अवस्थेतही अनेक भाषांची मिळून झालेली होती. त्यामुळेच तिच्यात एवढी जटिलता, वाद व पक्ष आहेत. आर्ष भाषेच्या घडणकालातच सिंधुसंस्कृतीची अशी भाषा अगोदरच अस्तित्वात असली पाहिजे की, जी नामधातूंच्या उपसर्गांना निरर्थक मानीत होती.

वैराज्य शब्द याचे सर्वोत्कृष्ट प्रमाण आहे. हा शब्द वि+राज्, वि+राट् वरून बनलेला आहे. वैराज्यचा अर्थ काशीप्रसाद जयस्वाल अराजक असा देतात. त्याचा तो अर्थ असता तर महाभारतातील मत्स्य गणाच्या राजर्षीने विराट हा किताब घेतलाच नसता.¶ यास्काने विराट्ची व्युत्पत्ती राज् राजते या धातूत (७.१३) दिली आहे. विराट् ही संपूर्णाक्षरा वा दशाक्षरा असल्याचे तो सांगतो. छांदोग्य उपनिषद् (४.३.८) विराट् ही दशसंख्यक कृत (पालि कट) असून अन्नदेवता असल्याचे सांगते. त्यामुळे राट् ला लागलेला वि हा उपसर्ग गार्ग्यपद्धतीने घेता येत नाही.

राज् या धातूचा अर्थ निघण्टूने व निरुक्ताने राज्य करणे असा दिला आहे. राष्ट्री हा शब्द राट्चा पर्यायवाची आहे. ८.१००.१० या ऋचेतील 'राष्ट्री देवानां'चा अर्थ दुर्गने 'ईश्वरा माध्यमिकानां देवतानाम्' असा दिला आहे (११.२८).

¶ मत्स्यांची मातृदेवता विराट् असावी. म्हणजे त्यांच्या मूळ स्त्रीराज्याच्या राणीचा तो किताब असावा. तिच्या वंशातील राजर्षींनी मग विराट हा किताब घेतला. विराटाच्या उत्तर या मुलाला वैराटि म्हटले आहे. जसे अरुण, अरुणपुत्र आरुणि व आरुणिपुत्र आरुणेय.

त्याचा अर्थ वै. का. राजवाडे असा देतात– 'अंतरिक्षातील देवतांवर सत्ता चालविणारी' (उक्त, पा ९१३). यावरून विराट् या शब्दातील वि या उपसर्गाला स्वतःचा काहीही अर्थ नसून तो राट् या नामातील अंतर्हित अर्थच अविष्कृत करतो हे स्पष्ट होते. हे व्युत्पादन गार्ग्यपद्धतीने न होता शाकटायनपद्धतीनेच होऊ शकते हेही स्पष्ट होते.

येथे पुन्हा अब्राह्मणी परंपरेचा आधार घ्यावा लागतो. 'उत्तररामचरित' नाटकात राम शूद्र शंबूकाचा वध करून त्याच्या 'आत्म्याला' वर देतो–

"यत्र आनन्दाश् च मोदाश् च यत्र पुण्याश् च संपदः ।
वैराजा नाम ते लोकास् तैजसाः सन्तु ते ध्रुवाः ॥"

("जेथे आनंद, प्रमोद व पुण्यमय संपदा आहेत, त्या तेज:पुंज वैराज लोकांमध्ये तुझा ध्रुव निवास होवो!")

वैराज्य हा शूद्रांचा स्वर्ग होता. वैराज्य शब्दाचा मूळ अर्थ स्त्रीराज्य होता!

नापीकतेची देवता!

निर्ऋतिचा अर्थ गार्ग्यपद्धतीनेही पुष्टिकारक लावायची मला परवानगी देऊन डॉ. मेहेंदळे स्वतः मात्र ती निष्फलतेची, नापीकतेची देवता असल्याचे प्रतिपादतात–

'अवेस्तात 'अषि' (स्त्री.) शब्दाचा अर्थ 'केलेल्या कर्मांचे–चांगल्या वा वाईट– फळ,' तसेच '(त्या प्रकारचे) फळ देणारी देवता' असा आहे. त्यास अनुसरून आपण संस्कृत ऋति शब्दाचा अर्थ 'फळ, परिणाम' असा मानला, तर 'निर्ऋति' चा अर्थ 'निरर्थक, ज्यापासून काही निष्पन्न होत नाही' असा होईल. ऋति शब्दाची व्युत्पत्ती 'ऋ' धातूपासून मानली आहे (१.१८). ते मत स्वीकारले तर 'निर्ऋति' (निर्–ऋ–ति) व निरर्थ' (निर्–अर्–थ) हे दोन्ही एकाच धातूपासून साधलेले शब्द ठरतील.

'परंतु या व्युत्पत्ती निश्चित नसल्यामुळे आपणास त्यांचा आधार घेण्याचे कारण नाही. अवेस्ताच्या आधारेच 'निर्ऋति' चा अर्थ 'निष्फळ, व्यर्थ' असा ठरू शकेल, आणि तदनुसार निर्ऋति देवता ही एखादी वस्तू वा कार्य निष्फळ बनविणारी देवता, असा अर्थ होईल. वैदिक वाङ्मयात निर्ऋतिविषयीची जी कल्पना आढळते, तिच्याशी हा अर्थ सुसंगत दिसतो. निर्ऋति देवतेचा हविर्भाग जमिनीत जिथे नैसर्गिकपणे खोलगट भाग निर्माण झाला असेल, जमिनीला जिथे चिरा पडल्या असतील अशा ठिकाणी देण्यात येई. त्या जमिनीत काही पेरणे शक्य नाही, अथवा जिथे पेरल्यास काही उगवणार नाही अशी ती जमीन असे (यत्र वा अस्या अवदीर्यते यत्र या अस्या ओषधयो न जायन्ते निर्ऋतिर्हास्यै गृह्णाति। श. ब्रा. ७.२.१.८). भूमीचा हा भाग नापीक असतो. कारण त्या भागावर निर्ऋतीची पकड आहे, तिचा तेथे वास आहे असे समजण्यात येई.'

तळटीपेत ते म्हणतात– 'श्री. पाटील म्हणतात (पृ. ११०) तशी निर्ऋति ही सुपीकतेची देवता मानण्यास आधार नाही.'

सुपीकतेची देवता

निर्ऋति जर मुळात नापीकतेची देवता असती, तर राजसूय यज्ञात तिला काळ्या कमोद तांदळाचा घाटा (चरु) अर्पण केला गेला नसता– 'नैर्ऋतं चरुं परिवृक्त्यै गृहे कृष्णानां व्रीहीणां नखनिर्भिन्नं कृष्णा कूटा दक्षिणा।' तैत्तिरीय संहिता, १.८.९. ऋग्वेदाच्या ओषधिसूक्तात (१०.९७) पहिल्या ऋचेने निर्ऋतीचे जे स्तवन केले गेले आहे, त्याचे भाषांतर महामहोपाध्याय सिद्धेश्वरशास्त्री चित्राव 'ऋग्वेदाचे मराठी भाषांतर'मध्ये खालीलप्रमाणे देतात–

'१. निर्ऋत्युत्पन्न (त्रियुत), देवनिर्मित, पिंगलवर्णीय, आणि पुरातन वनस्पतींची एकशेसात मर्मस्थाने आहेत.' (पा. ६९०)

जी देवता वनस्पतिसृष्टीला जन्म देते ती मुळात नापिकीची देवता कशी असू शकते?

निर्ऋति ही सुपीकतेची (fertility) देवता होती काय? जगभर व भारतात मातृदेवतांची पूजा पूर्णघटांच्या रूपात केली जाते. नवरात्रात दुर्गापूजा पूर्णघटाच्या रूपात. गुजराथेत गौरीपूजा पूर्णघटाच्या रूपात. बंगालमध्ये कालीपूजा पूर्णघटाच्या रूपात. घटपूजा म्हणजे नदीवक्त्र शेतीचा धार्मिक व वैधिक अवशेष असल्याचे देवी-

प्रसाद चट्टोपाध्यायांनी 'लोकायत'मध्ये (पा. २९४–२९७) सिद्ध केले आहे. शतरुद्रियांच्या अग्निचयनात वेदीच्या नैर्ऋत्य दिशेला जाऊन आत दगड ठेवलेला पूर्णकुंभ फेकायचा विधी सांगितलेला आहे (शतपथ ब्राह्मण, ९.१.२.९). हा पूर्णकुंभ निर्ऋतीचे प्रतीक असून आतला दगड गर्भाचा. शत्रूंनी येथे घटस्थापनेच्या विधीचे घटस्फोटाच्या विधीत रूपांतर केलेले आहे. कशावरून ?

शतपथ ब्राह्मणाची रचना इसवीपूर्व ६०० त पूर्ण झाली. तैत्तिरीय संहितेचा काळ इसवीपूर्व १००० मानला जातो. तीत (५.२.४) उख्याग्निसंवपनात साळीच्या पलाळात भाजलेल्या तीन काळ्या विटा त्याच नैर्ऋत्य दिशेला जाऊन इरिणावर ठेवायचा विनियोग सांगितला आहे–

'नैर्ऋती: कृष्णास् तुषपक्वा भवन्ति, निर्ऋत्यै वा एतद् भागधेयं, यत् तुषा निर्ऋत्यै रूपं, कृष्णं रूपेण एव निर्ऋतिं निरवदयत, इमां दिशं यन्त्य्, एषा वै निर्ऋत्यै दिक्, स्वायाम् एव दिशि निर्ऋतिं निरवदयते, स्वकृत इरिण उपदधाति, प्रदरे वा, एतद् वै निर्ऋत्या आयतनं, स्व एव आयतने निर्ऋतिं निरवदयते ।'

येथे योजलेले क्रियापद उपदधाति (उप+धा) असून त्याचा अर्थ होतो विधिपूर्वक ठेवणे, प्रस्थापना करणे. तसेच येथे इरिणचा पर्यायवाची म्हणून जो प्रदर शब्द योजलेला आहे त्याचा डॉ. मेहेंदळेंनी सांगितला त्याप्रमाणे जमिनीला पडलेली चीर हा अर्थ होतो हे खरे. पण, त्यांच्याच आग्रहाप्रमाणे प्रदरच्या मूळ अर्थासाठी वेदांकडेच वळले पाहिजे. वाजसनेयि संहितेत (२५.७) अश्वाचा मेध केल्यानंतर त्याच्या विविध अवयवांचे संबंधित देवतांना हवन केले जाते. त्यांपैकी एक देवता आहे प्रदर– 'प्रदरान् मायुना।' महामहोपाध्याय श्रीधरशास्त्री पाठक त्यांच्या 'शुक्लयजुर्वेदांतर्गत माध्यन्दिन वाजसनेयि संहितेचा मराठी अनुवाद' मध्ये अर्थ देतात– 'गुदाच्या अवशिष्ट भागाची देवता प्रदरदेव' (पा. ४२३). ग्रामीण भागात मायु शब्दासाठी मायांग हा शब्द प्रचलित आहे. मायांग म्हणजे जननेन्द्रिय. म्हणजे प्रदर ही जननेन्द्रियाची देवता होती. प्रदरचा अर्थ योनीतून रक्तस्राव व्हायचा स्त्रियांचा रोग असाही होतो. वैदिक काळात हा अर्थ होत नव्हता असे जरी गृहीत धरले, तरी इरिणचा अर्थ जमिनीला पडलेली चीर व्हायला प्रदरदेवता ही स्त्रीयोनिदेवताच असली पाहिजे हे उघड आहे.

शिव–रुद्र हा देव वेदपूर्व सिंधुसंस्कृतीचा मानला जातो. त्याचे प्रतीक आहे स्त्रीयोनीत ठेवलेले पुरुषलिंग. अशाप्रकारे इरिण या स्त्रीयोनिनिदर्शक प्रदरदेवतास्थानावर निर्ऋतीचे प्रतीक असलेला गर्भाशयनिदर्शक पूर्णकुंभ प्रस्थापित करणे आणि पूर्णकुंभ हा सिंधुवक्त्र शेतीचे प्रतीक असणे हा सुपीकतेचा विधी नाही तर दुसरे काय आहे? यावरून निर्ऋति ही मुळात सुपीकतेची देवता होती हे निर्णयिकपणे सिद्ध होते.

अधिदेवन विरुद्ध चौपट !

इरिणचा अर्थ दुर्गने 'आस्फुरकस्थानम्' वा 'आस्फारकस्थानम्' असा दिलेला आहे (निरुक्त, ९.८). वै. का. राजवाडे त्याचा अर्थ 'फासे टाकण्याची जागा' असा देतात (उक्त, पा. ६५५). अथर्ववेद ५.३१.६ व ६.७०.१ आणि शतपथ ब्राह्मण ५.४.४.२०, २२-२३ यांचा हवाला देऊन ल्यूडर्स सांगतो की, अधिदेवन म्हणजे फासे टाकण्याची जागा (वेदिक इंडेक्स, खं. १, पा. १९). पण डॉ. मेहेंदळेंच्या मते श्रौतसूत्रकाळापर्यंत तरी अधिदेवनचा अर्थ चौपट होत नव्हता–

'...अधिदेवन म्हणजे द्यूत खेळण्यासाठी भूमी उकरून तयार केलेली खोलगट जागा. हा अर्थ श्रौतसूत्रातील वर्णनावरून स्पष्ट आहे. श्री. पाटील यांना अभिप्रेत असलेली चौपटाची आकृती अधिदेवन शब्दाने निदान श्रौतसूत्रकालापर्यंत तरी निश्चित व्यक्त होत नाही. प्राचीन भारतीय द्यूताविषयी प्रो. ल्यूडर्स यांचा एक माहितीपूर्ण मोठा लेख १९०७ साली प्रसिद्ध झाला आहे. तो श्री. पाटील यांनी पाहिला नसल्यास अवश्य पाहावा.'

ल्यूडर्सने या मोठ्या लेखात अधिदेवनची वाचक कोणती वस्तू होती हे अनिर्णितच ठेवले आहे. अनिर्णितता हे खऱ्या संस्कृततज्ञतेचे लक्षण असल्याचे डॉ. मेहेंदळेंचे मत दिसते !

वाल्मिकि अयोध्येच्या 'प्लॅनचे' वर्णन 'अष्टापद–आकाराम्' असे करतो (१.५.६). टीकाकार

त्याचा अर्थ 'द्यूतफलकं–आकाराम्' असा देतात. अश्वघोष त्याच्या 'सौन्दर–नन्द' या काव्यात कपिलवस्तूचा प्लॅन– 'अष्टापदम् इव आलिख्य,' असा काढला गेल्याचे सांगतो (१.३१). महाराष्ट्रात बलिप्रतिपदेला चौपट (अष्टापद) खेळतात, म्हणून तिला द्यूतप्रतिपद् असेही नाव आहे. केरळात 'ओणम्' मध्ये षट्पद विधिपूर्वक खेळतात. ओणम् हाही बळीराजाचा सण आहे. महाराष्ट्रात चौपट कापडाचा असतो, तर केरळात षट्पद इरिणप्रमाणे जमिनीवर काढतात. हे पुरावे श्रौतसूत्रकाळानंतरचे आहेत, असा आक्षेप डॉ मेहेंदळे घेतील.

कीटागिरि संघगणात (oligarchy) अष्टापदावर व दशपदावर द्यूत खेळले जाई, असे विनयपिटक सांगते– 'अट्ठपदे पि कीळन्ति, दसपदे पि कीळन्ति' (चुल्लवग्गपालि, १.३.२१). हे वर्णन इसवीपूर्व ६ व्या शतकातल्या एका अराजक गणराज्याचे आहे. पण, यादवांच्या आद्यतम अराजक गणराज्याचा उदय इसवीपूर्व ९ व्या शतकात झाला. सिंधुसंस्कृतीच्या उत्तररंगापासून (सुमारे इसवीपूर्व २०००) भारतात राजक (monarchical) गणराज्ये होती. दिवो–दुहिता उषा ही सिंधुसंस्कृतीच्या उत्तररंगातील मातृदेवता होती. तिला १.१२४.७ ही ऋचा 'गर्ता–रुक्' म्हणते. गर्त शब्दाचा अर्थ यास्काने 'सभास्थाणु' असा दिला आहे (३.५). दुर्ग त्याचा अर्थ 'अक्ष–निर्वपण–पीठम् असा देतो. म्हणजे हे अक्षनिर्वपणपीठ गणाच्या सभागृहात असे हे स्पष्ट होते. देवासुरांच्या गणाचा पुरोहित वृत्र हा राष्ट्रगणभूमीचे नियतकालिक वाटप करीत असल्याचे तैत्तिरीय संहिता (२.५.१) सांगते. ते वाटप त्या गणाच्या सभागृहातील अक्षनिर्वपणपीठावरच होत असावे हे उघड आहे.

हा चौपट ठराविक घरांचा असायचा असे नाही. घरांची संख्या गणाच्या कुलसंख्येवर अवलंबून असायची. म्हणून चौपटाचे दशपद व षट्पद हे प्रकार असल्याचे आपल्याला आढळते. त्यावरील कटांची घरे ही राष्ट्र गणभूमीतील देवताक्षेत्रे म्हणून राखून ठेवलेली असायची त्याला ग्रीक नाव temenos आहे. बाकी घरांचे वा क्षेत्रांचे वाटप व्हायचे. कसे ? राष्ट्र गणभूमीवर गणाच्या कुलसंख्येइतकी समान आकाराची क्षेत्रे (प्लॉट्स) आखली जायची. त्यांवर विविध वस्तुपशुपक्ष्यांची चित्रे काढली जायची. तीच चित्रे चौपटावर काढली जायची आणि तेवढ्याच संख्येच्या लाकडी शलाकांवर (अक्ष वा फासे) तीच चित्रे कोरली जायची. सभागृहात बसलेल्या कुलमुख्यांना मग गृहपात्रात ठेवलेले हे फासे काढायला दिले जायचे. कुलमुख्याने सर्पांकित अक्ष काढला की, चौपटावरील सर्पांकित घर व राष्ट्र गणभूमीवरील सर्पांकित क्षेत्र त्याच्या कुलाचे. आदिवासींना वनजमीन वाटताना दहा वर्षांपूर्वी एका पाड्यात थोडी जमीन अनेकांना वाटायचा बिकट प्रसंग आला होता. त्यावेळी मी ही प्राचीन भारतीय पद्धत अवलंबली. वाटप आनंदात पार पडले !

जॉर्ज थॉमसनने 'स्टडीज इन एन्शंट ग्रीक सोसायटी' या महाग्रंथात प्राचीन ग्रीक गणधनवाटपासाठी लॉट (अक्ष) कसे काढीत याचे तत्कालीन चित्रांसह वर्णन केले आहे. डॉ. मेहेंदळेंनी हा ग्रंथ वाचला नसल्यास वाचावा. प्राचीन भारतीय इतिहासाच्या आकलनासाठी केवळ इंडॉलॉजिस्ट होऊन चालत नाही. भारतीय सामान्य जनजीवनाचा, त्यांच्या अब्राह्मणी परंपरेचा व कॅम्परॅटिव्ह मेथडॉलॉजीचाही अभ्यास करावा लागतो.

इरिणावर वा अधिदेवनावर वा चौपटावर अक्षांच्या वा फाशांच्या साहाय्याने गणधनाचे व गणभूमीचे आद्य वाटप भारतात निर्ऋतीने सुरू केले. म्हणून तिला इरिणावर हवन केले जाई– 'स्वकृत इरिणे जुहोति' तै. सं. ३.४.८.

स्फ्य

मी केलेला संस्कृत साहित्याचा अभ्यास अपुरा, पूर्वग्रहानुसारी व विपर्यस्त असल्याची डॉ. मेहेंदळेंची टीका आहे–

'राजसूय यज्ञात खेळल्या जाणाऱ्या द्यूताच्या संदर्भात श्री. पाटील यांनी म्हटले आहे : "राजा लगेच स्फ्यने जमिनीवर चौपटाची आकृती काढी. ..." (पृ. ११६). हे विधान श्री. पाटील यांनी शतपथब्राह्मणातील ज्या भागाच्या आधारे केले आहे तो काढून पाहता असे आढळते, की वरील वाक्यात 'राजा' हा शब्द चूक आहे. 'लगेच' हा शब्द

पदरचा टाकला आहे आणि "चौपट"ची कल्पना पूर्वग्रहानुसारी आहे. शतपथब्राह्मणातील वाक्य आहे ते असे : सजाता च प्रतिस्थाता च एतेन स्फ्येन... अधिदेवनं कुरुतः (श. ब्रा., ५. ४. ४. १९). ह्यावरून आपल्या लक्षात येईल, की अधिदेवन तयार करण्याचे काम राजा करीत नाही तर सजात व प्रतिप्रस्थाता करतात. राजाच्या हातात स्फ्य (तरवारीच्या आकाराचे एक लाकडी उपकरण) आले, की तो ते राजभ्रातृकडे देतो, राजभ्राता ते सुताकडे अथवा स्थपतिकडे देतो व अशा तऱ्हेने हस्तांतर होत होत ते सजातांपर्यंत पोचते आणि मग अधिदेवनाची जागा आखली जाते...'

मी येथे संदर्भ केवळ शतपथब्राह्मणाचा नाही, तर तैत्तिरीय व वाजसनेयि संहितांचाही दिलेला आहे. शतपथब्राह्मणापेक्षा या संहिता जुन्या आहेत हे डॉ. मेहेंदळे अमान्य करणार नाहीत. यज्ञांचे विवरण देतानासुद्धा सामाजिक संदर्भ व तेही ऐतिहासिक विकासक्रमात लक्षात घ्यावे लागतात. उदाहरणार्थ, संहितेतील अश्वमेध यज्ञ व रामायण–महाभारतातील अश्वमेध यज्ञ यांत प्रचंड फरक आहे. संहितेतील अश्वमेध अजूनही गणपरिषदेत होणारी सुपीकता माया (fertility magic) असल्याने घोडा मारून तो गणाने खाल्ला की संपत असे. पण महाकाव्यातील अश्वमेध काय राजसूयही परगणराज्ये जिंकूनच संपन्न व्हायला लागला. दशरथाचा अश्वमेध पुत्रप्राप्तीसाठी झाला व त्यात यज्ञीय अश्व स्वतः कौसल्येने मारला, तर रामाचा अश्वमेध परगणराज्ये जिंकण्यासाठी होता व तो सोन्याची सीता बनवून झाल्याने तिने यज्ञीय अश्व मारायचा प्रश्नच उद्भवला नाही ! यज्ञाचे उर्वरा मायेतून कर्मकांडी धर्मांत रूपांतर होत असताना विधींमध्ये प्रचंड फरक पडणारच. उर्वरा मायेचा स्त्रीसत्ताक गणसमाजात प्रारंभ होऊन पुरुषसत्ताक दासप्रथासमाजात तिचे कर्मकांडी धर्मात रूपांतर कसे झाले हे माझ्या एतद्विषयक विवेचनाचे सूत्र आहे. स्त्रीसत्तेत शासनाबरोबर पौरोहित्यही स्त्रीकडे असल्यामुळे ऋत्विजांच्या बांडगुळांची फौज उर्वरा मायेच्या यज्ञामध्ये असणे शक्यच नव्हते. त्रियुत निर्ऋति स्वतःच गणधनाचे वाटप करी असे १०.११४.२–३ या ऋचा सांगतात–

'तिस्त्रः देष्ट्राय निर्ऋतिः उपासते दीर्घश्रुतः वि हि नानन्ति बह्वयः ।

तस्यां सुपर्णा वृषणा निसेदतुः यत्र देवाः दधिरे भागधेयम् ॥'

ती स्वतःच काष्ठसभेत स्फ्यने इरिण काढी आणि अक्षांनी गणभूमी वाटी. नंतर राजकर्म मातृवंशक राजर्षि करू लागला. पुरुषसत्ताक राजर्षि जेव्हा हे काम करू लागला, तेव्हा तो ही उर्वरामाया असल्याचेही विसरून गेला होता. पण, संहिताकाळात अजूनही विधी करताना राजर्षि व विधी यांमध्ये गणाधिकाऱ्यांचे व ऋत्विजांचे तेवढे व्यवधान आले नव्हते आणि यज्ञकर्मांची नेणीव अजूनही स्त्रीसत्ताक उर्वरामायेकडे अंगुलीनिर्देश करीत होती. असा वाजसनेयि संहितेतील वृत्तांत मी संदर्भासाठी घेतलेला आहे. खुलाशासाठी महामहोपाध्याय श्रीधरशास्त्री पाठक यांच्या 'शुक्लयजुर्वेदांतर्गत माध्यन्दिन वाजसनेयि संहितेचा मराठी अनुवाद'चा संबंधित परिच्छेद विस्तारभयास्तव संस्कृत कित्ता गाळून देत आहे–

'विनियोग– 'अभिभूः' या मंत्राने अध्वर्यूंने यजमानाच्या (राजाच्या) हातात पाच फासे द्यावे. नंतर यजमानाने ब्रह्मयाला बोलवावे... नंतर यजमानाला 'इन्द्रस्य वज्रः' या मंत्राने अध्वर्यूंने 'स्फ्य'-संज्ञक काष्ठशस्त्र द्यावे.

'('अभिभूः' इ. चा) अर्थ... यानंतर ब्रह्माची व यजमानाची उत्तर–प्रत्युत्तरे आहेत... यज०–हे स्फ्या, तू वज्ररूपी आहेस. म्हणून माझ्या द्यूतभूमीवर रेषा ओढायचे काम कर ॥ २८ ॥

'विनियोग– नंतर द्यूतभूमीवर सुवर्ण ठेऊन त्यावर 'अग्निः पृथुः' या मंत्रभागाने आज्याचा होम करावा. नंतर 'स्वाहाकृताः' या मंत्रभागाने पाच फासे जमिनीवर ठेवावे.

'('अग्निः पृथुः' इ. चा) अर्थ– अग्नीने घृतपान करावे. तो अग्नि विशाल, जगाचा पालक व स्नेह करणारा असा आहे... हे अक्षांनो, तुम्ही स्वाहापूर्वक आहुतींनी संतुष्ट होऊन सूर्यकिरणांबरोबर स्पर्धा करा व हा यजमान आपल्या बंधुवर्गात (सजातानां) मध्यभागी बसण्यास योग्य (सर्वक्षत्रियश्रेष्ठ) होईल असा यज्ञ करा ॥ २९ ॥ (पा. १५४–१५५).

अनुक्रमणिका

निर्ऋति व रामा

शब्दांचा अर्थ लावताना मी मला पाहिजे तो व संकुचित अर्थ करतो, असा डॉ. मेहेंदळेंचा आक्षेप आहे–

'(४) 'निर्ऋति' शब्दाच्या पृथिवीवाचक अर्थाला अनुलक्षून 'निरमणात्' अशी रम् धातूपासून यास्काने व्युत्पत्ती सुचविली आहे (२.७). ह्या 'रम्' धातूचा श्री. पाटील यांनी 'संभोग' ह्या अर्थी 'उपभोग देणे' असा फार संकुचित अर्थ केला आहे (पृ. ११०). कारण ह्यावरून निर्ऋति ही सुपीकतेची देवता होती हा निष्कर्ष त्यांना काढायचा आहे.'

'रम् धातूचा मूळ अर्थ आहे 'एका जागी स्थिर करणे' ('यः पर्वतान् प्रकुपितां अरम्णात्। ऋ. २. १२.२. 'ज्या (इन्द्राने) वेगाने हलणाऱ्या पर्वतांना (एके जागी) स्थिर केले. म्हणून स्कंद-महेश्वरांच्या टीकेत यास्काच्या ह्या व्युत्पत्तीचा खुलासा करताना टीकाकार म्हणतात, 'निरमणात् नियमेन निश्चलत्वेनावस्थानादित्यर्थः'

'रम् धातूचा नंतरचा अर्थ आहे 'आनंद देणे वा आनंद होणे.' ह्या अर्थास अनुसरून यास्काच्या व्युत्पत्तीचा खुलासा 'रमन्तेऽस्यां भूतानि' असा दुर्ग व स्कन्द-महेश्वर दोन्ही टीकाकारांनी दिला आहे. त्या ठिकाणी 'रम्' चा 'आनंदित होणे' असा अर्थ आहे. 'रम्' चा 'संभोग' असा अर्थ होत नाही असे नाही...'

प्राग्वैदिक गणमानव भौतिक सुखदुःखाचेच जीवन जगत होता, 'आध्यात्मिक आनंदाचे' जीवन जगायची अजून त्याची अवस्था आलेली नव्हती, असे बहुतेक इंडॉलॉजिस्टांचे मत आहे. अध्यात्मवादाचा उदय उत्तर वैदिक वा उपनिषत्काळात झाला, याबद्दलही त्यांचे दुमत नाही. मग, प्राग्वैदिक भाषा मूलतः भौतिक सुखदुःख व्यक्त करायचे माध्यम होती, की आध्यात्मिक संकल्पना व आनंद व्यक्त करायचे? प्राग्वैदिक गणमानवाने रम् धातु प्रथम स्वतःचे जीवन स्थिर करण्यासाठी वापरला, की पितरांव्यतिरिक्त देव माहीत नसताही इंद्राने पर्वत स्थिर केल्याची आधिदैविक कल्पना करण्यासाठी प्रथम रम् धातु वापरला?

प्राग्वैदिक गणमानव संभोगाकडे केवळ व्यक्तिगत शारीरिक व स्वकुलवर्धक आनंद म्हणून पाहात नव्हता. नियतकालिक गणपरिषदेत राष्ट्री व ब्रह्मन्ने लोकान्तात संभोग केला व सर्व परिषदांनी लोकान्तात उन्मुक्त संभोग केला म्हणजे विश्वाचे व गणाचे पुनरुत्पादन होते, नाही तर विश्व व गण नष्ट होतात, अशी त्याची ठाम धारणा होती. तसेच एरवीही स्त्रिया उन्मुक्त संभोग करीत राहिल्या नाहीत तर भूमातेची सुपीकता क्षीण होते, अशी सर्व स्त्रियांची काय सर्व पुरुषांचीही अविचल श्रद्धा होती. (श्रद्धा या शब्दाचा अर्थ उपनिषदात पाणी वा पुरुषवीर्य आहे!) विश्वाच्या व गणसमाजाच्या सर्व महत्त्वाच्या प्रक्रिया गणमानव संभोगाच्या रूपात पाहात होता. खुद्द संभोगाची व्युत्पत्तीच सम्+भोग, सर्वांनी मिळून भोग घेणे, अशी आहे! सर्व उत्पादक कर्मांना गणकर्म म्हटले जाई आणि भोजनाला समद (सम्+अद) म्हणजे गणभोजन. गणसभेलाही नरिष्ठा, म्हणजे गणानंदाचे स्थान, असे म्हणत. पालीत गणसभागृहाला सन्थागार, म्हणजे संभोगागार म्हणत आणि गणबैठकीला सन्निपात, म्हणजे संभोग. निर्ऋति, वाक् व सूर्यासावित्री यांना वेद नग्नी वा महानग्नी म्हणतात, तसेच दुर्गेला महाभारत. कारण विश्व व गण यांच्या पुनरुत्पादनाचे काय, पण गणधन व गणभूमी यांच्या समान वाटपाचेही काम या राष्ट्री लोकान्तात नग्न होऊनच करीत. इस्लामपूर्व अरबांची महादेवी काबाची अल् उझ्झा होती आणि तिच्या पुजारिणी नग्न राहात (असगरअली इंजीनिअर, द ओरिजिन अँड डेव्हलपमेंट ऑफ इस्लाम, पा. ३७).

महाभारतात दाश राजाची कन्या सत्यवती काली तिच्या गणाच्या भल्यासाठी यमुनेवर नाव चालवी आणि पार जाणाऱ्यांशी नावेत संभोग करी. इरावतीबाईंना वाटते त्याचप्रमाणे हा दुराचार नव्हता, तर धर्माचार होता. म्हणुन ती तिच्या नावेला धर्म-तरी म्हणते– "धर्मयुक्तस्य धर्मार्थं पितुर् आसीत् तरी मम" ॥ १.१०४.६ ॥ मल्ल गणाच्या राण्यांना पुत्रवती होण्यासाठी 'धर्म–नटी' बनून उन्मुक्त संभोग करावा लागे, असे 'कुस-जातक' सांगते.

संभोग हा स्त्रीसत्ताक व स्त्रीप्रधान गणसमाजाचा धर्मपूर्व धर्म होता, म्हणून, सर्वोच्च व व्यापकतम आनंद! आजच्या समाजाच्या पापपुण्याच्या व नीति-

अनीतीच्या कल्पना त्या समाजावर लादून ना तो समजेल ना त्याच्या भाषिक संकल्पना. त्या समाजाला आदर्श मी मानीत नाही, मानतात सनातनी, आर्य समाजिस्ट व पारंपरिक मार्क्सवादी.

पुरुषसत्ताक व दासप्रथाक वर्णसमाजाच्या उदयाबरोबर धर्म संकुचित होतो व रमणानंदही. कृष्णा निर्ऋतीची नैर्ऋत जनता दासशूद्र बनते आणि तिच्या कृष्णवर्णा मुलींना 'रामा' संबोधले जाऊ लागते. का ? त्या धर्मकार्यासाठी नसून रमणासाठी असल्याचे कर्मकांडी धर्म सांगतो. रम् धातूचा हा खरा संकुचित उपयोग श्रौतसूत्रकाळानंतरचा असल्याची वाचकांची समजूत होऊ नये म्हणून निरुक्ताचा संबंधित भाग (१२.१३) वै. का. राजवाडेंच्या शब्दांत देतो–

'...अधस्तात् रामः अधस्तात् कृष्णः । कस्मात् सामान्यात् इति । अग्निं चित्वा न रामामुपेयात् (काठक सं. २११७) । रामा रमणाय उपेयते न धर्माय (वासिष्ठ धर्मशास्त्र १८।१६) । कृष्णजातीया* । एतस्मात् सामान्यात् । ...

'... अधोरामः = अधः + रामः ; अधः = अधस्तात्; रामः = कृष्णः काळचा रंगाला राम म्हटले आहे ते कोणत्या सामान्य धर्मामुळे ?... अग्निचिति नावाच्या यज्ञात अग्नि प्रज्वलित केल्यावर (चित्वा) मैथुनासाठी रामेकडे म्हणजे काळचा रंगाच्या स्त्रीकडे जाऊ नये (न उपेयात्) असे म्हटले आहे. काळचा रंगाच्या स्त्रीकडे (रामा) रतिसुख भोगण्यासाठी (रमणाय) लोक जातात (उपेयते), धर्मकृत्यासाठी (धर्माय) जात नाहीत ...रतिसुखासाठी जिच्याशी समागम करावयाचा ती रामा; ही रामा काळचा जातीतल्या लोकांपैकी म्हणून रामा म्हणजे काळी असा राम व कृष्ण ह्या दोन शब्दांमधला संबंध ... राम म्हणजे काळा हे सिद्ध करण्याकरिता वरील ब्राह्मणवचन घेतले आहे...... यास्काच्या वेळची वसिष्ठस्मृति वेगळी असली पाहिजे...' (पा. ९७९–९८१)

धर्मासाठी द्विज धर्मपत्नी व रमणानंदासाठी अद्विज दासी वा शूद्राणी. धर्माची व आनंदाची फारकत झाली. रम् धातूचा अर्थ येथपासूनच संकुचित होतो !

मूळ हस्तलिखितात मी संस्कृत, पाली व अर्धमागधी उद्धरणे दिली होती. पण पानांची संख्या व किंमत वाढत होती म्हणून ती गाळावी लागली. २ऱ्या आवृत्तीत मूळ संदर्भाचे आकडे कंसात जरूर घालीन. निघण्टु उपलब्ध ऋग्वेदाच्या संस्करणापेक्षा जुना आहे की नाही याचे अधिक संशोधन व्हायला पाहिजे हे डॉ. मेहेंदळेंचे मत मला विचारार्ह वाटते. देवदासी व कर्मान्त यांबद्दल त्यांनी पुरवलेली मौलिक माहिती मी २ऱ्या आवृत्तीत अवश्य समाविष्ट करीन.

त्यांच्यासारख्या विख्यात वैदिक पंडिताने एवढ्या खोलात व तपशीलात जाऊन माझ्या पुस्तकाचे परीक्षण केले हा मी माझ्या पुस्तकाचा बहुमान समजतो. 'ह्या ग्रंथरूप इमारतीची प्रत्येक वीट पक्की असावी' अशी जी सदिच्छा त्यांनी प्रकट केली आहे ती त्यांनी सुरू केलेल्या महाचर्चेतच पूर्ण होईल. वर्णजातवर्गस्त्रीदास्यअंताच्या या महाचर्चेला कारणीभूत होणे व या पुस्तकाने चर्चिलेल्या समस्यांच्या निराकरणाला मदतकारक होणे यातच या पुस्तकाचे साफल्य आहे. या वैचारिक घुमश्चक्रीत मग या ग्रंथवास्तूच्या कितीही विटा पडोत !

---

* न अग्निं चित्वा रामाम् उपेयात् । कृष्णवर्णा हि रामा, रमणाय एव, न धर्माय । वासिष्ठ धर्मं० १८.१७.८.

अणुबाँब व वैज्ञानिक

व. त्रि. चिपळोणकर

राजकीय सत्ता व विज्ञान यांमधील दृढ संबंधाला अणुबाँबच्या निर्मितीने मूलभूत स्वरूप मिळाले आहे. जगातील सर्वांत पहिला अणुबाँब अमेरिकेत तयार करण्यात आला. या प्रकल्पाचे प्रमुख होते प्रा. ओपेनहायमर. भारतामधील अणुऊर्जाप्रकल्पाचे आद्य संकल्पक प्रा. भाभा यांनी ज्या विषयावर संशोधन करून एक मीमांसा सुचविली होती, त्याच विषयावर ओपेनहायमर यांनी पण संशोधन करून एक पर्यायी प्रक्रिया सुचवली होती, हा योगायोग मनोरंजक वाटतो. अमेरिकेमध्ये अॅलॅमॉगार्डो सँडस् (न्यू मेक्सिको) या स्थानी पहिल्या अणुबाँबची चांचणी घेण्यात आली. त्या वेळी सूर्याच्या प्रकाशाच्या वीस पटींनी प्रखर असा प्रकाश दिसला. ओपेनहायमर यांनी शाळेमध्ये असताना गीता वाचली होती. गीतेच्या अकराव्या अध्यायात भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनास आपले विश्वरूप दाखविले त्याचे वर्णन दिले आहे. हे रूप सहस्र सूर्यांपेक्षाही जास्त तेजस्वी होते, हा उल्लेख ओपेनहायमर यांनी या वेळी आठवल्याचे नमूद केले आहे. अणुबाँब उडविल्यानंतर त्याच्यापासून निर्माण होणाऱ्या संभाव्य धोक्याची कल्पना तेथे काम करीत असलेल्या सर्व भौतिकीशास्त्रज्ञांना आली होती, असे दिसते. ब्रॅडबरी म्हणाले, ' या गोष्टीचे नियंत्रण करण्याइतका विवेक व सारासार बुद्धी जगामध्ये आहे, याबद्दल मला काही खात्री वाटत नाही.' ' मनुष्यजातीने अण्वस्त्रांबद्दल कितीही अविचाराने वागायचे ठरवले, तरी माझ्या वयाच्या माणसाला त्याबद्दल आता काहीही वाटायचे नाही. ' असे अमेरिकन शासनाचे त्या वेळचे विज्ञानविषयक सल्लागार किस्टिआकौस्की म्हणाले होते.

स्फोट झाला त्या वेळचे दृश्य भयानक होते. स्फोटामुळे निर्माण झालेले तापमान सूर्याच्या अंतरंगात असणाऱ्या तापमानाच्या पेक्षा दहा पटींनी जास्त होते. कोका-कोलाच्या बाटल्या वितळल्यावर कशा दिसतील तसे स्वरूप स्फोट झाले तेथील भूपृष्ठभागाने घेतले होते. बाँबस्फोटाचा मनुष्यावर काय परिणाम होतो, हे पाहण्याकरिता स्फोट जेथे व्हावयाचा होता, तेथून ४५०० यार्डांवर काही सैनिकांना उभे केले होते. स्फोटामुळे हवेमध्ये प्रचंड क्षोभ होऊन जी आघात-लाट निर्माण झाली तीमुळे हे सैनिक त्यांच्या मूळ जागेपासून २० फूट मागे फेकले गेले. आपल्या शरीरामधील हाडे प्रदीप्त झाली आहेत व त्यांपासून निघणारा प्रकाश त्याभोवती असलेल्या मांसल भागाचे भेदन करून बाहेर पडत आहे, असे त्यांना दिसले.

हा अमानुष बाँब तयार करण्याचा प्रकल्प अमेरिकेने हातात का घेतला, तर त्यांना अशी गुप्त बातमी लागली होती की, जर्मनी असा बाँब करण्याच्या प्रयत्नात आहे. समजा जर जर्मनीला या प्रयत्नात यश मिळाले, तर त्याला प्रत्युत्तर देण्याकरिता आपल्याजवळ पण स्वसंरक्षणासाठी असा बाँब असावा, अशी या प्रकल्पामागील पहिली कल्पना होती. युद्ध संपल्यानंतर दोस्त राष्ट्रांना जी माहिती उपलब्ध झाली तीवरून त्यांना शंका होती एवढी तयारी या बाबतीत जर्मनीची झाली नव्हती, असे कळले. या बाबतीमधील रशियाच्या कार्यक्षमतेबद्दलचे त्यांचे अनुमान तितकेच चुकीचे होते. फ्लेरोव्ह व पेट्रझाक यांना युरेनियम अणूचे उत्स्फूर्तपणे विघटन होते, हा शोध १९४० मध्येच लागला होता; पण त्यानंतर लागलीच रूसो-जर्मन युद्ध सुरू झाल्यामुळे या दोन्ही देशांच्या अणुसंशोधनकार्यात खंड पडला. अमेरिकेच्या पहिल्या अणुबाँबस्फोटानंतर फक्त चार वर्षांनी रशियाने ऑगस्ट १९४९ मध्ये आपला पहिला स्फोट केला. यावरून या देशाच्या या विषयातील प्रगतीमध्ये असलेले अंतर लक्षणीय नव्हते, हे उघड होते.

या दोन स्फोटांच्या दरम्यानच्या काळात अमेरिकेमध्ये यापुढे जाऊन हायड्रोजन बाँब तंत्र विकसित करावे, अशी चळवळ सुरू झाली. हायड्रोजन बाँब

अनुक्रमणिका

करण्याकरिता ओपेनहायमर विशेष उत्सुक नव्हते. अमेरिकेमधील अनेक विख्यात शास्त्रज्ञांचे पण तसेच मत होते. या संदर्भात बेथे व इतर काही काही निष्णात शास्त्रज्ञांनी केलेले वक्तव्य विशेष प्रभावी वाटते. या वक्तव्यात असे म्हटले आहे की, 'या संबंधात नैतिक प्रश्न सर्वांत महत्त्वाचा आहे, असे आम्हाला वाटते. नैतिक मूल्यांवर आधारित अशा शांततेवर आमचा विश्वास आहे काय? आणि ही शांतता आम्ही हायड्रोजन बाँबच्या साहाय्याने प्रस्थापित करणार आहोत काय? लक्षावधी रशियन लोकांची हत्या करून आम्ही त्यांस व्यक्तिस्वातंत्र्याची महती पटवून देणार आहोत काय? व्यक्तिस्वातंत्र्याकरिता आपण प्रसंग पडल्यास जीव द्यावयासही तयार असले पाहिजे, असा एक युक्तिवाद केला जातो. हायड्रोजन बाँब हातात घेऊन केलेल्या या युद्धात आपले स्वातंत्र्य व आतापर्यंत जोपासलेली मानवी मूल्ये यांचे प्रथम बलिदान करावे लागेल, हे वरील युक्तिवाद करणाऱ्या लोकांच्या लक्षात आलेले दिसत नाही. शिवाय हा विनाश इतका प्रलयकारी असेल की, यानंतर सामान्य परिस्थिती पुन्हा प्रस्थापित झालीच, तर ती केव्हा होईल, हे सांगणे सुद्धा शक्य होणार नाही. हायड्रोजन बाँबच्या साहाय्याने आपण जरी हे भावी युद्ध जिंकले, तरी ज्या ध्येयाकरिता आपण लढतो त्याची आठवण भावी इतिहास ठेवणार नाही. हा विजय मिळविण्याकरिता आपण वापरलेल्या अघोर उपायाचीच तो नोंद करून ठेवेल. चेंगीझखानाने कत्तली करून पूर्वी पर्शियामध्ये गावेच्या गावे ओसाड पाडली. त्या अत्याचाराशी आपण केलेल्या युद्धाची तुलना भावी इतिहास करील.' आपण प्रथम अण्वस्त्राचा वापर करणार नाही, असे प्रकट आश्वासन या दोन्ही देशांनी द्यावे असे आवाहन याच संदर्भात केले गेले. रशियाने असे आश्वासन दिल्याचे कळते, पण अमेरिकेचा याबाबतीमधला निर्णय अजून कळावयाचा आहे.

ओपेनहायमर हायड्रोजन बाँब तयार करण्याकरिता विशेष उत्सुक नव्हते, याचा अर्थ वेगळाच लावला गेला. अमेरिकेचे संभाव्य शत्रुराष्ट्र रशिया याकडे त्यांची प्रच्छन्न सहानुभूती आहे, अशी शंका व्यक्त करण्यात आली. याचा परिणाम असा झाला की, ओपेनहायमर यांची एका कमिशनपुढे चौकशी होऊन त्यांच्यावर आपल्या पदाचा राजीनामा देण्याची पाळी आली. या कमिशनसमोर जी प्रश्नोत्तरे आली त्यावरून शास्त्रज्ञ व इतर लोक यांच्या विचारसरणीत मूलभूत फरक आहेत की काय याबद्दल जी छाननी झाली, ती उद्बोधक व मनोरंजक आहे.

प्रश्न– तुम्हाला असे वाटते का, की शास्त्रज्ञ हे सामान्यपणे निराळे व थोडे चमत्कारिक असे असतात ?

उत्तर– माझ्या बायकोस मी केव्हापासून मारावयाचे बंद केले, या प्रश्नासारखाच हा प्रश्न दुधारी आहे.

प्रश्न– रसायन व भौतिकी विषयांचे प्राध्यापक हे विशेषतः चमत्कारिक असतात का ?

उत्तर– कोणताही शास्त्रज्ञ हा प्रथमतः मनुष्य असतो. त्याला अनेक गोष्टींबद्दल जिज्ञासा असते; त्याबद्दल ज्ञान हवे असते. हे ज्ञान सत्यनिष्ठ, वास्तविक व अचूक असावे असा त्याचा आग्रह असतो, प्रयत्न असतो. कोणत्याही विज्ञानविषयातील विशेषज्ञांपैकी अनेकांना इतर विषयांत रस घेण्याची निःसंशय क्षमता असते. कोणताही पूर्वग्रह मनात न ठेवता ते विचार करू शकतात. त्यामुळे योग्य युक्तिवाद वापरून कोणतीही गोष्ट त्यांना पटवून देणे इतरांप्रमाणे अवघड नसते.

तपासणीमधील वरील उत्तरे ओपेनहायमर यांचे प्रथम सहाध्यायी व नंतरचे वारस ब्रॅडबरी यांनी दिली होती. याच प्रश्नाबद्दल खुद्द ओपेनहायमर काय म्हणतात ते पहा–

मानव्य किंवा विज्ञान यांपैकी कोणत्याही प्रकारचे संस्कार झालेला मनुष्य हा नेहमी गूढाच्या किनाऱ्याजवळ उभा असतो. त्याच्या अवतीभवती सर्वत्र गूढच पसरलेले असते. जे परिचित आहे व जे नवीन आहे अशा दोन्ही गोष्टींचा मिलाफ खरोखरी दोघांनाही करावा लागत असतो. जे अगम्य आहे असे भासते त्यामधून काही अर्थसंगती शोधून काढावी लागते. या प्रयत्नात केवळ परिचित कल्पनांचाच उपयोग केला जातो, हे खरे नाही. त्यामध्ये नवीन व रूढ अशा दोन्ही प्रकारच्या कल्पनांचा सम-

न्वय करण्यात येतो. अशा प्रकारे मानव्य विभाग, विज्ञान विभाग व प्रत्यक्ष जग यांना एकमेकांशी जोडणाऱ्या, संबंधित करणाऱ्या अशा अनेक, विविध प्रकारच्या वाटा तयार होत असतात. नव्या कल्पनांना प्रवेश करता यावा म्हणून आपण आपल्या मनाची दारे सतत सताड उघडी ठेवली पाहिजेत. त्या कल्पना मनामध्ये खोलपर्यंत आत शिरत असताना त्यांना पूर्वग्रह विरोध करणार नाहीत अशी काळजी घेतली पाहिजे. ही अवस्था प्रत्यक्षात साध्य करणे अवघड गोष्ट आहे, यात शंका नाही. ही गोष्ट योग्य आहे, ती गोष्ट अयोग्य आहे, हे सत्य आहे तर ते असत्य आहे असे मनात आधीच ठरवून आपण बसलो, तर आपणास नवीन ज्ञान, नवीन कल्पना कधीच मिळणार नाहीत.

ओपेनहायमर यांना यानंतर कमिशनने खालील प्रश्न विचारले.

प्रश्न– मासे पकडणे अशा छंदामध्ये तुम्ही कधी रस घेता का ?

उत्तर– होय. मी माझ्या आयुष्यात अनेक गोष्टी केल्या आहेत; पण माझ्या कामातच मी अनेक दिवस व्यग्र होतो.

प्रश्न– पण त्यामुळे तुमच्या वागणुकीमध्ये तऱ्हेवाईकपणा आला का ?

उत्तर– हे मी कसे सांगू शकणार ? मी तऱ्हेवाईक आहे की नाही हे दुसऱ्यांनी ठरवायचे असते.

प्रश्न– लहान वयात मनुष्याला विवेक रहात नाही; त्याच्या हातून काही वेळा चुका पण घडतात.

उत्तर– वय वाढते तसा मनुष्य मोठा होत असतो, या प्रक्रियेचाच हा भाग आहे, असे मला वाटते.

वैज्ञानिक खरोखरीच तऱ्हेवाईक असतो का? मनामध्ये कोणत्याही प्रकारचा पूर्वग्रह न ठेवता एखाद्या गोष्टीबद्दल विचार करणे किंवा त्याप्रमाणे वर्तन करणे यामध्ये सामान्य मनुष्यास चमत्कारिकपणाचा आभास होत असावा. पूर्वीच्या काळी धर्म व रूढी यांनी मनुष्याच्या व्यक्तिस्वातंत्र्यावर बंधने घातली होती. सध्या आपला शेजारी करतो त्याप्रमाणे (किंवा त्याच्यापेक्षा एक तसूभर जास्त) करण्याची जी अनुसरणप्रवृत्ती बोकाळली आहे, तिचा परिणाम व्यक्तीच्या दृष्टीने फारसा वेगळा असा होत नाही. रसेल यांनी एके ठिकाणी म्हटल्याप्रमाणे त्याच्या समाजातील प्रस्थापित झालेल्या प्रतिरूपाशी सुसंगत करण्यासाठी म्हणून मनुष्याने आपल्या नैसर्गिक आकांक्षा अथवा प्रवृत्ती यांना दडपून त्यांना निराळे रूप देण्याचा प्रयत्न केला, तर त्याच्या व्यक्तिमत्वामध्ये हानी झाल्यावाचून राहणार नाही. सामान्य मनुष्यावर या अनुसरणवादी भूताचा पगडा मोठ्या प्रमाणात असतो, तर वैज्ञानिक आपल्या बुद्धिप्रामाण्याचा उपयोग करीत असल्यामुळे हा पगडा त्यावर कमी असतो, असे आपण म्हणू या. वैज्ञानिकाच्या तथाकथित चमत्कारिकपणाबद्दल वर पुरेसे विवेचन झाले आहे, असे वाटते.

यापूर्वी कोणालाच माहिती नव्हते अशा गोष्टीचे विवेचन सर्वांना समजू शकेल अशा भाषेत विज्ञानामध्ये केले जाते, असे नोबेल पारितोषिकविजेते दिराक यांचे मत होते. विज्ञानामधील सत्यामध्ये गूढ भाग असा फार थोडा असतो. त्यामधील बहुतेक सर्व सत्ये प्रयोगशाळेमधील प्रयोगांवर आधारित असतात. हे प्रयोग कोणालाही केव्हाही करून त्याबद्दल स्वतःची खात्री करून घेता येते. पुनर्निर्माणक्षमता विज्ञानामधील एक मूलभूत अशी कसोटी असते. अनागोंदी, नियमविरहीत, काही वेळा अर्थहीन अशा घडामोडींनी भरलेल्या मानवी जगाकडे काही काळ पाठ वळवून शास्त्रज्ञाचे मन त्याच्या सर्व बाबतींत उलट गुणधर्मांच्या भौतिकीय जगाकडे वळले, तर त्यात आश्चर्य करण्याचे कारण नाही. फाईनमान यांनी म्हटले आहे की, एका बाबतीत धर्म व विज्ञान यांमध्ये साम्य आहे. शास्त्रज्ञसुद्धा स्वतःला विसरून एका निराळ्याच उच्च व स्वतंत्र विश्वात वावरतो तेव्हा त्याला एक निराळ्या प्रकारचाच आनंद मिळत असतो. तसे पाहिले असता कोणत्याही आनंदाला काही उद्देश नसतो. त्यापासून निव्वळ अनुभवापलीकडे काही लाभ पण मिळत नसतो. त्यामुळे वैज्ञानिक संशोधनांचे उद्दिष्ट हे फक्त ज्ञानाचा शोध एवढेच होते. अणुबाँबच्या शोधापासून काही लोकांच्या मते वैज्ञानिकावर मानवजातीच्या कल्याणाच्या दृष्टीने विचार करण्याची जबाबदारी येऊन पडली आहे. एका मताप्रमाणे शास्त्रज्ञांनी अणुबाँब किंवा यासारखी भस्मासुरी अस्त्रे करावयाचे नाकारावे कारण त्यांच्यामध्ये सारासार विचार कर-

अनुक्रमणिका

ण्याची बुद्धी आहे. याउलट काही लोकांच्या मते वैज्ञानिकांवरच ही नैतिक जबाबदारी आहे, असे म्हणणे तितकेसे बरोबर नाही. पूर्वीच्या काळी सुद्धा लढाई होत नव्हती असे नाही. युद्ध करण्याचा निर्णय राजकीय पातळीवरच घेतला जाई. युद्ध सुरू झाल्यावर शहरावर बाँबफेक करावयाचे काम वैमानिक करीत. बाँबफेकीमुळे शहरातील निष्पाप मुले, स्त्रिया किंवा वृद्ध यांचा जो संहार होत होता त्याची जबाबदारी वैमानिकावरच असते, त्यांनीच बाँबफेक करावयाचे नाकारावे म्हणजे हा प्रकार थांबेल, असे म्हणण्यासारखाच हा युक्तिवाद आहे. खरे सत्य असे आहे की, राजकीय सत्ता लष्करी सत्ता हाती आल्याशिवाय या प्रकारचे कोणतेच सद्‌विचार अमलात येऊ शकणार नाहीत.

वरील सर्व हकीगतींमधून वैज्ञानिक दृष्टिकोन खरोखरी काय आहे व सामान्य माणसाची त्याबद्दल काय प्रतिक्रिया आहे, यांविषयी जी माहिती मिळते ती मनोरंजक व उद्‌बोधक आहे, यामध्ये शंका नाही. त्याबरोबरच शास्त्रज्ञ हासुद्धा मानवी समाजाचा एक घटक आहे. मानवजातीचे अकल्याण होणार नाही हे बघण्याची जबाबदारी समाजातील प्रत्येक मनुष्यावर आहे. ही जबाबदारी शास्त्रज्ञाने आपणहून उचलावयास हवी हे उघड आहे. या संदर्भात डन या इंग्लिश कवीच्या काव्यपंक्ती अर्थपूर्ण वाटतील :

No man is island in himself
He is part of the main land
If a clod is washed away Europe
is less
Any man's death diminishes me
Never send to know for whom
the bell talls
If tolls for thee

[मुक्त अनुवाद :
माणूस हा स्वतंत्र बेट नाही
मुख्य भूखंडाचा तो भागच असतो
एक जरी ढेकूळ वाहून गेले तरी तेवढ्याने
युरोप कमी होतो
कोणाही मनुष्याचे मरण माझ्या अस्तित्वात
न्यून आणते.
मृत्युघंटा कोणाकरिता वाजत आहे याची
विचारणा करू नका.
ती तुमच्याकरिताच वाजत आहे.]

अनुक्रमणिका

डॉ. आंबेडकरांचा सामाजिक प्रतिकाराचा सिद्धांत

अशोक चौसाळकर

अस्पृश्यांनी आपले मानवी हक्क मिळविण्यासाठी स्पृश्य समाजाशी संघर्ष करावा, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सर्व अस्पृश्यांना सांगितले. त्यासाठीच त्यांनी महाड सत्याग्रह सुरू केला. या संघर्षातूनच त्यांच्या सामाजिक प्रतिकाराच्या सिद्धांताचा जन्म झाला. प्रस्तुत लेखात बाबासाहेबांच्या सामाजिक प्रतिकाराच्या सिद्धांताचा अभ्यास करण्यात आला आहे. या लेखातील विश्लेषण त्यांच्या 'बहिष्कृत भारतां'तील स्फुट लेखांवर व अग्रलेखांवर आधारित आहे.[१] या लेखाची मर्यादा आहे.

राजकीय तत्त्वज्ञानामध्ये राजकीय प्रतिकाराच्या विविध सिद्धांतांची चर्चा करण्यात आली आहे; पण त्यात सामाजिक प्रतिकाराबाबतीत फारसे विचार मांडण्यात आलेले नाहीत. कारण यूरोपात अशा प्रकारचे संघर्ष संपूर्ण व्यवस्थेच्याच विरुद्ध छेडले गेल्यामुळे बहुतेक वेळी सामाजिक संघर्ष राजकीय संघर्षात परिवर्तित झाला. पण भारतातील परिस्थिती वेगळी होती. भारतातील जातिबद्ध सरंजामशाही ही राजकीय दृष्टया सत्तारूढ नव्हती. भारतात साम्राज्यवाद्यांची वसाहतवादी सत्ता होती. अशा वेळी काही काळपर्यंत साम्राज्यशाहीशी न झगडता जातिबद्ध सरंजामशाहीशी झगडणे शक्य होते किंवा जातिबद्ध सरंजामशाहीशी न झगडता साम्राज्यशाहीशी झगडणे शक्य होते. यामुळे सरंजामशाहीला वा साम्राज्यशाहीला स्थानिक समाजात थोडासा आधार सापडत होता. या द्वैताच्या व्यावहारिक मर्यादा एवढ्या कठोर होत्या, की या देशातील प्रत्येक श्रेष्ठ पुढाऱ्याला या मर्यादांतच काम करावे लागे. डॉ. आंबेडकरदेखील याला अपवाद नव्हते. अस्पृश्यांवर प्रत्यक्ष अन्याय सवर्ण हिंदूच करीत होते. त्यामुळे त्यांना जो संघर्ष करावयाचा होता तो सरकारशी करावयाचा नव्हता, तर जातिश्रेष्ठत्वाच्या अहंगंडाने पछाडलेल्या, सामाजिक स्वार्थाने प्रेरित झालेल्या व बहुसंख्य असलेल्या हिंदूंशी करावयाचा होता. हा प्रतिकार राजकीय प्रतिकारापेक्षा जास्त अवघड होता. म्हणून बाबासाहेब लिहितात, "स्पृश्यांच्या सत्याग्रहात व अस्पृश्यांच्या सत्याग्रहात जमीनअस्मानाचे अंतर असते. स्पृश्य लोकांचा सत्याग्रह सरकारविरुद्ध असतो व त्यास संपूर्ण जनतेचा पाठिंबा असतो; अस्पृश्यांच्या सत्याग्रहाला साऱ्या जनतेचा विरोध असतो."[२]

दलितांच्या वा अस्पृश्यांच्या दृष्टीने प्रतिकार आवश्यक आहे कारण स्पृश्य हिंदूंनी त्यांचे सर्व मानवी हक्क हिरावून घेतले आहेत. खरे पाहिले असता हे मानवी हक्क नैसर्गिक आहेत. बाबासाहेब लिहितात, "सार्वजनिक बाबतीत व्यक्तिमात्रांचा हक्क कोणास सनद देऊन निर्माण करावयाचा नसतो. तो दरेकाच्या अंगी वसत असतो. त्याची वहिवाट नसली किंवा त्याच्या वहिवाटीत खंड पडला तरी तेवढ्यावरून तो हिरावला जात नाही."[३] इंग्रजी शिक्षणामुळे आता अस्पृश्य वर्गास स्वतःच्या अधिकारांची जाणीव झाली आहे. त्यामुळे मागच्या पिढीस जे करता येणे शक्य नव्हते ते करणे आताच्या पिढीला शक्य झाले आहे.[४] ते त्यांनी करून दाखवावे. आपण कोण आहो, आपले अधिकार काय आहेत याची ओळख करून घेऊन अस्पृश्यांनी स्वहक्क संपादनार्थ छेडलेल्या धर्मसंगरास उभे राहावे असे ते सांगतात.[५] त्यासाठी अस्पृश्यांनी आपली माणूस म्हणून असलेली किंमत, आपल्यातील सत्त्व, तेज ओळखावे आणि शतकानुशतके हिरावून घेतलेले मानवी हक्क परत मिळवावे.

हाही संघर्ष मुख्यतः स्पृश्य हिंदू समाजाशी करावयाचा आहे म्हणून तो एक प्रकारचा सामाजिक प्रतिकार आहे. पण जर इंग्रज सरकारने स्पृश्यांच्या वागणुकीचे समर्थन केले तर हा संघर्ष सरकारच्या

विरुद्धही करावा लागेल, असे डॉ. आंबेडकरांचे मत होते.

स्पृश्यांमध्ये ब्राह्मण व ब्राह्मणेतर असे दोन वर्ग आहेत. दोघेही अस्पृश्यतेची जबाबदारी एकमेकांवर ढकलण्याचा प्रयत्न करतात. पण दोघांनाही अस्पृश्यांचा स्वाभिमानी व्यवहार सहन होत नाही. ब्राह्मणशाही अस्पृश्यांची वैरी आहेच कारण ब्राह्मणाईने जळवेसारखे अस्पृश्यांचा स्वाभिमान व मानवी हक्क यांचे शोषण केले.[६] सध्या राजकीय हक्क मागण्यात ब्राह्मण सर्वांच्या पुढे आहेत पण सामाजिक समतेच्या बाबतीत ते मागे राहिले आहेत, कारण हिंदु समाजात ते विशेषाधिकार भोगत असल्यामुळे सामाजिक समतेच्या लढ्यात ते उतरणार नाहीत. पण राजकीय हक्क जर मिळाले तर ते त्यांनाच मिळणार असल्यामुळे ते त्यासाठी लढतात. हे लोक राष्ट्राचे नाव व आपले गाव या लफंगेगिरीला राष्ट्रीय चळवळ हे गोंडस नाव देऊन अज्ञ जनतेला फसवीत आहेत.[७] सामाजिक समतेसाठी अस्पृश्यांना ब्राह्मणांशी लढावे लागेल कारण ब्राह्मणशाहीने भेटीबंदी, रोटीबंदी आणि बेटीबंदी या तीन कोटांनी स्वतःला बंदिस्त केले आहे. डॉ. आंबेडकरांचे असे मत होते की, ब्राह्मणांना आपला शिवाशिवीचा धर्म टिकविण्यापेक्षा जातिवर्चस्व टिकवावयाचे आहे. सध्याच्या परिस्थितीत खरे ब्राह्मण्य टिकविणे म्हणजे ब्राह्मणांचे राजकीय वर्चस्व टिकविणे होय.[८]

यामुळेच ब्राह्मणशाहीविरुद्ध बंडाचा झेंडा उभारणाऱ्या सत्यशोधक चळवळीस बाबासाहेब सद्धर्म प्रतिपादन करणारी समानतेची चळवळ म्हणून संबोधितात व आपणही सत्यशोधक असल्याचे सांगतात.[९] मग या चळवळीपासून निघालेली ब्राह्मणेतर चळवळ टिळक परंपरेपेक्षा सामाजिकदृष्टया प्रगतिशील असली, तरी वेळ आली की ब्राह्मणेतर देखील अस्पृश्यांचे शत्रू बनतात. ब्राह्मणाच्या अन्याय्य वर्तनावर टीका करणारे ब्राह्मणेतर अस्पृश्यांवर कमी अन्याय करीत नाहीत.[१०] म्हणून अस्पृश्यांना सामाजिक प्रतिकार ब्राह्मण, ब्राह्मणेतर आणि अस्पृश्यांतील स्पृश्यांचे हस्तक बनून काम करणाऱ्या लोकांविरुद्ध करावयाचा आहे. पण हा लढा जातिवर्चस्वाविरुद्ध असला तरी तो जातीय नाही; कारण डॉ. आंबेडकरांचे असे मत होते की, जे ब्राह्मण व ब्राह्मणेतर ब्राह्मण्याचा त्याग करून महाडसारख्या सत्याग्रहात भाग घेऊ इच्छितात, त्यांना त्यात भाग घेऊ दिला पाहिजे. कारण सुधारक हा आपल्या जातीचा शत्रू असतो. म्हणून डॉ. आंबेडकर लिहितात, "ब्राह्मण आमचे वैरी नसून ब्राह्मण्यग्रस्त आमचे वैरी आहेत. म्हणून ब्राह्मण्यग्रस्त ब्राह्मणेतरांपेक्षा ब्राह्मण्यरहित ब्राह्मण आम्हास जवळचा वाटतो."[११] थोडक्यात सांगावयाचे झाले तर आत्मसन्मानाच्या रक्षणार्थ उभारलेली सामाजिक प्रतिकाराची चळवळ ही स्पृश्य हिंदूंविरुद्ध आहे आणि जे स्पृश्य हिंदू अस्पृश्यतेला विरोध करतात त्यांची मदत घेतली जावी असे डॉ. आंबेडकरांचे मत होते.

डॉ. आंबेडकरांनी आपला सामाजिक प्रतिकाराचा सिद्धांत महाड व पर्वती सत्याग्रहांच्या पार्श्वभूमीवर मांडला. त्याबरोबरच त्यांनी आपले सत्याग्रहाचे तत्त्वज्ञान, त्यात वापरायची विविध साधने आणि त्याचे राजकीय परिणाम यांचापण ऊहापोह केला.

सामाजिक प्रतिकार दलितांचे मानवी हक्क मिळविण्यासाठी करावयाचा आहे. कारण "जे दुःख सार्वजनिक आहे, त्याचा शोक करीत बसणे योग्य नाही. त्यासाठी रडत न बसता आपणास सुचेल तो उपाय ज्ञानी पुरुषाने करावा"[१२] सत्याग्रह हा अशाच प्रकारचा उपाय आहे असे त्यांना वाटते. आपल्या कार्याच्या नैतिक स्वरूपाबद्दल बाबासाहेबांना कसलीही शंका नव्हती म्हणून ते बजावतात की कोणत्याही कार्यात यशःप्राप्ती होईल किंवा नाही हे जितके साधनसामग्रीच्या प्रमाणावर अवलंबून आहे तितकेच ते त्या कार्याच्या नैतिक स्वरूपावर अवलंबून आहे. म्हणून कार्याच्या मुळाशी जर सत्य असेल तर त्यात यशःप्राप्ती होण्यास चिंता करण्याचे विशेष कारण उरत नाही. कारण अखेर सत्याचाच जय होतो. त्यासाठी सत्याग्रहाच्या बाबतीत पहिली गोष्ट म्हणजे सत्य कोणते हे ठरविणे होय. कारण सत्य कोणते हे ठरविता आले नाहीत र सत्याग्रहाची इमारत डळमळीतच राहणार. त्याचप्रमाणे सत्याग्रहाची यशःप्राप्ती नेहेमीच सत्याग्रही माणसाच्या आत्मबलावर अवलंबून असते आणि हे आत्मबल आपण जे कार्य करीत आहो

ते सत्य आहे या भावनेमधून निर्माण झालेले असते[१३]

सत्य काय आहे हे ठरविणे आवश्यक आहे आणि डॉ. आंबेडकरांचे असे मत आहे, की ज्या कार्यापासून लोकसंग्रह होतो ते सत्कार्य आहे आणि त्यासाठी केलेल्या आग्रहास सत्याग्रह म्हणावे.[१४] लोकसंग्रहाचे प्रयत्न ज्या वेळी स्वार्थमूलक असतात त्यावेळी ते लोकविग्रहास कारण होतात. पण कर्त्याच्या मनात जर समभाव जागृत असेल व या कार्यात जर त्याची स्वार्थबुद्धी नसेल तर ते सत्कार्य आहे. म्हणून डॉ. आंबेडकर म्हणतात, "जेथे समभाव असेल तेथे लोकसंग्रह आहे, जेथे लोकसंग्रह आहे तेथे सत्कार्य आहे आणि जेथे सत्कार्य आहे आणि अशा कार्याविषयीचा जो आग्रह आहे तो सत्याग्रह आहे अशी आमची सत्याग्रहाची व्याख्या आहे." [१५] आपण ही व्याख्या गीतेवरून घेतली असे बाबासाहेब सांगतात, कारण गीता स्पष्टच सांगते की जर आपले स्वजन आपले हक्क हिरावून घेत असतील तर त्यांच्याविरुद्ध युद्ध करावे. शिवाय अस्पृश्यता निवारणाची चळवळ ही लोकसंग्रहाची चळवळ आहे कारण तिचा उद्देश केवळ अस्पृश्यांनाच त्यांचे हक्क मिळवून देणे हाच नसून स्पृश्यांना पण त्यांच्या खालावलेल्या नीतीतून मुक्त करणे हा आहे.[१६]

सत्याग्रह हा शब्द गांधींनी प्रयोगात आणल्यामुळे तो फक्त गांधींच्याच पद्धतीने चालविला जाऊ शकतो असे काही लोकांना वाटेल; पण तसा विचार करणे बरोबर नाही असे बाबासाहेबांना वाटते. उदा, गांधींचे आत्यंतिक अहिंसेबद्दलचे मत फारसे तर्कशुद्ध आहे असे त्यांना वाटत नाही. कारण बाबासाहेबांचे असे मत आहे, की सत्याग्रह त्याच्या सिद्धीच्या साधनावरून ठरविला जात नसून तो ज्या कार्यासाठी आरंभिला आहे त्याच्या नैतिक स्वरूपावरून ठरविला जातो. म्हणून कार्य जर सत्कार्य असेल तर त्याबाबतीत धरलेल्या आग्रहाला सत्याग्रह म्हटले पाहिजे. आणि तेच जर असत्य असेल तर त्याबाबतीत धरलेल्या आग्रहाला दुराग्रह म्हटले पाहिजे. हिंसा-अहिंसा ही केवळ आग्रहाच्या सिद्धीची साधने आहेत.[१७] म्हणूनच एखाद्या दुराग्रह्याने आपला आग्रह पार पाडण्यासाठी अहिंसेचा मार्ग स्वीकारला तरी तो सत्याग्रह ठरत नाही किंवा एखाद्या सत्याग्रह्याने सत्याग्रहाच्या सिद्धीसाठी हिंसा केली तरी तो दुराग्रह ठरत नाही अते बाबासाहेबांचे मत आहे. गीतेमध्ये देखील सत्याग्रहाच्या सिद्धीसाठी श्रीकृष्णाने हिंसेचा पुरस्कार केला आहे.[१८] शिवाय हिंसा करणे जरी गर्ह्य असले तरी व्यवहारात आत्मसंरक्षणार्थ कधी कधी हिंसा करावी लागते आणि अशा प्रकारची हिंसा क्षम्य असते.[१९] खुद्द गांधी देखील म्हणतात, की सत्य म्हणजे काय याची निश्चयात्मक कसोटी नसल्यामुळे जेथे सत्याबद्दल प्रामाणिक मतभेद आहेत, तेथे हिंसा रास्त नाही. याचा अर्थ असा, की हिंसा ही सत्याच्या नैतिक स्वरूपास बाधक नाही. म्हणून जीवर शक्य असेल तोवर अहिंसा व जरूर पडेल तर हिंसा असे धोरण सत्याग्रही माणसाने ठेवणे हे सिद्धीच्या दृष्टीने रास्त आहे व नीतीच्या दृष्टीने पण प्रशस्त आहे[२०]

बाबासाहेबांचें असे मत आहे की अस्पृश्यांचा सत्याग्रह हे एक सत्कार्य आहे. कारण त्याने अस्पृश्यांच्या मनातील हीनगंड नष्ट होऊन त्यांची आत्मशुद्धी होईल आणि त्याचा अंतिम परिणाम अस्पृश्यांना त्यांचे मानवी हक्क मिळतील. माणुसकी हे एक उदात्त ध्येय आहे आणि ते ध्येय गाठण्यासाठी सत्याग्रह करणे श्रेयस्कर आहे असे त्यांचे मत आहे. म्हणून आपल्या ध्येयप्राप्तीसाठी अस्पृश्यांनी विविध प्रकारे प्रयत्न करावे असे ते सांगतात.

सत्याग्रहाची दोन महत्त्वाची साधने म्हणजे प्रतिकारयोग आणि बहिष्कारयोग. प्रतिकारयोग म्हणजे अस्पृश्यांनी आपल्यावर होणाऱ्या अन्यायाचा प्रतिकार करणे; पूर्वी जसे अस्पृश्य स्पृश्यांशी दबून वागत होते तसे न वागता त्यांनी आपले हक्क शाबीत करून घेणे. परंतु सहजासहजी स्पृश्य ते हक्क देणार नाहीत म्हणून अन्यायाचा प्रतिकार करून अंधश्रद्धाग्रस्त व विचारशून्य हिंदूंना विचार करावयास भाग पाडणे आणि विचारी लोकांना आचार करावयास लावणे. प्रतिकारयोग जरुरी आहे कारण तत्त्व म्हणून अस्पृश्यता वाईट आहे असे सर्वच म्हणतात; पण व्यवहारात सत्ताधारी लोकांच्या वागणुकीत बदल घडवून आणणे अवघड असते कारण स्वार्थाला चट्टा बसल्याखेरीज नुसत्या सामदामाने आपली वागणूक बदलत नाही. त्यासाठी अस्पृश्यांनी प्रतिकार करावा[२१]

प्रतिकारयोगाबरोबरच बहिष्कारयोगाचा डॉ. आंबेडकरांनी पुरस्कार केला आहे. बहिष्कारयोग म्हणजे अस्पृश्यांनी हिंदूंवर बहिष्कार टाकणे, त्यांची कामे न करणे आणि त्यांच्यावर जर स्पृश्य हिंदूंनी बहिष्कार टाकला तर त्याला तोंड देणे. प्रतिकारयोगाचा व बहिष्कारयोगाचा मार्ग टिळकांचा मार्ग आहे. तो मार्ग त्यांनी राजकारणप्रसंगी योजला होता. डॉ. आंबेडकर तो समाजकारणप्रसंगी योजू इच्छित होते. कारण त्यांच्या मते राज्यसत्तेची आच शंभरांत एकास लागते. पण धार्मिक सत्तेच्या आगीत प्रत्येक दलित होरपळत आहे. त्यासाठी या उपायांचा वापर समाजकारणात करणे तर जास्तच श्रेयस्कर आहे.[२२] बहिष्काराचे शस्त्र हे दुधारी असते. ते बहिष्कार टाकणारांनाही घायाळ करते पण म्हणून अस्पृश्यांनी बहिष्कार टाकावयास किंवा टाकलेल्या बहिष्कारास भिऊ नये. ज्या वेळी परस्परसंबंध दाता व याचक असा असतो त्यावेळी बहिष्कार प्रभावी ठरत नाही; परंतु जर परस्परसंबंध दानस्वरूपाचा नसून विनिमयस्वरूपाचा असेल तर दोघांचेही नुकसान होते. अस्पृश्य संपूर्णतः रयतेच्या भिकेवर अवलंबून नाहीत आणि त्यांना बहिष्कारामुळे त्रास झाला तरी त्यांनी तो सहन करावा. कारण अस्पृश्यांतील धंदा करणाऱ्या जातीवर बहिष्कार टाकून स्पृश्यांचे भागणार नाही[२३]

अस्पृश्य बहिष्कारयोग किंवा प्रतिकारयोगाची शस्त्रे जशी हवी तशी वापरू शकत नाहीत. कारण त्यांची आर्थिक परिस्थिती फारशी चांगली नाही याची बाबासाहेबांना जाणीव आहे; पण जुनी वतने सांभाळून त्यांना आर्थिक स्वातंत्र्य मिळणार नाही असे त्यांना वाटते म्हणून त्यांनी महारांना महारवतने सोडून देण्यास उपदेश केला. कारण या वतनांमुळेच महार स्वाभिमानशून्य व रयतेचा गुलाम झाला आहे. शहरांत अनेक धंदे उपलब्ध आहेत म्हणून महारांनी वतन सोडून, गाव सोडून शहरांत यावे असे त्यांचे मत आहे. बाबासाहेबांनी वतनव्यवस्थेमध्ये सुधारणा करण्याची मागणी केली. महार सरकारी नौकर म्हणून नेमला जावा, त्याच्या कामाबद्दल त्यास पगार मिळावा आणि त्याची रयतेच्या वर्चस्वातून मुक्तता करण्यात यावी इत्यादी मागण्या त्यांनी केल्या होत्या.[२४] महारांनी महारकी सोडावी आणि अमेरिकेतील निग्रो लोकांप्रमाणे आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी व्हावे असे त्यांचे मत होते.[२५] महारांच्या व अस्पृश्यांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी जंगलखात्याच्या रिकाम्या जमिनीवर महारांच्या निराळ्या वसाहती स्थापन करण्यात याव्या अशी त्यांची मागणी होती. कारण या वसाहतींत महार स्वतंत्र व स्वावलंबी होईल. रयतेचा गुलाम राहणार नाही.[२६]

अस्पृश्यतानिवारणाकरिता सुरू केलेली चळवळ ही एक प्रकारचे दबावाचे राजकारण आहे. कारण नाक दाबल्याशिवाय हिंदू तोंड उघडणार नाहीत याबद्दल त्यांची खात्री होती. म्हणून ते म्हणतात, " केवळ बुद्धिवादाने हा प्रश्न सुटण्यासारखा असता तर यापूर्वी केव्हाच तो सुटला असता. अरे तर कारे म्हणण्याची, मनगटाला मनगट घासण्याची, अडवणुकीचे मार्ग स्वीकारण्याची, निरनिराळ्या बाजूंनी शह देण्याची तयारी असल्यावाचून अस्पृश्यतेचे ग्रहण सुटण्याची आशाच नको."[२७] १९२७–२८ साली भारतात हिंदू–मुसलमानांमध्ये प्रचंड तेढ होती आणि मुसलमानांचा अलगतावाद मोठ्या प्रमाणात वाढत होता. हा हिंदू व मुसलमान यांच्यातील संस्कृतिसंग्राम होता. अशा वेळी स्पृश्य हिंदूंना अस्पृश्यांकडून मदतीची अपेक्षा असणे स्वाभाविक आहे; परंतु जोपर्यंत स्पृश्य हिंदू अस्पृश्यांना त्यांचे अधिकार देत नाहीत, तोपर्यंत अस्पृश्यांनी हिंदु-मुसलमानसंघर्षात तटस्थ राहावे असे ते सांगतात. अस्पृश्यांतील काही लोकांना त्यांच्यावरील अन्याय सहन होत नसला, त्यांना संयमाचा मार्ग जर पटत नसला तर त्यांनी धर्मांतर करून मुसलमान व्हावे. कारण अशा धक्क्यामुळे तरी हिंदू घाबरतील. स्पृश्यांना जरी अस्पृश्यांविषयी प्रेमाचा पान्हा फुटत नसला, तरी त्यांना आपल्या संरक्षणाची चिंता आहे. त्यामुळे अस्पृश्यांनी जर सत्याग्रहाची बाजू जोराने लावून धरली तर हिंदू त्यांचे हक्क कबूल करतील.[२८] धर्मांतर हा एक जालीम उपाय झाला. त्याबरोबर राष्ट्रसंघात किंवा लीग ऑफ नेशन्सकडे पण दलितांनी जाऊन आपल्यावरील अन्याय जगाच्या वेशीवर टांगावा असे ते सांगतात.

अस्पृश्यांचा सामाजिक प्रतिकार राजकीय प्रतिकारात परिवर्तित होणार आहे हे डॉ. आंबेडकरांना माहीत होते. कारण अस्पृश्यांना आपले

अनुक्रमणिका

अधिकार मिळविण्यासाठी सरकार व स्पृश्य या दोघांशी भांडावे लागणार होते. म्हणून ज्या वेळी इतर राजकीय पक्षांनी सायमन कमिशनवर बहिष्कार टाकला त्यावेळी बाबासाहेबांनी कमिशनपुढे साक्ष देऊन अस्पृश्यांसाठी वेगळ्या मतदारसंघांची मागणी केली. १८८५ पासून कॉंग्रेस पक्ष देशात राजकारण करीत आहे; पण त्या पक्षाच्या पुढाऱ्यांचा सर्व वेळ मुसलमानांशी लांगूलचालन करण्यात गेला. १९०९ व १९१९ च्या सुधारणांमुळे मुसलमानांना राखीव मतदारसंघ मिळाले; पण अस्पृश्यांना काहीच मिळाले नाही. मोतीलाल नेहरू समितीनेपण अस्पृश्यांना काही देण्याचे कबूल केले नाही; पण मुसलमानांना भरमसाट सवलती देऊ केल्या. म्हणून बाबासाहेबांनी त्या रिपोर्टवर कठोर हल्ला करून सांगितले, की हा रिपोर्ट म्हणजे वरच्यांना वरती व खालच्यांना खाली ठेवणारा ब्राह्मणी कावा आहे. नेहरूसमितीस मागासवर्गीयांपेक्षा मुसलमानांना जास्त जपायचे आहे. कारण मुसलमानांना जास्त सवलती दिल्या तर देश बुडेल पण ब्राह्मण्य बुडणार नाही; पण मागासवर्गीयांना जास्त सवलती दिल्या तर देश बुडणार नाही पण ब्राह्मण्य बुडेल. हा रिपोर्ट संपूर्ण राष्ट्रासाठी धोकादायक आहे असे बाबासाहेबांचे मत होते. म्हणून मुसलमानांचा रोष पतकरून त्यांनी त्यावर कडक टीका केली [२९]

अस्पृश्यांना जर स्पृश्यांच्या गुलामगिरीतून मुक्त व्हावयाचे असेल तर त्यांनी राजकीय हक्क मिळविले पाहिजेत. आणि अस्पृश्यांना त्यांच्या संख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व आणि विभक्त राखीव मतदारसंघ हेच ते अधिकार असू शकतात. त्या हक्कांची त्यांनी मागणी केली तेव्हा देशभर त्यांच्यावर टीका झाली. त्या वेळी बाबासाहेबांनी विरोधकांना सांगितले की, " स्पृश्य व अस्पृश्य यांची संस्कृती एक असली तरी ते दोन वेगवेगळे समाज आहेत. इतके दिवस ते सामाजिक दृष्ट्या वेगळे होते ते राजकीय दृष्ट्या वेगळे झाले त्यात तुमचे काय बिघडले ? स्पृश्य हिंदूंनी अस्पृश्यांसाठी काय केले ! " [३०] उलट नेहरू समितीस मुसलमान अस्पृश्यांपेक्षा जास्त जवळचे वाटले. त्यामुळे हिंदूंना त्यांनी सांगितले, " आमचे व्हावे व आमचा विश्वास संपादन करावा मग आम्ही तुमचे होऊ व तुम्हाला आमचे मानू. तोंपर्यंत आमची वाट स्वतंत्रपणे चालत आहोत. " [३१] कारण स्पृश्यांचे सामाजिक अतिक्रमण रोखण्यासाठी आम्हास राजकीय सत्तेमध्ये सहभाग पाहिजे. वेगळा राखीव मतदारसंघ यासाठी पाहिजे, की मिश्र मतदारसंघात स्पृश्यांचा बगलबच्चाच निवडून येऊ शकेल व अस्पृश्यांची स्वाभिमानाची चळवळ साफ बुडेल.[३२] त्यांच्या या भूमिकेमुळे बाबासाहेबांवर देशद्रोही म्हणून टीका झाली; पण बाबासाहेबांनी स्पष्ट सांगितले, की स्पृश्यांचे स्वराज्य मिळविण्याचे प्रयत्न जर अस्पृश्यांची गुलामगिरी कायम ठेवून होत असतील तर त्या सर्व खटपटीत जितकी विघ्ने आणता येतील तितकी आणली पाहिजेत.[३३] कारण 'आपला विरोधक पेचात पडला असता त्याला अडवून आपले अधिकार मिळविणे व्यवहारसंमत आहे असे त्यांचे मत होते.[३४] स्पृश्यांच्या राजकीय हक्कांपेक्षा प्रथम अस्पृश्यांना त्यांचे मानवी हक्क मिळवून देणे जास्त आवश्यक आहे असे त्यांचे मत होते.

डॉ. आंबेडकरांनी त्या काळात चाललेल्या राष्ट्रीय चळवळीला पाठिंबा दिला नाही म्हणून ते इंग्रजधार्जिणे होते असा त्यांच्यावर आरोप केला जातो. पण तो फारसा बरोबर नाही. कारण इंग्रज भारताच्या संपत्तीचे शोषण करीत आहेत, इंग्रजांनी ज्या प्रमाणात अस्पृश्यांना मदत करावयास पाहिजे होती त्या प्रमाणात त्यांनी ती केली नाही असे इंग्रजांवर बाबासाहेबांचे आरोप होते. सरकार अस्पृश्यांचे सार्वजनिक हक्क मान्य करीत नाही व स्पृश्यांच्या दडपणाला भिते असेही त्यांचे मत होते.[३५] त्यामुळे अस्पृश्यांना देखील स्वराज्य हवे आहे असे ते म्हणतात. पण त्यांना हवे असलेले स्वराज्य पूर्वीच्या स्वराज्याची आवृत्ती नको. ज्या स्वराज्यात त्यांच्या माणुसकीचा खून होणार नाही, ज्या स्वराज्यात त्यांच्या हक्कांचे संरक्षण होईल असे स्वराज्य त्यांना हवे आहे.[३६] अस्पृश्यांनापण इंग्रजांविरुद्ध लढायचे आहे; पण सध्याच्या विचित्र परिस्थितीमुळे तसे करता येत नाही. डॉ. आंबेडकर लिहितात, "अस्पृश्य वर्ग हा स्पृश्य व सरकार या दोन्ही दलांच्या तावडीत सापडलेला

वर्ग आहे. दोन्ही दलांवर एकाच वेळी मारा करण्याइतके बळ त्याच्यात आज नाही हे कबूल करण्यात लाज नाही. जेथे स्पृश्य जनता त्यांचे मानवी हक्क स्वखुषीने व सलोख्याने देत नाही तेथे ते मिळवण्यासाठी सरकारशी तह करणे हेच अस्पृश्यांचे हिताचे दृष्टीने शहाणपणाचे आहे." [१७] याचा अर्थ अस्पृश्य पुढारी इंग्रजांचे बगलबच्चे होते असा होत नाही.

वरील चर्चेवरून आपल्या लक्षात येईल, की डॉ. आंबेडकरांना अभिप्रेत असलेले राजकारण हे दबावाचे राजकारण आहे आणि त्यांचा सामाजिक प्रतिकाराचा सिद्धांत देखील अशा राजकारणावरच आधारलेला आहे. सत्याग्रहाचा उद्देश अस्पृश्य जनतेला वरचेवर प्रतिकारक्षम लढाऊ बनविणे हा होता. त्यामुळे सरकारची बोटचेपी भूमिका लक्षात येताच त्यांनी महाडचा सत्याग्रह मागे घेतला. या सत्याग्रहामागची व्यापक भूमिका स्पष्ट करताना ते लिहितात, "सत्याग्रहाची ही जी चळवळ आरंभिलेली होती ती केवळ चवदार तळे करण्यापुरती आरंभिलेली नव्हती; तर अस्पृश्य लोकांना आपल्यापुढे ठेविलेले ध्येय पदरात पडेतोपर्यंत ती कायम टिकावी या हेतूने ती उभारण्यात आली होती. अनेक सत्याग्रह करण्याइतका जोम टिकावा म्हणून महाडचा सत्याग्रह तहकूब करणे भाग पडले." [१८] आपला मार्ग हा मध्यममार्ग आहे असे सांगून ते लिहितात, "आपल्या चळवळीचा झगडा होता होईल तो तडजोडीने, कायदेशीर साधनांनी आणि स्वतःच्या पक्षाची कमीत कमी हानी होईल अशा रीतीने चालवायचा असे आमचे धोरण आहे कारण येथे नुसत्या धडाडीचा किंवा नुसत्या फाजील मवाळ वृत्तीचा उपयोग नसतो. [१९] म्हणून अस्पृश्यांनी आपली चळवळ एकूण परिस्थितीचा अभ्यास करून चालवावी असे त्यांचे मत आहे.

केवळ मनपरिवर्तनाने अस्पृश्यता नष्ट होणार नाही हे डॉ. बाबासाहेबांना समजत होते. म्हणूनच त्यांनी दबावाच्या राजकारणावर जास्त भर दिला. शिवाय त्यांची चळवळ ज्या लोकशाहीवादी संकल्पनेच्या चौकटीमध्ये चालविली जात होती त्यातसुद्धा दबावाच्या राजकारणालाच वाव होता. जातिबद्ध सरंजामशाहीशी लढताना कधी भांडवलशाहीशी तर कधी इंग्रजी साम्राज्यवाद्यांशी तडजोड करणे अपरिहार्य होते. कारण प्रथमपासून बाबासाहेबांचा रोख सरंजामशाहीविरुद्ध होता आणि एकूण अस्पृश्य समाजाच्या आर्थिक सामर्थ्याचा विचार केला असता बाबासाहेबांना संघर्ष, थोडी तडजोड, संघर्ष अशा पद्धतीनेच जावे लागत होते. त्यांचा पुढचा प्रवास देखील याच मार्गाने झाला.

बाबासाहेब वास्तववादी विचारवंत होते आणि अस्पृश्यता दूर करणे म्हणजे स्पृश्यांच्या स्वार्थाला धक्का लावणे आहे हे त्यांना माहीत होते. म्हणून त्यांनी सत्याग्रह व प्रतिकारयोग या दोन कल्पनांच्या वास्तववादी व्याख्या केल्या आणि सत्याग्रहाशिवाय अस्पृश्यांत आत्मसन्मानाची भावना निर्माण होऊ शकत नाही आणि स्पृश्यांचे मनपरिवर्तन होणार नाही असे सांगितले. [४०] 'बहिष्कृत भारता'त त्यांनी सामाजिक प्रतिकाराविषयी मूलभूत अशी भूमिका मांडली व त्या आधारे आपल्या चळवळी चालविल्या. त्यामध्ये परिस्थितीनुसार व अनुभवानुसार त्यांनी काही बदल केले; पण सामाजिक अन्यायनिवारणार्थ सामाजिक व राजकीय प्रतिकार, हा मुख्य मुद्दा कायम राहिला. आज देखील दलितांच्या बऱ्याच समस्या सोडविल्या गेल्या नसल्यामुळे डॉ. आंबेडकरांनी उपस्थित केलेल्या विचारांच्या भोवतीच दलित मुक्तीच्या विविध चळवळी उभ्या राहत आहेत व त्यांनी सुचविलेल्या साधनाचाच मुख्यतः त्यांमध्ये वापर केला जात आहे हे गेल्या दोन तीन वर्षांच्या घटनांवरून सिद्ध होते.

संदर्भ :

१) 'बहिष्कृत भारत' हे पाक्षिक बाबासाहेबांनी जवळजवळ सव्वा दोन वर्षे चालविले. त्याचा पहिला अंक ३-४-१९२७ रोजी निघाला व शेवटचा अंक १५-११-१९२९ या दिवशी निघाला. ह्या दोन वर्षांचा काल मोठा धामधुमीचा होता आणि महाड सत्याग्रह व सायमन कमिशन या घटना

याच काळातील. 'बहिष्कृत भारता'तील अग्रलेख व स्फुटलेख आपल्या दोन खंडांत संपादित केल्याबद्दल श्री. रत्नाकर गणवीर यांचे आभार मानावे तितके कमी आहेत. प्रस्तुत लेखातील विश्लेषण त्यांनी संपादित केलेल्या या दोन खंडांवरच आधारित आहे.

२) 'बहिष्कृत भारतातील डॉ. आंबेडकरांचे स्फुटलेख', संपादक रत्नाकर गणवीर, रत्नमित्रा प्रकाशन, भुसावळ १९८१; पृ. १३४.

३) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे बहिष्कृत भारतातील अग्रलेख, संपादक रत्नाकर गणवीर, रत्नमित्रा प्रकाशन, भुसावळ, १९७६, पृ. १८१.

४) अग्रलेख पृ. १९३.
५) अग्रलेख पृ. ९४–९५.
६) अग्रलेख पृ. १११.
७) अग्रलेख पृ. १०२.
८) स्फुटलेख पृ. १४३.
९) स्फुटलेख पृ. १३७–३८.
१०) स्फुटलेख पृ. ९४, २१३.
११) अग्रलेख पृ. ११५–११६.
१२) अग्रलेख पृ. १७४.
१३) अग्रलेख पृ. १७५.
१४) अग्रलेख पृ. १७६.
१५) उक्त
१६) अग्रलेख पृ. १७६–७७.
१७) अग्रलेख पृ. १८२.
१८) उक्त
१९) अग्रलेख पृ. १८३.
२०) अग्रलेख पृ. १८४.
२१) अग्रलेख पृ. ८८–८९.
२२) अग्रलेख पृ. ९२.
२३) अग्रलेख पृ. १९९–२००.
२४) अग्रलेख पृ. १५५.
२५) अग्रलेख पृ. १७५.
२६) अग्रलेख पृ. २०२.
२७) स्फुटलेख पृ. १८१.
२८) अग्रलेख पृ. १८६–८७.
२९) अग्रलेख पृ. २६३–६५.
३०) अग्रलेख पृ. २१६–१७.
३१) अग्रलेख पृ. २२५.
३२) अग्रलेख पृ. २८९.
३३) अग्रलेख पृ. ३४०.
३४) अग्रलेख पृ. १९१.
३५) स्फुटलेख पृ. १०–११.
३६) स्फुटलेख पृ. १५८.
३७) स्फुटलेख पृ. १३३.
३८) स्फुटलेख पृ. १३५.
३९) उक्त.
४०) अग्रलेख पृ. ३३७.

अनुक्रमणिका

उपहासिका

किशोर भिडे

प्रास्ताविक

साहित्यप्रकारांतील उपहास–वाङ्मयाकडे (*Satire*) साहित्यसमीक्षकांचे मोठ्या प्रमाणात दुर्लक्ष झालेले आहे. कदाचित शोकात्मिका, सुखात्मिका यांच्याप्रमाणे उपहासिका हा सीमित प्रकार नाही हे कारण असू शकेल. शोकात्मिका, सुखात्मिका, महाकाव्य इ. प्रकारांत वाङ्मयाची विभागणी करण्याच्या परंपरागत पद्धती, सर्वसमावेशक अशा उपहासवाङ्मयाला लागू पडू शकत नाहीत. आणि त्यामुळेच शोकनाट्याची व्याख्या करणे शक्य होते, त्याप्रमाणे शैली व रचनेचे नियम यांच्या द्वारे उपहासिकेची व्याख्या करणे समीक्षकांना साध्य झालेले नाही. आणि तरीही " उपहास " हा आपल्या वाङ्मयीन अनुभवांपैकी स्वतंत्र व वैशिष्ट्यपूर्ण अनुभव आहे. जाणकार वाचकांमध्ये " उपहास " ही संज्ञा कशाला लावायची ह्यात मोठ्या प्रमाणावर एकमत होते, हा आपला अनुभव आहे. आणि म्हणूनच उपहासवाङ्मयाच्या बाबतीत वाङ्मयीन विभाजनाच्या पारंपरिक पद्धतीचा वापर करून, तो सीमाबद्ध करण्याचे प्रयत्न सोडून देणे इष्ट होय. त्याऐवजी आपण जर उपहासकांची स्वसमाजाकडे अथवा स्वसमाजाच्या संपर्कातील दुसऱ्या समाजांकडे बघण्याची वृत्ती, व ही वृत्ती लोकांपर्यंत पोचविण्याचे त्यांचे मार्ग ह्यांचा विचार केला तर ते अधिक उपयुक्त ठरेल.

याच मार्गाचा अवलंब करून उपहास (*satire*), उपहासिका (*satiricalcomedy*) व उपहासक (*satirist*) यांच्या विषयीच्या चर्चेने या विषयाचा मागोवा घेणे योग्य ठरेल. नंतर उपहासाचा उगम व उपहासकाची शस्त्रे यांचा विचार करून उपहासिकांवरील चर्चेने या लेखाचा समारोप करता येईल.

अर्थातच पुढे जाण्यापूर्वी दोन गोष्टींचा खुलासा करणे जरुरीचे वाटते. १) उपहास ही काही सुखात्मिकेची मक्तेदारी नाही. शोकात्मिका, शोकसुखात्मिका इत्यादी वाङ्मयप्रकारांमध्येदेखील उपहास आढळतो. शेक्सपियरच्या नाटकांतील उत्तम उपहास हा त्याच्या सुखनाट्यांपेक्षा किंग लीअर, हॅम्लेट अशा शोकनाट्यांमध्येच आढळतो, हे वादातीत आहे. परंतु या लेखात मात्र सुखनाट्यांमधील उपहासाचाच विचार करावयाचा आहे. २) उपहास–वाङ्मयाचा विचार उपहासकाच्या खाजगी जीवनाचा विचार केल्याशिवाय पूर्ण होऊ शकत नाही, असे एक मत मांडले जाते. परंतु या लेखात जागेअभावी तसेच ज्या नाटकांची चर्चा केलेली आहे त्यांच्या लेखकांच्या जीवनाचा माझा फारसा अभ्यास नसल्यामुळे वर उद्धृत केलेल्या मताकडे दुर्लक्ष केले पाहिजे. तसेच वरील मताशी मी पूर्णपणे सहमत आहे, असे देखील नाही.

येथे चर्चेसाठी निवडलेल्या उपहासिकांमध्ये इंग्रजी भाषांतरे उपलब्ध असलेली युरोपियन नाटके, इंग्रजी नाटके व मराठी नाटके यांचा समावेश आहे. काही इंग्रजी पारिभाषिक संज्ञांना समांतर अशा मराठी संज्ञा उपलब्ध नसल्यामुळे त्या येथे तयार करून घेतल्या आहेत. परंतु घोटाळा टळावा म्हणून जागोजागी कंसात इंग्रजी संज्ञाही दिलेल्या आहेत.

उपहास, उपहासिका व उपहासक

द वेब्स्टर्स न्यू वर्ल्ड डिक्शनरीमध्ये उपहासाची व्याख्या पुढीलप्रमाणे केलेली आढळते : " दुर्गुण, चुका, गैरव्यवहार इत्यादींची निर्भत्सना करण्याकरिता व त्यांच्याबद्दल तिटकारा निर्माण करण्याकरिता त्या चव्हाट्यावर मांडणारी विशिष्ट प्रकारची वाङ्मयीन कलाकृती " (*A Literary work of a special kind in which vice, follies, stupidities and abuses etc. are held up to ridicule and contempt.*)

सर्व लिखित व मौखिक संप्रेषणांना सामावून घेणारी उपहासाची व्याख्या ' द शार्टर ऑक्सफर्ड

डिक्शनरी'मधे आढळते. 'उपरोध, व्याजनिंदा, मस्करी इत्यादींचा दुर्गुण, चुका, गैरव्यवहार अथवा कोणत्याही प्रकारचे दुष्कृत्य यांची निर्भर्त्सना करण्यासाठी, ती चव्हाट्यावर मांडण्यासाठी अगर त्यांची खिल्ली उडविण्यासाठी लिखित वा मौखिक संप्रेषणांमध्ये केलेला वापर.' (*'The employment in speaking or writing, of sarcasm, irony, ridicule, etc. in denouncing, exposing or deriding vice, folly, abuses, or evils of any kind.'*)

ह्यावरून हे उघड होते की, उपहासक हा मूर्खपणाच्या, अव्यवहार्य, दुष्ट, जाचक अशा सामाजिक सांस्कृतिक वा धार्मिक विचारसरणींचा (*ideologies*) जुनाट झालेले, टाकाऊ स्वरूपाचे नैतिक, सांस्कृतिक रीतीरिवाज; भोंदू, दुष्ट, स्वार्थी व्यक्ती ह्यांचा कट्टर शत्रू असतो. आदर्श उपहासक धैर्यशाली, संवेदनाक्षम, कल्पक, बुद्धिमान तसेच नीर–क्षीर-विवेक करण्यात तरबेज असावा लागतो. "निंदकाचे घर असावे शेजारी" असे तुकाराम महाराज म्हणतात, तेव्हा त्यांना "निंदक" या शब्दाचा अर्थ "उपहासक" असाच अभिप्रेत असला पाहिजे. परंतु उपहासकाच्या शेजारी तुकाराम महाराजच राहू जाणे. सर्वसामान्यांना उपहासक हा आपल्यापासून चार हात दूरच असावा असे वाटले तर त्यात नवल कोणते! याचे कारणही उघडच आहे, उपहासक स्वतःकडे श्रेष्ठत्व घेऊन... समाजाकडे वा त्यातील काही घटकांकडे तुच्छतेने पाहत असतो व त्यांच्यातील दोषांवर आपल्या तीक्ष्ण, धारदार शस्त्रांनी हल्ला चढवीत असतो. समाजातील उणिवांचे अथवा त्यातील काही सडलेल्या घटकांचे उच्चाटन करण्याचा हा सर्वोत्तम मार्ग कदाचित नसेलही; परंतु उपहासक ह्याच मार्गाचा अवलंब करतो. असेही म्हणता येईल की, उपरोध, व्याजनिंदा, विडंबन इत्यादी धारदार शस्त्रांनी हल्ला चढविण्याचा उपहासकाचा मार्ग त्याची मनोवृत्ती (*temperament*), त्याचे समाजमनासंबंधीचे ज्ञान, समाजातील त्याचे स्थान व त्याचे भाषेवरील प्रभुत्व इ. बाबी निश्चित करतात.

समाजातील दोष, उणिवा, तसेच त्यातील सडलेले, कुजलेले घटक यांचे उच्चाटन करण्यात उपहासक किती प्रमाणात यशस्वी ठरतो, हा एक वादाचा मुद्दा आहे. डॉ. जॉन्सन, जॉन ड्रायडन, डॅन्यल डेफो, अलेक्झांडर पोप, आचार्य अत्रे हे या बाबतीत बरेच आशावादी होते, असे दिसून येते. दुर्गुणरूपी रोगांनी पछाडल्याने अशक्त झालेला समाज उपहासाच्या औषधाने बरा करता येतो असा त्या सर्वांचा विश्वास होता व तो त्यांनी वेळोवेळी व्यक्त देखील केलेला दिसतो. डीन स्विफ्ट याने मात्र याबाबत निराशावादी मत नोंदविले आहे. द बॅटल ऑफ बुक्स या आपल्या पुस्तकाच्या प्रस्तावनेत तो लिहितो, "उपहास हा असा आरसा आहे की, ज्यात पाहणाऱ्याला स्वतःचा सोडून इतर सर्वांचे चेहरे आढळतात; व त्यामुळेच उपहास आवश्यक तो परिणाम साधू शकत नाही." तदनंतर डीन स्विफ्टने, "उपहास बव्हंशी नीतिमान लोकांना अनैतिकतेकडे झुकू देत नाही; परंतु दुष्टांच्या बाबतीत तो काहीच करू शकत नाही" असेही लिहिले आहे.

माझ्या मते व्यक्तींमधील दांभिकता, दुर्गुण इ. दोष चव्हाट्यावर मांडून समाजजीवनातील त्यांचे वर्चस्व संपुष्टात आणण्याच्या बाबतीत उपहासक खूपच यशस्वी ठरतो. मात्र चुकीच्या विचारप्रणाली, निरर्थक रीतिरिवाज अथवा कालबाह्य रूढी लोकांनी टाकून द्याव्यात ह्यासाठी त्यांना प्रवृत्त करण्याच्या प्रयत्नात तो म्हणावे तितके यश संपादन करू शकत नाही.

एखाद्या गोष्टीची आक्रमक निर्भर्त्सना कलेच्या प्रांतात केव्हा प्रवेश करते? केवळ आक्रमक निर्भर्त्सना म्हणजे कला ठरू शकत नाही. खालावणाऱ्या राजकीय, सामाजिक अथवा शैक्षणिक स्थितीवर पोटतिडकीने, अतिशय प्रखर व जहाल भाषेत केलेले हल्ले आपण वृत्तपत्रांच्या अग्रलेखांत व इतर स्फुटांमध्ये वाचतो, तसेच जाहीर भाषणांमध्ये ऐकतो, परंतु लोकांच्या चित्तवृत्ती उल्हसित करण्याची ताकद त्यांच्यांत नसेल, तर त्यांना कलेचा दर्जा प्राप्त होत नाही.

या लेखाची मर्यादा लक्षात घेता, लोकांच्या (म्हणजेच प्रेक्षक, वाचक, श्रोते) चित्तवृत्ती उल्ह-

सित करून त्यांना निर्भेळ आनंद देणाऱ्या बाबींची चर्चा करणे वा त्यांचे समाधानकारक विश्लेषण करणे शक्य नाही. परंतु त्यांतील महत्त्वाच्या बाबी थोडक्यात मांडणे आवश्यक ठरते. कलेच्या दर्जाप्रत जाणाऱ्या उपहासवाङ्मयात "कोटी"चा (*wit*) अतिशय मार्मिक वापर असायला हवा; ऐकायला सुखकारक वाटणाऱ्या तालबद्ध, लयबद्ध भाषेचा वापर त्यात असायला हवा; खऱ्या जगाचे अप्रत्यक्ष परंतु ओळख पटेल इतके प्रभावी चित्रण करून त्यातील प्रश्न वा व्यक्ती यांवर हल्ला त्यात असावा; तसेच कटु टीका गळयाखाली सहजतेने उतरविण्यासाठी विनोदाचे साखरी आवरण त्यावर असायला हवे. ह्या सर्व गोष्टींचे व्यवधान पाळणे उपहासकास शक्य होते असे नाही. परंतु यशस्वी, उत्कृष्ट उपहासक साहित्यात ह्यांतील बऱ्याचशा गोष्टींचे व्यवधान पाळले गेलेले आपणांस आढळते.

उपहासाचा उगम

उपहासकाची त्याच्या समाजाकडे व त्यातील सडलेल्या घटकांकडे पाहण्याची वृत्ती आक्रमक (अग्रेसिव्ह) व चिकित्सक (क्रिटिकल) असते. त्याच्या या आक्रमक वृत्तीचा उगम, आपण इतरांपेक्षा श्रेष्ठ आहोत या त्याच्या ठाम कल्पनेत सापडतो. या बाबतीत मॅथ्यू हॉगर्टने त्याच्या 'सटायर' या पुस्तकात मांडलेले मत विचार करण्याजोगे आहे: "उपहासकाच्या आक्रमकतेचे मूळ, कळप करून राहणाऱ्या प्राण्यांच्या "धमकावणी प्रयोगात सापडते. कळपाने राहणाऱ्या प्राण्यांची सजातीयांबरोबरची वर्तणूक आक्रमक असते. प्रत्येक प्राण्याचे त्याच्या कळपातील स्थान त्याच्या बलिष्ठतेवर अवलंबून असते. सर्वांत बलिष्ठ प्राणी त्याच्या कळपाचा प्रमुख असतो. ह्या स्थानात वेळोवेळी बदल होत असतो, व हा बदल घडवून आणण्यासाठी दोन प्राणी एकमेकांना धमकावण्या देतात. जोपर्यंत त्या दोघांतील एकजण माघार घेऊन दुसऱ्याचे वर्चस्व मान्य करीत नाही, तोवर हे द्वंद्व चालू राहते. उपहासकाच्या आक्रमकतेचे ह्या धमकावणी प्रयोगाशी बरेच साम्य आहे". यावरून हे उघडच आहे की, उपहास हा आक्रमकता अथवा समाजातील एखाद्या घटकाची दांभिकता, मूर्खपणाची वर्तणूक, दुष्टता, निष्क्रियता किंवा एखाद्या धार्मिक, सामाजिक वा राजकीय विचारसरणीचा पोकळपणा, जुनाट व टाकाऊ अशा सामाजिक, धार्मिक रीतीरिवाजांची जाचक सक्ती, यांपासून निर्माण झालेला उद्वेग यांनी पछाडलेल्या मानसिक स्थितीत जन्म घेतो.

उपहास हे समाजातील सडलेल्या घटकांवर व टाकाऊ कल्पनांवर हल्ला चढविण्याचे प्रभावी शस्त्र आहे, याची जाणीव अगदी आदिम (प्रिमिटिव्ह) समाजांनादेखील होती, हे आता सिद्ध झाले आहे. अशा प्रत्येक समाजात उपहासक असत व ते दुष्ट मनोवृत्तीच्या लोकांची दुष्कृत्ये चव्हाटयावर आणून, त्यांना योग्य मार्गावर आणण्याचे, तसेच इतरांना योग्य मार्गापासून ढळू न देण्याचे कार्य पार पाडीत असत.

हुशारीने जुळणी केलेले व विशिष्ट रीत्या उच्चारलेले शब्द बाणांपेक्षाही प्रखर इजा पोचवू शकतात, याची आदिम मानवासही जाणीव होती, हे सिद्ध करण्यास अनेक पुरावे उपलब्ध आहेत. आणि म्हणूनच (आर्. सी. एलियट) आपल्या 'द पॉवर ऑफ सटायर' या पुस्तकात लिहितो की, उपहासाचा उगम जंगली अवस्थेतील माणसाच्या जादूटोण्यांमध्ये (विचक्राफ्ट) आढळतो.

उपहासिकांचा उगम मात्र निश्चितपणे, एफ्. एम्. कॉर्नफर्ड यांनी द राइज ऑफ ॲटिक कॉमेडीमध्ये सुचविल्याप्रमाणे "डायॉनिसस" च्या सन्मानार्थ आयोजिलेल्या उत्सवांमध्ये आढळतो. अशा उत्सवांत नगरराज्यातील व्यक्ती, नगरराज्याचे कायदे अथवा राजकीय धोरणे यांवर पाहिजे तशी टीका करण्याची मुभा लेखकांना असे. उदाहरणार्थ, ॲरिस्टोफेनीसने क्लिऑ, सॉक्रेटीस अशा त्याला समकालीन असणाऱ्या व्यक्तींना त्यांच्या नाटकात नावानिशी आणून झोडले आहे. फार काय, ज्या देवाच्या सन्मानार्थ हे उत्सव केले जात, त्या डायॉनिससलाच 'द फ्रॉग्ज' या नाटकात सादर केले आहे. त्या नाटकात "डायॉनिसस" ही अत्यंत निर्दय व उद्वेगजनक व्यक्तिरेखा आहे.

उपहासकाची शस्त्रे

समाजातील वैगुण्ये व त्यातील सडलेले घटक यांचे उच्चाटन करण्याच्या दृष्टीने ती चव्हाटयावर आणून त्यांवर उपहासक निर्घृणपणे हल्ले चढवीत

अनुक्रमणिका

असतो हे आपण याआधी पाहिलेच आहे. ह्यावरून हे उघड होते की, उपहासामध्ये दोन गोष्टी महत्त्वाच्या ठरतात : १) उपहासाचे माध्यम व २) उपहासित म्हणजेच जिच्यावर हल्ला चढविलेला असतो ती गोष्ट. साहजिकच उपहासकाच्या शस्त्रांची दोन गटांत विभागणी करता येते. १) उपहासाच्या माध्यमाशी निगडित शस्त्रे व २) उपहासिताशी निगडित शस्त्रे.

उपहासाच्या माध्यमाशी निगडित असलेल्या शस्त्रांची सर्वसमावेशक यादी मेलव्हिल क्लार्क याने दिली आहे– कोटी, टिंगल अथवा मस्करी (*ridicule*), व्याजनिंदा (*irony*), उपरोध (*sarcasm*), सर्वतुच्छता (*cynicism*), निर्दय कुचेष्टा (*the sardonic*), आणि निर्घृण व्याघात (*the invective*). " wit " यासाठी " कोटी " हा मराठी शब्द वापरता येईल. "कोटी" हा शब्द " wit " इतका अर्थसमृद्ध नसला, तरी मराठीतील अन्य शब्दांपेक्षा तोच जास्त जवळचा आहे. आर्थर कोस्लर या ब्रिटिश लेखकाने " द्विसंदर्भीकरण " (*bisociation*) तत्त्व मांडून कोटीचे सुरेख स्पष्टीकरण दिले आहे. तो म्हणतो, "कोटी " हा एखादी कल्पना अथवा घटना दोन परस्परविरोधी संदर्भात एकसमयावच्छेदेकरून अनुभवण्याने साधणारा परिणाम होय. (*wit is the effect of perceiving an idea or event simultaneously in two habitually incompatible frames of reference.*) एक-दोन उदाहरणांद्वारे ह्याचा खुलासा करणे आवश्यक आहे. अॅडमिरल बिंग याच्या अन्याय्य हत्येवर प्रतिक्रिया व्यक्त करताना वोल्तेर म्हणाला, "इतरांना प्रोत्साहन मिळावं म्हणून अधूनमधून एखाद्या अॅडमिरलची हत्या करणे हे या देशात चांगले समजले जाते !" द्विसंदर्भीकरण तत्त्वाचा वापर करून ह्या उद्गाराचे विश्लेषण केले तर आपल्याला पुढील दोन संदर्भ मिळतात— १) इतरांना प्रोत्साहन मिळण्यासाठी अधून मधून एखाद्यास बक्षिसी देणे व २) इतरांना इशारा मिळावा म्हणून अधून मधून एखाद्यास मृत्यूदंड देणे.

माधवराव जोशी, आचार्य अत्रे व अलीकडे सतीश आळेकर ह्यांच्या नाटकांत कोटीच्या मार्मिक उपयोगाची अनेक उदाहरणे सापडतात. अत्र्यांच्या **'मी उभा आहे'** या नाटकाचा नायक प्रमोद काँग्रेसच्या तिकिटावर म्युनिसिपालटीची निवडणूक लढविणार असतो. त्याची प्रेयसी प्रमिला हिलादेखील एक महिलामंडळ तिकीट देऊ करत असते. हे वृत्त ती प्रमोदला सांगते, तेव्हा "आपण दोघे म्युन्सिपालटीत जाऊन काय करणार ?" असे म्हणून तो तिला तिची उमेदवारी मागे घेण्यास सांगतो. त्यावर पितांबर म्हणतो, "काय म्हणजे ?– रोमान्स ! आमच्या म्युन्सिपालटीत दिवसा अंधार असतो – तिथे रोमान्स करायला पुष्कळ जागा आहे..." " रोमान्स ", " दिवसा अंधार ", " जागा " ह्या प्रत्येकास असलेले दोन दोन संदर्भ सहजपणे कळण्याजोगे आहेत.

सतीश आळेकरांच्या **महानिर्वाण** मधील पुढील संवाद पाहा —

स्त्री : नाही ना, मग उठा बरं. (पुरुष हालचाल करीत नाही.) असं काय करताय ? समोरचे बघायला लागलेत मी अशी काय ओरडतेय सकाळपासून म्हणून... तुम्ही अगदी अंत पाहता माणसाचा.

पुरुष : हो.

स्त्री : हो काय ?

पुरुष : अंत पाहतोय.

"पुरुषा"च्या "अंत पाहतोय" या उत्तराचे द्विसंदर्भीकरण तत्त्वाच्या साहाय्याने विश्लेषण केले तर – १) एखाद्याची सहनशक्ती तुटेपर्यंत ताणणे व २) मृत्यू पाहणे. असे दोन संदर्भ दिसतात.

एखाद्या गोष्टीची हास्यास्पदता उघड करून दाखविणे अशी " मस्करी " या संज्ञेची व्याख्या करता येईल. मस्करीचे स्वरूप खेळकर असते. त्यात कटुतेला वाव नसतो.

कचरकुंडीत कचरा न टाकता तो बाहेर टाकणे हा जणू प्रघातच पडून गेला आहे. माधवराव जोश्यांनी **संगीत म्यूनिसिपालिटी** या नाटकात वरील सवयीची चांगली मस्करी केली आहे.

शेखहुसेन...... मैले कचरेके तो ऐसे ढेर पडे हैं।
वो अल्लामियाही एक जानता है,
के कुंडीमें कचरा है या कचरे में
कुंडो पडी है।

ज्या व्यक्तीचा फोटो छापायचा, तिचा ब्लॉक मिळत नसेल तर कोणाचाही ब्लॉक छापून खाली त्या व्यक्तीचे नाव टाकणे ही वृत्तपत्रवाल्यांची वेळ मारून नेण्याची युक्ती मोठे वर्तमानपत्रवाले नसले तरी लहान वृत्तपत्रवाले आजदेखील सर्रास वापरतात. त्याची अत्रे यांनी **मी उभा आहे** या नाटकात चांगली मस्करी केली आहे.

चक्रदेव– उत्तम कल्पना ! मजकूर कमी पडत होता, तो तरी मिळाला. भोपळे, (नोकर येतो) हा मजकूर मोठ्या टायपात व चौकटीत छापा. तुमचा ब्लॉक आहे का ? नसला तर त्या " कामिनिया ऑईल " च्या जाहिरातीतील बाईचा ब्लॉक छापा. म्हणजे लोकांची यांच्या विषयी निदान कल्पना तरी चांगली होईल ! आणि (टोळाकडे बोट दाखवून) यांच्या ऐवजी त्या गजकर्ण मलमाच्या जाहिरातीमधील माणसाचा ब्लॉक छापा.

मासिकातून येणाऱ्या ठरीव साच्याच्या कथांची सतीश आळेकर **शनिवार रविवार** मध्ये सुरेख मस्करी करतात.

ईश्वर– आज माहेर, ललना, स्त्री, प्रपंच वाचलं की, दादा चव्हाण यांची कादंबरी वाचून पूर्ण केली ? कसल्या कथा या ! कुठलंही मासिक काढून बघा. सगळ्या कथांच्या सुरुवातीदेखील ठरलेल्या. म्हणजे बघ (मासिक चाळतो.) ' अन्न वाढा हो माये... " वसंत विहार " या पॉश सोसायटीमधून एका भिकारणीचा आवाज कापीत गेला. आणि " स्प्रिंग व्हिला " या आपल्या प्रशस्त बंगल्यात झोपलेल्या अवंतिकाबाईंची दुपारची झोप चाळवली. मग झोप अशी लागलीच नाही. थोडा वेळ त्यांनी " लाइफ "च्या ताज्या अंकात मन रमविण्याचा प्रयत्न केला. तोच त्यांना एकदम जोराची उलटी आली. म्हणून त्या आपल्या मार्बलच्या बाथरूममध्ये धावल्या. मग मात्र त्यांच्या विचारचक्राला पारावार उरला नाही आणि मनात आलेल्या " त्या " विचारांनी त्या मनोमन ओशाळल्या.' हे असं तरी असतं, नाही तर मग एकदम– ' मंदा अस्वस्थ होती. इतकी की तिने सकाळपासून रमेशने तिला पॅरिसहून आणलेली नायटीदेखील बदलली नव्हती. तिच्या मनात एकच विचार– रमेशने आपल्याला नायटी आणली हे त्याच्या बायकोला कळले तर नाही ?' मग सुमनबाई, कसा गेला आजचा दिवस ?

व्याजनिंदेत वापरलेली भाषा द्विसंदेशवाहक असते. ऐकणारासाठी एक व खास जाणकारांसाठी दुसरा, अशा दोन संदेशांचे एकाच वेळी वहन करण्याची क्षमता असलेल्या भाषेचा एखाद्या गोष्टीची वा व्यक्तीची खिल्ली उडविण्यासाठी केलेला वापर, अशी त्याची व्याख्या करता येईल. बर्नार्ड शॉच्या **द मॅन ऑव्ह डेस्टिनी** ह्या नाटकातील व्याजनिंदेचा हा वापर पहा– (मराठी अनुवाद माझा.)

नेपोलियन– ह्या अधिकाऱ्याचं करावचं तरी काय, जुझेपे ? तो जे जे काही बोलतो, ते चूकच असतं !

जुझेपे : त्याला सेनापती (जनरल) बनवा, महाराज, म्हणजे तो जे काही म्हणेल ते बरोबर ठरायला लागेल.

नेपोलियनच्या सैन्यातील एका महामूर्ख अधिकाऱ्याला सेनापती बनविण्याचा सल्ला देऊन सकृत्दर्शनी वेडा, भोळा दिसणाऱ्या खानावळवाल्याने नेपोलियन तसेच त्याच्या सैन्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची खिल्ली उडवली आहे.

दाहक, पोळणाऱ्या भाषेचा दुसऱ्याच्या भावना दुखविण्यासाठी केलेला वापर म्हणजे " उपरोध ". उपरोध हे ओबडधोबड शस्त्र असून त्याच्या प्रहाराने होणारी जखम लवकर भरून येत नाही. उपरोधाच्या वापरात सतीश आळेकरांची बरोबरी करणारा लेखक मराठीत आज तरी कोणीही दिसत नाही. आळेकरांच्या उपरोधाची काही उदाहरणे...

इसम १ : तुम्ही झक मारत इथेच (स्मशानात) कशाला कडमडलात ?

इसम २ : बाप मेला म्हणून; इथे कोणी सुखासुखी येत नसतं. तुम्हाला काय वाटलं, मी पिंड घेऊन इथे ब्रेकफास्टला आलोय ?

(... **महानिर्वाण**)

अनुक्रमणिका

तो – (सुस्तपणे लोळत वाचत पडलेल्या त्याच्या बायकोला उद्देशून) सुमनबाई, वाचून काही इतक्या वर्षांत दिवे लागले नाहीत. निदान दिवे लावून तरी वाचत जा–

(... शनिवार–रविवार)

सर्वतुच्छता आणि निर्दय कुचेष्टा यांचा जन्म पराकोटीच्या भ्रमनिरासाच्या भावनेतून होतो. मेलव्हिल क्लार्क म्हणतो की, सिनिकच्या हास्याला तिरस्काराची झालर असते, तर निर्दय कुचेष्टेच्या हास्याची धार लज्जा व संताप ह्या भावनांनी बोथट झालेली असते. (*The laughter of the cynic is edged with contempt, but the sardonic laughter is blunted with chagrin and mortification.*) सतीश आळेकरांचा गोविंदा (महापूर) आपले वैफल्य व्यक्त करताना सर्वतुच्छतेचा अनेक वेळा आश्रय घेतो–

इसम :...... आता मला असं सांगा, त्यांचा (गोविंदाच्या आईवडिलांचा) प्रेमविवाह झाला होता ?

गोविंदा : सॉरी साहेब. आपण त्या लग्नाला हजर नव्हतो. नाहीतर माहिती दिली असती. हजर नव्हतो म्हणजे होतो, पण सेपरेट सेपरेटली होतो. माझा ताबा जगाने घ्यायचा की नाही, ह्यावरची आमच्या आईवडिलांची शिखर परिषद अजून झालेली नव्हती. पण लग्नाच्या रात्री घोटाळा झालेला असणार. बाबा आदम, आई ईव्ह ढोल वाजवत दादांच्या आश्रमाजवळ पोचले. आणि मला जन्माला घातलंच पाहिजे, असे म्हणू लागले... तर स्वातंत्र्यसैनिक असलेले आमचे वडील रघुनाथ दत्तो कवठेकर आणि सौभाग्यवती अनुसुया रघुनाथ कवठेकर ह्यांच्या लग्नाच्या पहिल्या रात्री घोटाळा झाला. नगारे वाजू लागले. आई ईव्ह आणि बाबा आदम माझा ताबा मागू लागले. नाही तर लग्नाचा लिलाव होईल, म्हणाले. अरे, वंशाचा दिवा म्हणजे काय चेष्टा आहे ? तो लावलाच पाहिजे आणि असं म्हणून आमच्या आई-वडिलांनी ब्रिटिश सरकारवरचा होता नव्हता तेवढा राग एकमेकांवर काढायला सुरुवात केली. प्रथम एकमेकांना " चले जाव, चले जाव " नंतर एकसुरात " चलो दिल्ली, चलो दिल्ली" म्हणत त्यांनी आपली पहिली दांडीयात्रा साजरी केली. त्यात पहिलेझूट पोरगा म्हणजे मोफतमें ओनरशिप फ्लॅटच ! आणि अशा रीतीने आमच्या काई–वडिलांच्या जननसंघाचा मी कुलदीपक ठरलो.

आपल्याला मुल नाही व ते होणंही शक्य नाही, याची स्पष्ट जाणीव असलेला ईश्वर (शनिवार–रविवार– सतीश आळेकर) आपली घोर निराशा (*frustration*) व्यक्त करण्यासाठी निर्दय कुचेष्टेचा (*the sardonic*) वापर वारंवार करतो. उदाहरणार्थ–

सुमन– काही सांगू नकोस. कशाला घेतलंस त्या गंमतला घरात ?

ईश्वर– अगं, मला काय स्वप्न पडलं होतं की, ही भानगड गेली अकरा वर्षं चालू आहे म्हणून ... दारूच्या तारेत त्या तोतऱ्याला घरात घेतलं आणि आमचीच गंमत करून घेतली. कविता करतोय भाड ...

सुमन– दार तू उघडलंस. मी नाही. आता माझ्या लेखी तो ह्या दोघांच्या संसारात आलेला पाहुणा आहे. मला त्याला जपलं पाहिजे. एक लक्षात ठेव, अहंकार तुझा आहे, तसा माझा आहे. मी तुझा जपते, तसा माझा तू जप.

ईश्वर– (वेडावत) तुझा मी जपते, तसा माझा तू जप. त्या तोतऱ्याला पदरात घे. त्याला दुखवू नकोस. त्याला आंघोळ घाल. त्याला करगोटा घाल. तुझा अहंकार मी कशाला जपू ? गेल्या दहा वर्षांत साधं एक मूल देता आलं नाही तुला ?

सर्वतुच्छता व निर्दय कुचेष्टा यांच्यांत रक्ताचे नाते आहे, ही गोष्ट वरील दोन उदाहरणांवरून लक्षात येते. फरक इतकाच की, सर्वतुच्छतेला पोकळ हास्याची तरी संगत असते, तर निर्दय कुचेष्टा इतकी निराशावादी असते की, पोकळ हास्याची देखील संगत तिला असह्य होते.

निर्घृण व्याघात (the invective) म्हणजे लक्ष्यावर कशाचाही विधिनिषेध न बाळगता निर्दय निर्घृण प्रहार करणे होय. उदाहरणार्थ-

ईश्वर- दिवसभर मी बँकेत गेल्यावर तू काय करतेस ?

सुमन- वाचत असते. तू जसं वर्णन करतोस तशी. आणि फार झालं आता. पुरे पिणं. काहीही बोलायचं म्हणजे काय ?

ईश्वर- खोटं बोलती. बिन पोराची बाई खोटं बोलती. आयला ! आमच्या नशिबातच नाही. एकच ग एकच ! गोरं, गोरं, काळे, काळे डोळे. अंगाला वेखंडाचा वास आणि बापाच्या तोंडात चोरलेला डिंकाचा लाडू. (एकदम लहान मुलाला खेळवत असल्यासारखं करीत) अले अले अले अले अले... कुणी माललं. आईकडं जायचं... ही ही आई नाहीच मुळी. मी पण बाबा नाही. सगळे प्रयत्न संपले. देशात दर मिनिटाला पंधरा हजार मुलं जन्माला येतात. पण आमच्याकडे बोंब. जमीन नापीक (सुमनच्या डोळ्यांत पाणी. हुंदका आवरत नाही.) रडा! आयला, मरा! जन्मभर रडा. रडायला काय झालं ? रडून पोरं होत नाहीत ... (शनिवार-रविवार सतीश आळेकर).

लक्ष्याचे अवमूल्यन हे उपहासकाचे लक्ष्याशी निगडित असलेले शस्त्र होय. हे अवमूल्यन साधण्याचे अनेक कल्पक प्रकार उपहासकांनी शोधून काढले आहेत. प्राणिजगताचा (अॅनिमल वर्ल्ड) आश्रय घेणे हे त्यांतील कदाचित सर्वांत परिणामकारक तंत्र आहे. जॉर्ज ऑरवेल ने आपल्या '**अॅनिमल फार्म**' मध्ये या पद्धतीचा वापर करून कम्युनिस्ट सत्ताधाऱ्यांच्या दांभिकतेवर कडाडून हल्ला चढविला आहे. ह्या कादंबरीतील व्यक्तिरेखा म्हणजे डुकरे, घोडी, कुत्री असे प्राणीच आहेत. प्रत्यक्ष प्राण्यांना रंगमंचावर न आणता नाटकातील व्यक्तींचा प्राण्यांशी असणारा संबंध मात्र स्पष्ट होईल, अशी नावे त्यांना देणे याचा वापरही प्रचलित आहे. प्रौढ व्यक्तींना लहान मुलांचे कपडे घालून रंगमंचावर सादर करणे हाही अवमूल्यनाचा एक प्रभावी मार्ग आहे. बौद्धिक वयाचा विचार केला असता ह्या व्यक्तींची बाल्यावस्थाच अजून सुरू आहे, असे उपहासकाला यातून सुचवायचे असते. सतीश आळेकर यांनी **महानिर्वाण** या नाटकात या तंत्राचा वापर केला आहे (अंक दुसरा, प्रवेश दुसरा, पान ४२). नाटकातील व्यक्ती छांदिष्ट (*monamanic*) असल्याचे दाखविणे हेदेखील अवमूल्यनाच्याच प्रकारात बसते. अत्र्यांनी आपल्या **साष्टांग नमस्कार** ह्या नाटकात ह्या तंत्राचा उत्कृष्ट वापर केलेला आढळतो.

विडंबन हा लक्ष्याचे अवमूल्यन साधण्याचा आणखी एक मार्ग आहे. व्यक्तीचे विडंबन करण्याच्या दोन पद्धती आहेत. १) तिचे हावभाव, खास लकबी यांचे विडंबन करणे व २) तिच्या व्यक्तिविशिष्ट भाषेचे विडंबन करणे. विडंबनाच्या ह्या दोनही प्रकारांचा वापर अत्रे यांच्या **साष्टांग नमस्कार** या नाटकात प्रकर्षाने दिसून येतो. या नाटकातील साष्टांग नमस्काराचे वेड असलेले, सर्व समस्यांवर " साष्टांग नमस्कार " हा रामबाण इलाज आहे अशी ठाम समजूत असलेले रावबहाद्दूर शेषाद्री हे पात्र अत्र्यांनी औंधच्या राजेसाहेबांवरून घेतले होते. तसेच या नाटकातील टुकार कवी भद्रायु हे पात्रदेखील अत्र्यांच्या पाहण्यातील एका खऱ्याखुऱ्या कवीचे विडंबित रूप होते.

आख्यान हे देवादिकांचे असू शकते, संतसज्जनांचे असू शकते, थोर राजेमहाराजे यांचेही असू शकते. परंतु सतीश आळेकर यांनी कर्तृत्वशून्य, सर्वार्थाने सामान्य असलेल्या भाऊरावांचे आख्यान **महानिर्वाण** या नाटकात लावून त्या माध्यमाचे अवमूल्यन केले आहे. प्रेक्षकांना धक्का देणे हे त्यांचे त्यामागील उद्दिष्ट आहे.

उपहासिका (*Satirical Comedy*)

उपहासिकांची दोन गटांमध्ये विभागणी करता येईल. १) व्यक्तिकेंद्रित उपहासिका व २) समाजकेंद्रित उपहासिका. व्यक्तिकेंद्रित उपहासिकांत (*Personal Satirical Comedy*) उपहासकाचे उद्दिष्ट हे एखाद्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, साहित्यिक क्षेत्रातील मान्यताप्राप्त परंतु दांभिक व्यक्तीचा बुरखा फाडणे व तिचे खरे स्वरूप लोकांच्या नजरेस आणून देणे हे असते.

अनुक्रमणिका

अशा तऱ्हेच्या नाटकांचे उत्तम उदाहरण म्हणून ॲरिस्टोफेनीस ह्या ग्रीक नाटककाराच्या द क्लाउड्स ह्या नाटकाचा उल्लेख करावा लागेल. ह्या नाटकात त्याने प्रसिद्ध ग्रीक विचारवंत सॉक्रेटिस व त्याच्या अतिरेकी तर्कवादावर (*extreme rationalism*) प्रभावी हल्ला चढविलेला आहे. सॉक्रेटिस हा ॲरिस्टोफेनीसचा समकालीन. ग्रीसमध्ये सामाजिक, धार्मिक, राजकीय इ. क्षेत्रांत बोकाळलेल्या अंधश्रद्धेचा सॉक्रेटिस कट्टर विरोधक होता. कोणत्याही गोष्टीवर, ती जोपर्यंत तर्काच्या मुशीतून तावून सुलाखून निघत नाही तोवर कोणत्याही कारणास्तव विश्वास ठेवू नका, अशी तो आपल्या अखंड वाढत चाललेल्या शिष्यगणांना शिकवण देत असे. ॲरिस्टोफेनीस हा सॉक्रेटिसचा मित्र असला, तरीही सॉक्रटिस पुरस्कार करीत असलेल्या बुद्धिप्रामाण्यवादी तार्किक विचारसरणीतील गर्भित धोका त्याला जाणवला. अशा विचारसरणीच्या साहाय्याने प्रत्येक रूढ समजूत व विश्वास तपासून पहायचे ठरविले तर अंधश्रद्धा समाजातून नाहीशा होतील हे खरे; परंतु सर्वच गोष्टींवरील श्रद्धा नाहीशी झाल्याने अनाचार बोकाळेल व सामाजिक स्थैर्य नाहीसे होईल, असे वाटल्याने ॲरिस्टोफेनीसने, तो स्वतः रूढिप्रामाण्य मानणारा, जुनाट मनोवृत्तीचा नसून देखील आपल्या द क्लाउड्समध्ये सॉक्रेटिसची व त्याच्या विचारसरणीची टिंगल उडविलेली आहे. प्रस्तुत नाटकाचा नायक (*protagonist*) स्ट्रेप्सियाडिश हा एक अतिशय कंजुष म्हातारा आहे. डोक्यावरील कर्जाची परतफेड करायला लागू नये यासाठी एखादे चपखल कारण शोधीत फिरत असताना त्याला असे कळले की, कुणी एक सॉक्रेटिस नावाचा मनुष्य एक वैचारिक दुकान चालवतो; व या दुकानात कितीही खोटी असलेली गोष्ट खरी आहे असे सिद्ध कसे करायचे याचे शिक्षण दिले जाते. आनंदी झालेला स्ट्रेप्सियाडिस सॉक्रेटिसचा शिष्य बनण्यासाठी त्याच्या वैचारिक दुकानात जातो. तेथे त्याला काही मंडळी आपली नाके जमिनीला टेकलेली आणि पार्श्वभाग आकाशाकडे केलेल्या अवस्थेत उभी असलेली दिसतात. ह्या अशा चमत्कारिक अवस्थेत उभी राहून ही मंडळी करताहेत तरी काय ? असे तो तिथल्या एकाला विचारतो. त्यावर, जमिनीत खोलवर पुरली गेलेली गुपिते ते शोधून काढताहेत व त्याच वेळी त्यांचे पार्श्वभाग खगोल शास्त्राचा अभ्यास करीत आहेत, असे उत्तर त्याला मिळते. आणि इतक्यात त्याला, छताला टांगलेल्या प्रचंड टोपलीत बसून आकाशाचे निरीक्षण करणारा एक इसम दिसतो. तो दुसरा तिसरा कोणी नसून सॉक्रेटिसच आहे असे त्याला सांगितले जाते. सॉक्रेटिस स्ट्रेप्सियाडिसला आपला शिष्य म्हणून ठेवून घेतो. थोड्याच कालावधीनंतर म्हाताऱ्याला असे आढळून येते की, कोणतीही गोष्ट नव्याने शिकण्याच्या आपण पलीकडे गेलेलो आहोत. शेवटी तो आपल्या मुलाला सॉक्रेटिसकडे पाठविण्याचे ठरवितो. त्याचा उडाणटप्पू पोरगा तिथल्या अन्याय्य विवादाचा शिष्य बनून अप्रामाणिकपणा हीच यशाची गुरुकिल्ली आहे, असे शिकतो (" अन्याय्य विवाद " व " न्याय्य विवाद " यांचे ॲरिस्टोफेनसने व्यक्तीकरण (*personificaton*) केले आहे). म्हाताऱ्याचा पोरगा ह्या वैचारिक दुकानात शिकून घरी येतो व बापाला पिटून काढतो. लहानपणी खाल्लेल्या माराची ही परतफेड असल्याचे तो बापाला सांगतो. आश्चर्यमूढ झालेला स्ट्रेप्सियाडिस देवाच्या नावाने आपल्या मुलापाशी करुणेची याचना करतो, तेव्हा त्याला देव वगैरे सर्व झूठ असून फक्त निसर्गच खरा, असे उत्तर मिळते. शेवटी चिडलेला, हताश झालेला म्हातारा रस्त्यावर पळत जातो व रस्त्यावरील लोकांना "सॉक्रेटिसचे वैचारिक दुकान व त्याचे नवीन तत्त्वज्ञान नाहीसे करण्यास मदत करा ", असे आवाहन करतो. ते सर्व मिळून सॉक्रेटिसच्या दुकानावर हल्ला चढवितात व ते पाडून, जाळून टाकतात. वेळीच पलायन केल्याने सॉक्रेटिस जिवानिशी सुटतो; असे या नाटकाचे कथानक आहे.

ॲरिस्टोफेनीसच्या मनात सॉक्रेटिसच्या वाढत्या लोकप्रियतेबद्दल मत्सर नव्हता, तसेच त्या दोघांत वैरभावना देखील नव्हती. तरीही ॲरिस्टोफेनीसने द क्लाउड्समध्ये सॉक्रेटिसवर हल्ला चढविला; कारण सॉक्रेटिसच्या शिकवणीमुळे, विशेषतः त्याच्या अपरिपक्व शिष्यांनी केलेल्या त्याच्या शिकवणुकीच्या अनिर्बंध वापरामुळे, समाजाची हानी होऊ शकेल,

असे त्याचे प्रामाणिक मत होते. थोडक्यात सांगायचे, तर हेतूशी प्रामाणिक राहून प्रस्तुत नाटक लिहिले गेले असल्याने व्यक्तिकेंद्रित उपहासिकांमधील एक थोर कलाकृती म्हणून तिचा उल्लेख करणे अपरिहार्य ठरते.

उपहासिकांच्या ह्या प्रकारात थोर कलाकृती अगदी हाताच्या बोटावर मोजण्याइतक्याच सापडतात. द्वेष, मत्सर, वैरभाव इ. नी प्रेरित होऊन लिहिल्या गेलेल्या व म्हणूनच दुय्यम दर्जाच्या कलाकृतीच अनेक. जॉन मार्स्टन ह्या शेक्सपियरकालीन नाटककाराने स्वतःला समकालीन असलेल्या बेन जॉन्सन ह्या प्रसिद्ध नाटककाराची **हिस्ट्रीओमॅस्टिक्स** ह्या नाटकात टिंगल उडविली आहे. यात त्याने बेन जॉन्सनला कवी, उपहासकार, भाषांतरकार, गरीब परंतु गर्विष्ठ आणि सर्वसामान्यांचा तिरस्कार करणारा अशा स्वरूपात सादर केला आहे. मार्स्टनच्या या नाटकाला आपल्या **एव्हरी मॅन आउट ऑफ हिज ह्यूमर** या नाटकात बेन जॉन्सनने उत्तर दिले आहे. ह्यात मार्स्टन दुसऱ्याशी ग्राम्य व अपमानकारक भाषेत बोलणारा, अश्लील विनोद करणारा व वाङ्मयचोर अशा स्वरूपात सादर केलेला दिसतो. **मेलोड मेलोड मेलोड ड्रामा** या नाटकात मुकुंद टांकसाळे ह्या नाटककाराने बाळ कोल्हटकरांच्या भावुक भाबडया (*naive*) व्यक्तिरेखांची व भावनातिरेकी (*sentimental*) लेखनशैलीची टिंगल उडविलेली दिसते.

ही सर्व नाटके दुय्यम दर्जाची अशासाठी की, यांत उदात्त हेतू व प्रामाणिकपणा यांचा अभाव आढळतो. आणि म्हणूनच अशी नाटके चिरकाल टिकून राहू शकत नाहीत. कावळ्याच्या छत्र्यांप्रमाणे ती उगवतात व तशीच नाहीशी देखील होतात.

समाजकेंद्रित उपहासिकांमध्ये (*Non-Personal Satirical Comedy*) उपहासक एखादी राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक प्रणाली; जुनाट झालेल्या सामाजिक, धार्मिक रूढी इत्यादींवर हल्ला चढवितो. अशा गोष्टींच्या जोखडातून समाजास मुक्त करणे हाच ह्या हल्ल्यामागील त्याचा हेतू असतो.

अशा प्रकारच्या कलाकृतींचे लिखाण करणारांमध्ये अग्रक्रमाने अॅरिस्टोफेनीसचेच नाव घ्यावे लागेल. दुसऱ्यांबरोबर युद्ध करण्याच्या माणसाच्या प्रवृत्तीवर हल्ला चढविणारी तीन नाटके त्याने लिहिली आहेत. इतर देशांबरोबर युद्ध करण्याची माणसाची प्रवृत्ती त्याच्या समाजजीवनाच्या उषःकालापासून दिसून येते. युद्ध करणे हे दुष्ट मनोवृत्तीचे द्योतक असून ते मूर्खपणाचे आहे, तसेच युद्धामुळे कोणताही प्रश्न सुटत नसून उलट अनेक प्रश्न नव्याने निर्माण होतात हे कित्येकांना आजदेखील पटणार नाही! **अकार्नियन्स** ह्या अॅरिस्टोफेनीसच्या नाटकाचा नायक अकार्नियात जन्मला असला तरी अथेन्सचा नागरिक आहे. अथेन्स व स्पार्टामध्ये दीर्घ काळ चालू असलेल्या युद्धामुळे त्याला आपले खेडे सोडून देऊन शहरात जावे लागते. युद्धाचा उबग येऊन तो शेवटी स्पार्टाशी व्यक्तिगत करार करतो. युद्धज्वराने पछाडलेल्या अथेन्सच्या नागरिकांना जेव्हा ह्या गोष्टीचा सुगावा लागतो, तेव्हा साहजिकच ते संतापतात व घरभेदी म्हणून त्याची निर्भर्त्सना करतात. परंतु तो आपल्या निर्णयाशी चिकटून राहतो व अथेन्सच्या नागरिकांना सांगतो की, ह्या युद्धाचा संपूर्ण दोष स्पार्टाकडे जात नाही. ह्यावर अथेन्सचे चिडलेले नागरिक ओरडून उठतात, "देशद्रोही, उडाणटप्पू! आमच्याशी अशी भाषा करण्याची तुझी हिंमत तरी कशी झाली? तुला आम्ही सोडून देऊ, अशी तुझी समजूत आहे की काय?" ह्यावर तो म्हणतो की, "युद्धाला नावे ठेवणे हा देशद्रोह कसा काय? कारण या युद्धाबद्दल स्पार्टा जितके दोषी आहे, तितकेच अथेन्स देखील आहे हे मी सिद्ध करून देऊ शकेन. मी जर ते सिद्ध करून देऊ शकलो नाही, तर तुम्ही मला खुशाल मारा." वध करण्यासाठी नेमलेला मारेकरी शेजारी उभा आहे अशा अवस्थेत नायक आपले म्हणणे मांडण्यास सुरुवात करतो. संपूर्ण नाटकातील हा एक अतिशय सुरेख लिहिलेला उत्कंठावर्धक असा प्रवेश आहे. नायक आपली बाजू प्रभावीपणे मांडत असतानाच अथेन्सचा पराभूत झालेला व युद्धभूमीतून पळ काढून आलेला सेनापती प्रवेश करतो. सुंभ जळाला तरी पीळ जळत नाही अशा अवस्थेतील तो सेनापती पूर्वीप्रमाणेच बढाया मारायला लागतो, तेव्हा अथेन्सच्या नागरिकांना त्याचा उबग येतो; व ते नायकाची सुटका

करतात. ॲरिस्टोफेनीसने या नाटकात युद्धामुळे निर्माण होणाऱ्या अनेक प्रश्नांचा अतिशय प्रभावी रीतीने ऊहापोह केला आहे. ह्या नाटकात अनेक हृदयस्पर्शी व विलक्षण प्रभावी घटना आहेत. एका प्रवेशात एक शेतकरी आपल्या मुलींना डुकराप्रमाणे पेहराव देऊन बाजारात विकण्याचा प्रयत्न करताना दिसतो. "कसे काय चालले आहे", असे विचारले असता तो म्हणतो की, भुकेने त्रासून गेल्याने माझ्या कुटुंबातील व्यक्ती एकमेकींवर हल्ले चढवीत आहेत व गावातील अधिकारी व्यक्ती गावातील प्रजा अत्यंत निर्घृणपणे व लवकरात लवकर संपविण्याच्या मागे लागले आहेत.

द पीस ह्या ॲरिस्टोफेनीसच्या युद्धविषयक दुसऱ्या नाटकाचा नायक एक खेडुत आहे. सतत चालू असलेल्या वैरामुळे त्याला उबग आलेला आहे. हे युद्ध थांबविण्याबद्दल देवांना साकडे घालण्यासाटी तो फुलपाखराच्या पाठीवर बसून स्वर्गात जातो. परंतु हर्मेस नावाचा देवदूत त्याला स्वर्गात प्रवेश नाकारतो. तेव्हा तो हर्मेसला लाच देऊन आत प्रवेश मिळवतो. परंतु स्वर्गात आल्यावर त्याला असे आढळते की, "युद्ध" नामक दानवाने सर्व देवांना हाकून लावले असून, तो सर्व ग्रीक नगरराज्ये एका प्रचंड खलात घालून कुटून काढतो आहे. त्याला असेही आढळते की, ह्या दानवाने शांतिदेवतेलाही बंदिवान करून ठेवले आहे. शेवटी तो शांतिदेवतेची मुक्तता करतो व तिला पृथ्वीवर घेऊन येतो.

'लिसिस्ट्राटा' हे ॲरिस्टोफनसचे "युद्ध" विषयावरील तिसरे नाटक. हे नाटक नायिकाप्रधान असून नाटकाची नायिका अथेन्समधील एका न्यायाधिशाची बायको असून ती अतिशय अभिनव पद्धतीने अथेन्स व स्पार्टामध्ये शांतताकरार घडवून आणते. युद्धाला कंटाळलेली लिसिस्ट्राटा अथेन्समधील बायकांना एकत्र बोलावून त्यांना सांगते की, जोवर तुमचे नवरे युद्धबंदी घडवून आणण्यास होकार देत नाहीत, तोवर त्यांना शय्यासुख देऊ नका. स्पार्टामधील महिलांना देखील याच उपायाचा अवलंब करण्याचे ती आवाहन करते. शय्यासुखापासून पुरुषांना वंचित ठेवण्याच्या अभिनव उपायाचा परिणामकारक प्रयोग अथेन्स व स्पार्टामधील महिला निर्धाराने करतात. थोड्याच काळात दोन्हीकडे युद्धबंदीला अनुकूल वातावरणनिर्मिती होते. ह्या बोलण्यांसाठी दोन्ही संघराज्यांचे प्रतिनिधी एकत्र जमले असता त्यांना लिसिस्ट्राटा व तिच्या सहकारी भरपूर मद्य पाजतात. मद्याच्या धुंदीत ही मंडळी शांतताकरारावर सह्या करून मोकळी होतात.

पश्चिमी प्रबोधनकाळातील पहिली उपहासिका म्हणून मॅकिआव्हेलीच्या "**मॅनड्रेक**" चा बरेच टीकाकार उल्लेख करीत असले तरीदेखील यूरोपमधील उपहासिकांच्या लिखाणाची खरी सुरुवात बेन जॉन्सनने केली असे मानणेच योग्य. उपरोध, व्याजनिंदा, विडंबन, कोटी, निर्दय कुचेष्टा इ. चे वापरावर उत्तम नियंत्रण असणाऱ्या बेन जॉन्सनने आपल्या **व्होल्पोन, द अल्केमिस्ट, बार्थोलोम्यू फेअर** इत्यादी नाटकांमध्ये तत्कालीन समाजात बोकाळलेल्या भ्रष्टाचार, दांभिकता, हाव इ. दुष्ट प्रवृत्तींवर प्रखर हल्ला चढविला आहे.

यानंतर मात्र रशियन नाटककार गोगोल याच्या '**द गव्हर्नमेंट इन्स्पेक्टर**' पर्यंत नामोल्लेख करण्यालायक एकही उपहासिका आढळत नाही. कदाचित फ्रेंच नाटककार मोल्येर अथवा रेस्टोरेशन कालखंडातील इंग्रज नाटककार विल्यम विचर्ली, काँग्रीव्ह अथवा शेरिडन ह्यांचा मी उल्लेख केला नाही याचे काहींना आश्चर्य वाटेल. मोल्येर हा सुखात्मिकाकारांतील एक्का असला तरीही त्याने उपहासिका लिहिलेल्या नाहीत. त्याच्या *Tartuffe* ह्या नाटकाचाच फक्त ह्याला अपवाद म्हणून उल्लेख करता येईल. परंतु ह्या नाटकात मोल्येर धार्मिक दांभिकतेवर हल्ला करतो आहे की, धर्म या संस्थेचीच रेवडी उडवितो आहे, यावर समीक्षकांचे एकमत नाही. म्हणून ह्या नाटकाला उपहासिका म्हणावे की नाही, असा प्रश्न पडतो. तर विचर्ली काँग्रीव्ह, शेरिडन यांची सुखनाट्ये 'कॉमेडी ऑफ मॅनर्स' ह्या प्रकारात बसणारी आहेत. **द गव्हर्नमेंट इन्स्पेक्टर** ह्या गोगोलच्या नाटकाचा नायक म्हणजे एक लहानसा सनदी नोकर आहे. जवळ पैसे नाहीत अशा अवस्थेत तो एका तालुक्याच्या ठिकाणी अडकून पडतो. सरकारी इन्स्पेक्टरच्या लौकरच होणार असलेल्या

भटीच्या वृत्ताने भेदरलेले स्थानिक अधिकारी ह्या नागरी नोकरालाच सरकारी इन्स्पेक्टर समजतात व त्याने आपल्या भ्रष्ट कारभाराकडे दुर्लक्ष करावे म्हणून त्याला मोठ्या प्रमाणात लाच देतात. त्याला परिस्थितीचा अंदाज येतो व तो तिचा मोठ्या प्रमाणावर फायदा घेतो– इतका की त्याची मजल स्थानिक अधिकाऱ्यांपासून जमीनजुमला प्राप्त करून घेण्यापासून ते मेयरच्या बायकोमुलीबरोबर लफडी करण्यापर्यंत जाते. ह्या आपल्या यशाने भारावून जाऊन आपल्या ह्या पराक्रमांचे रसभरित वर्णन करणारे, एक पत्र तो त्याच्या मित्राला लिहितो. गावचा पोस्टमास्तर त्याचे हे पत्र चोरून वाचतो व बिंग फुटते. शेवटी खरा इन्स्पेक्टर येण्यापूर्वी पळून जाण्यात तो कसाबसा यशस्वी होतो. अतिशय साध्या पण प्रभावी, मार्मिक घटनांच्या साहाय्याने गोगोलने सर्व प्रकारचा भ्रष्टाचार, हाव, भीती, दांभिकता इत्यादींवर व ह्या गोष्टी अपरिहार्य करून ठेवणाऱ्या राज्यपद्धतीवर टीकेचे आसूडप्रहार केले आहेत.

जॉर्ज बर्नार्ड शॉ हा तर जातिवंत उपहासक ! कोटी उपरोध, व्याजनिंदा, मस्करी इत्यादींच्या वापरांवर बेन जॉन्सन इतकाच– कांकणभर अधिकच पण कमी नाही– अधिकार असणाऱ्या व कल्पनांचा अमर्याद साठा असलेल्या शॉने तत्कालीन समाजाला भेडसावीत असणाऱ्या प्रश्नांचा ऊहापोह आपल्या नाटकांमध्ये केला आहे. उपहासाचा त्याचा वापर अतिशय कलात्मक आहे. ह्याचा पुरावा म्हणून त्याच्या व्यक्तिरेखांकडे बोट दाखविता येईल– त्याच्या बहुतेक व्यक्तिरेखा इतर उपहासकांच्या व्यक्तिरेखांप्रमाणे निव्वळ रेखाचित्रे नाहीत.

'आर्म्स अँड द मॅन' ह्या नाटकात शॉने "युद्ध" व "लग्न" ह्या दोन गोष्टींभोवती असलेल्या गुलाबी, भ्रामक कल्पनांचे आवरण फाडून काढण्याचा प्रयत्न केला आहे. काहीसे कटू व गंभीर संदेश विनोदाच्या साखरी पुटाच्या साहाय्याने सहजतेने लोकांच्या गळी उतरविण्याच्या आपल्या खास मार्गाने "युद्ध" व "लग्न" ह्यांना लपेटून टाकणाऱ्या भ्रामक परिकल्पनांवर शॉ ह्या नाटकात तुटून पडला आहे. नाटकाच्या प्रारंभी ह्या नाटकाची स्वरूपसुंदर नायिका रेना पेटकॉफ हिची अशी ठाम समजूत असते की, युद्धे ही शूरवीरांना आपले शौर्य जगाला दाखवून देण्याची संधी प्राप्त करून देतात; लोक युद्ध करतात कारण ते शूर नरवीर असतात. तसेच त्यांच्यांतील जो सर्वांत मोठे धोके पतकरून अंतिम विजयश्री प्राप्त करतो, तो खरा पुरुषश्रेष्ठ असतो ! शिवाय आदर्श विवाह म्हणजे स्वरूपसुंदर रूपगर्विता नायिका व देखणा, पुरुषी नायक यांचे मिलन होय ! उपहासाने ओतप्रोत भरलेल्या पण खळाळून हसायला लावणाऱ्या अनेक प्रसंगांतून गेल्यावर रेनाला आपल्या कल्पना किती भ्रामक व वेडेपणाच्या होत्या हे पुरेपूर कळून चुकते. 'मेजर बार्बारा' हे शॉचे आणखी एक प्रभावी नाटक. "साल्व्हेशन आर्मी मूव्हमेंट" ची नीटशी माहिती नसल्याने आपल्याकडील वाचकांना ते काहीसे कठीण वाटते. परंतु साल्व्हेशन आर्मी म्हणजे गरिबांना मदत करणारी एक धर्मादाय संस्था आहे असे लक्षात घेऊन हे नाटक वाचले तर ते कठीण वाटण्याचे काहीच कारण नाही. साल्व्हेशन आर्मी किंवा इतर कोणत्याही धर्मादाय संस्थांनी थोडेफार पैसे वाटून गरिबांचे भले होणे शक्य नाही. समाजातील सर्व दुष्ट प्रवृत्तींचे मूळ दारिद्र्य हे आहे व त्यावर हल्ला चढवायला हवा. चारदोन फांद्या तोडून वा पाने खुडून कोणतीही गोष्ट साध्य होणे नाही हे शॉने अतिशय प्रभावीपणे मांडले आहे.

लंडनमधील झोपडपट्ट्यांच्या प्रश्नावर आधारित 'विडोअर्स हाउसिस', वेश्याव्यवसायाच्या प्रश्नावरील मिसेस वॉरन्स प्रोफेशन, धार्मिक असहिष्णुतेवरील द डेव्हिल्स डिसायपल, आयरिश राजकारणावरील जॉन बुल्स आदर आयलंड अशा अनेक उपहासिका शॉने लिहिल्या आहेत.

द मॅन ऑफ डेस्टिनी व द ब्लॅक लेडी ऑफ द सॉनेट्स ह्या दोन अनुक्रमे नेपोलियन व शेक्सपिअर यांच्यावर लिहिलेल्या दीर्घ एकांकी व्यक्तिकेंद्रित उपहासिका आहेत अशी गैरसमजूत होण्याची शक्यता आहे. पण तशा त्या नाहीत. जगात असा कोणताही समाज नाही की, ज्यात आपल्या आदरणीय, महान व्यक्तींचे (राष्ट्रपुरुष)

उदात्तीकरण करण्याची प्रवृत्ती दिसून येत नाही. काही व्यक्तींच्या बाबतीत तर तिचा इतका अतिरेक होतो की, अशा व्यक्तींमध्ये कोणतेही दोष नव्हतेच व त्या केवळ देवतुल्य, निदान अतिमानवी (सुपर ह्युमन) तरी, होत्या असे भासविण्याचा प्रयत्न होतो. सर्व व्यक्ती स्खलनशील असतात. एखादी व्यक्ती अशी नव्हती हे पटविण्याचा प्रयत्न करणे वा ह्यावर विश्वास ठेवणे म्हणजे आत्मवंचना करणे होय. हे केवळ वाईटच नव्हे तर घातकही आहे. ह्या घातक प्रवृत्तीवर टीकेची तोफ डागण्यासाठी शॉने '**द मॅन ऑफ डेस्टिनी**' व '**द ब्लॅक लेडी ऑफ द सॉनेट्स**' ही नाटके लिहिली आहेत असे मला ठामपणे वाटते.

उदात्तीकरणाची घातक प्रवृत्ती आपल्या समाजातदेखील मोठ्या प्रमाणात आहे. परंतु तिच्यावर कोरडे ओढण्याचे धाडस आपल्याकडील लेखकांना झालेले नाही. ह्याला कारण आपल्या समाजाची असहिष्णुता हेच होय. नाही म्हणायला विजय तेंडूलकर यांनी **घाशीराम कोतवाल** ह्या नाटकात नाना फडणविसांच्या जाणून बुजून व प्रयत्नपूर्वक लपविल्या जाणाऱ्या स्त्रीलंपटतेवर प्रकाश टाकण्याचा म्हणजेच पर्यायाने उदात्तीकरण केल्या गेलेल्या व्यक्तीचे मानत्व सिद्ध करण्याचा व कळत न कळत, एक दुर्बल प्रयत्न केला आहे. परंतु नाना फडणवीस ह्या तशा कमी महत्त्वाच्या व्यक्तिमत्त्वावरील नाटकदेखील लोकांच्या पचनी पडण्यात फार त्रास झाला; तर शिवाजी, टिळक वा गांधीजी यांच्यासारख्यांवरील नाटकांची व ती लिहिणाऱ्या नाटककारांची काय अवस्था होईल याची केवळ कल्पनाच केलेली बरी!

माधवराव जोशी यांनी लिहिलेले **संगीत स्थानिक स्वराज्य अथवा म्युनिसिपालिटी** ही मराठीतील खरीखुरी पहिली उपहासिका. उपहासकाच्या भात्यात असायला हवीत ती सर्व अस्त्रे जोशांकडे असल्याने व त्यांचा त्यांनी **संगीत म्युनिसिपालटीत** उत्कृष्ट उपयोग करून घेतल्याने हे नाटक विलक्षण यशस्वी ठरले आहे. नाटकातील सूत्रधाराच्या भाषेत सांगायचे झाले तर या नाटकाचा "मुख्य प्लॉट म्युनसिपालटी स्वतःच आहे (व) त्यालाच अनुलक्षून सर्व प्रवेश आहेत ... सध्याच्या काळी आमच्यात राजरोस वावरणाऱ्या काही आपमतलबी, दांभिक, भोंदू लोकांनी घातलेला धिंगाणा चव्हाटचावर आणून त्यांचा चांगला खरपूस समाचार घ्यायचा, त्यांचा स्वार्थसाधू स्वैराचार जगाला दाखवायचा..." हे या नाटकाचे उद्दिष्ट आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांचे स्वरूप लोकांनी किती किळसवाणे करून टाकले आहे याचे अतिशय प्रभावी दर्शन जोशांनी घडविले आहे. या नाटकात आग विझवायला जाणारा मोडका, निरुपयोगी बंब आहे; बेकायदेशीररीत्या रोग्यांकडून पैसे घेणारा व त्यांच्याशी बेमुर्वतखोरपणे वागणारा सरकारी डॉक्टर आहे; बापजाद्यांनी बांधलेली गलिच्छ बळदें त्यात काडीचीही सुधारणा न करता भाड्याने देणारा घरमालक आहे; "तुझा पगार वाढवीन" अशी आश्वासने देऊन वा "आजवर अनेक बाया वाटेला लावल्या आहेत, तुझी काय मिजास!" अशा धमक्या देत झाडूवालीचा भोग मागणारा नगरपिता आहे; लोकांच्या अर्जांचे सातपुड्याएवढे ढीग आडवे पडलेले असतानाही कामे न करणारे चंगीभंगी नगरसेवक आहेत; "मला मत द्या व एक वर्ष फुकटात हजामत करून घ्या!", "माझ्या बाजूने मतदान करून एक ग्लास व्हिस्की फुकट पिऊन जा!", अशा तऱ्हेची लालूच दाखवून म्युनिसिपालटीचे मेंबर होऊ पाहणारे अफलातून उमेदवार आहेत; भ्रष्टाचार, लाचलुचपत, खोटेपणा, दांभिकता, बाईबाटली आणि असे इतर अनेक प्रकार करणारे राजकारणी समाजधुरीण (?) या नाटकात आपल्याला भेटतात. **संगीत म्युनिसिपालिटी** या नाटकातील गाणी देखील उपहासाने ओथंबलेली आहेत. त्यांतही विशेष उल्लेखनीय म्हणजे "अहो! शिंग फुंकीत गेला पाण्याचा इंग्रजी बंब", "अरे मालक कसला हरामी गमला निर्दय मारेकरी, मारी घरात भाडेकरी", "निवडक पुंड आम्ही कमिटीचे गावगुंड" ही होत. जोश्यांच्या नाटकात विनोद आहे, अगदी भरपूर आहे; परंतु ग्राम्यपणा अश्लीलपणा, बीभत्सपणा हे त्याचे स्थायीभाव आहेत... नाटकातील उपहास जळजळीत असावा यासाठी तो ग्राम्य असायलाच हवा असे नाही. हे अवधान जोश्यांनी ठेवले नाही. सभ्यतेची मर्यादा न सोडता तीव्र उपरोध साधण्याची ताकद त्यांच्या लेखणीत नव्हती" अशी टीका प्रा. ना. सी. फडके

यांनी आचार्य अत्रे यांच्या **साष्टांग नमस्कार** या नाटकावरील परीक्षणात केली आहे. परंतु ही टीका त्यांच्या उपहासिकांच्या बाबतीतील अज्ञानातून उद्भवलेली आहे, यात शंका नाही. ॲरिस्टोफेनीस-पासून आजपर्यंत कोणत्याही महान उपहासकाच्या कलाकृती पाहिल्या तर त्यात ग्राम्यता, अश्लीलता इ. गोष्टी आढळतातच. कारण त्याला आजूबाजूच्या दोषदुर्गुणांची, भोंगळपणाची, भ्रष्टाचाराची जणू सवय होऊन निष्क्रिय झालेल्या समाजाला धक्के देऊन जागे करायचे असते, कार्यप्रवण करायचे असते व त्यामुळेच ग्राम्य, अश्लील भाषा तसेच बीभत्स प्रसंग यांचा त्याला अपरिहार्यपणे वापर करावा लागतो.

उपहासिकांची परंपरा चालविणारे मराठीतील दुसरे लेखक म्हणजे आचार्य अत्रे होत. यांनी **साष्टांग नमस्कार** ही उपहासिका लिहून आपल्या नाट्यजीवनाला प्रारंभ केला. ह्या नाटकातील नमस्कारांचे आत्यंतिक वेड असलेले रा. ब. शेषाद्री, ग्रहांची अनुकूलता असल्याखेरीज कोणतीही गोष्ट न करणारा त्यांचा ज्योतिषवेडा मुलगा सिद्धेश्वर, आपल्या प्रेयसीचा धाकटा भाऊ झाडावरून पडून जखमी होऊन विव्हळत असताना त्याच्या मदतीला धावून न जाता त्या प्रसंगावर कविता करीत बसणारा कवी भद्रायु, अशा छांदिष्ट व्यक्तिरेखा अतिशय यशस्वी ठरल्या आहेत. छांदिष्टपणामुळे आपण कसे हास्यास्पद ठरतो हे प्रभावी रीत्या दाखवून देणारी ही एक खेळकर उपहासिका आहे.

राजकारणावरील **वंदे भारतम्** व **मी उभा आहे** ह्या अत्र्यांच्या दोन उपहासिका माधवराव जोश्यांच्या **संगीत म्युनिसिपालटीच्या** जवळपास देखील येऊ शकत नाहीत. या नाटकांतील उपहासाची धार अत्र्यांच्या भाबड्या आशावादामुळे बोथट झाली आहे. आपला भाबडा आशावाद दूर ठेऊन अत्रे यांनी जर ही नाटके लिहिली असती, तर ती अधिक परिणामकारक घठली असती. **वंदे भारतम्** ह्या अत्र्यांच्या, कदाचित सर्वांत दर्जाहीन, नाटकाचा विषय अस्पृश्यता, जातिकलह हा आहे. ह्या नाटकात केवळ पैसे मिळविण्यासाठी धर्मांतर करणारे; संधिसाधू राज्यकर्ते, तसेच अधिकाराचा दुरुपयोग करणारे त्यांचे लाचखाऊ सहकारी; जातीचे राजकारण खेळणारे राजकीय पक्ष इ. तत्कालीन समाजातील निंद्य गोष्टींची निर्भर्त्सना आहे. स्थानिक स्वराज्यसंस्थेतील निवडणुका या विषयावरील **मी उभा आहे** हे नाटक **वंदे भारतम्** पेक्षा खूप चांगले असले, तरीही **संगीत म्युनिसिपालटी** च्या तुलनेत ते कुठेच पोहचू शकत नाही. आपल्या पक्षाने तिकीट नाकारले तर, दुसऱ्या पक्षात शिरून निवडणूक लढविणे; पैशाचा मलिदा चारून मते विकत घेण्याचा प्रयत्न करणे; आपल्या फायद्याचे असेल तर जातीचे राजकारण खेळणे; विरोधी उमेदवारांविषयी खोटीनाटी वृत्ते वर्तमानपत्रांतून छापवून आणणे; हे व निवडणुकींमध्ये चालणाऱ्या इतर अनेक निंद्य गैरप्रकारांचा अत्रे यांनी या नाटकात खरपूस समाचार घेतला आहे. नाटकातील संवादही ओघवते व रंजक आहेत. या नाटकातील भाईमंडळींवरील टीका तर फारच प्रखर व जहाल आहे. निवडणूक लढवून येनकेनप्रकारेण म्युनसिपालटीत शिरू इच्छिणाऱ्या गोवर्धनच्या घरी आपली काही पोळी पिकते आहे हे पाहण्याच्या मिषाने भाई टोळ तेथे पोहोचतो. त्याला गोवर्धन एक कप चहा देऊ करतो. तशी हा भाई एक पिवळा हत्ती देखील घेऊन या असे फर्मावतो–

गोवर्धन– घ्या... संपसम्राट, हा चहा घ्या आधी...

भाई टोळ– संपाचं नाव काढलं, की अंगावर रोमांच उभे राहतात. तो पहा गिरणीचा भोंगा वाजला... हजारो मजूर गिरणीच्या दारापाशी जमले आहेत... एकही कामगार आत जायला तयार नाही... तो पहा लाल बावटा, ती हातोडी आणि कोयता... तो इन्किलाब झिंदाबाद... त्या उघड्या मैदानातील प्रचंड सभा... तो लाठीमार... तो गोळीबार... चार मजुर मेले, शंभर जखमी झाले... ते मेलेल्या मजुरांचे प्रचंड स्मारक ...

गोवर्धन– बस करा हे संपपुराण... का बांघू तुमचे स्मारक इथल्या इथं ?

भाई टोळ– अच्छा... घेतो चहा... ते फराळाचं काय आणलं आहेत ?

गोवर्धन– दिवाळीचं आहे... आज भाऊबीज ! माहीत आहे ना ? काय ते ताई... तुम्ही यांना सांगितलं नाही वाटतं ?

भाई टोळ– ह्या आमच्या तसल्या म्हणजे ओवाळणीवाल्या ताई नाहीत हं ! गैरसमज करून घेऊ नको. आम्ही जसे अखंड भाई... तशा या अखंड ताई आहेत ! दसरा आणि दिवाळी हे भांडवलवाल्यांचे नि मध्ययुगीन सरंजामदारांचे सण आहेत. ते आम्ही पाळत नसतो.

गोवर्धन– नका पाळू सण, पण हे तर खाता ना ? (बलदेव वगैरे मंडळींना) हे घेत नाही ?

बलदेव– घरीं पोरंबाळं उपाशी टाकून आम्ही आलो आहोत, ते काही आपल्या फराळावर ताव मारण्यासाठी नाही...

भाई टोळ– हे... हे चूक आहे. या भांडवलवाल्या श्रीमंतांच्या घरी जेवढं काही मिळेल तेवढं फस्त करून त्यांना आपण लुबाडलं पाहिजे. हा चहा... हा काय श्रीमंताचा आहे ? गरिबांच्या कष्टानंच तयार झाला आहे हा...

कुणीही कधी उडवली नसेल अशी भाईगिरीची खिल्ली अत्र्यांनी या नाटकात उडविली आहे.

ताई टोळ– आता पुरे करा तुमचा हा उडाणटप्पूपणा ! जेवढं मिळालं तेवढं पुरे झालं... आता सोडून द्या हे सगळे धंदे. खटारेवाले, टांगेवाले, सलूनवाले यांचे संघ काय काढता? अन् संप काय करता न् ती शनिवारवाड्यापुढची व्याख्यानं काय किंचाळता ! वीट आला मला तुमच्या ह्या भाईगिरीचा. तुमच्या बरोबर माझ्या आयुष्याची मात्र परवड झाली आहे.

भाई टोळ– तर... भाईगिरी सोडून द्या म्हणे ! तुला काय अक्कल आहे का ? भाईगिरी ही पूर्वीच्या दादागिरीची आधुनिक आवृत्ती आहे, समजलीस ? बेफाट बोलायचं– अफाट ओरडायचं नि मोकाट फिरायचं म्हणजे भाईगिरी ! ही सोडून देऊन करू काय मी ?

आचार्य अत्रे यांचे **तो मी नव्हेच** हे नाटक व्यक्तिकेंद्रित उपहासिका आहे असा समज होण्याची शक्यता आहे. परंतु हे खऱ्या व्यक्तीवर आधारित नाटक त्या व्यक्तीचा बुरखा न्यायालयात फाटल्यानंतर अत्र्यांनी लिहिलेले असल्याने त्याचे व्यक्तिकेंद्रित उपहासिकांमध्ये वर्गीकरण करणे योग्य होणार नाही. अशा व्यक्तीपासून समाजाने निदान यापुढे तरी सावध रहावे हा इशारा देण्यासाठी हे नाटक लिहिलेले आहे.

आचार्य अत्र्यांनंतर उपहासिकांची परंपरा चालू ठेवली आहे सतीश आळेकर यांनी. त्याचे **महानिर्वाण** हे नाटक याचे अप्रतिम उदाहरण आहे. स्वतंत्र प्रतिभा असलेल्या व सर्वतुच्छता, व्याजनिंदा, विडंबन, निर्घृण व्याघात इ. उपहासकाच्या साधनांचा जोरदारइतक्याच समर्थपणे वापर करणाऱ्या आळेकरांनी आपल्या जुनाट व टाकाऊ झालेल्या अंत्यसंस्कारांवर **महानिर्वाण** ह्या नाटकात हल्ला चढविला आहे. धार्मिक रूढी हा मुळातच तसा नाजुक विषय. त्या कितीही भोंगळ, जुनाट व वेडगळ असल्या तरी "इतर काय म्हणतील ? आपण समाजबहिष्कृत ठरू की काय ?" अशा भीतिपोटी शंभरातील नव्वद लोक त्या निमूटपणे पार पाडत असतात. तरीदेखील अशा धार्मिक रूढींपैकी अंत्यसंस्काराच्या रूढीवर सतीश आळेकर यांनी **महानिर्वाण** मध्ये जहाल हल्ला चढविला आहे, तो अंत्यविधीच्या नावाखाली मृतदेहावर केल्या जाणाऱ्या अपरिमित क्रूर अत्याचाराचा उबग आल्यामुळेच. नाटकाची सुरुवात होते ती नाटकाचे नायक भाऊराव यांच्या निधनाने. थोड्याच कालावधीत सर्व चाळीत ही बातमी पसरते व चाळकरी भाऊरावांवरील अंत्यसंस्कारांची तयारी करण्यास एकत्र जमतात. एखाद्या व्यक्तीच्या अंत्यसंस्कारासाठी जमलेल्या लोकांमध्ये त्या व्यक्तीविषयी आदर असणारे अथवा तिच्या निधनाने खरे दुःखी झालेले फारच थोडे असतात. अनेक अंत्ययात्रांमधून हास्यविनोद करीत चाललेले लोक आपण नेहमीच पाहतो ! भाऊरावांवर अंत्यसंस्कार करण्यासाठी जमलेले चाळकरी एखाद्या पिकनिकची तयारी करावी अशा थाटात अंत्यसंस्कारासाठी लागणाऱ्या सामानाची जमवाजमव करतात. तीव्र उपहासाने ओतप्रोत भरलेल्या संवादांच्या साहाय्याने सतीश आळेकरांनी या गोष्टीची निर्भर्त्सना केली आहे–

चाळकरी– प्रसंग असा आहे की घाबरून जाणे होते एखादे वेळी, पण शांतपणे सर्व कार्य पार पाडायचे ("कार्य" हा शब्द उच्चारला की आपल्याला मंगल कार्याचीच आठ-

वण होते. अंत्यविधीच्या संदर्भात " कार्य " या शब्दाचा वापर करून आळेकर प्रेक्षकांना धक्का देतात.) वहिनींनी पैसे दिले आहेतच. (म्हणजे वहिनींकडून ते घेतले आहेतच ! अशा प्रसंगी देखील चाळकरी व्यवहार विसरलेले नाहीत, पदरमोड करण्याचा विचारही त्यांच्या मनात येत नाही !) तू सामान आणायला जा. बरोबर माझ्या खोलीतून यादी घेऊन जा. यादीबरहुकूम सामान आणायचे. (वाणसामानाच्या यादीबद्दल बोलावे तितक्याच सहजतेने केलेला ' ह्या ' यादीचा उल्लेख प्रेक्षकांच्या संवेदनांवर आघात करतो.) दुकान चोवीस तास उघडे असते. सामान नीट बांधून आण. त्यात सुद्धा फसवितात हल्ली. (भ्रष्टाचाराच्या तावडीतून काहीही सुटू शकत नाही ह्या सत्य परिस्थितीवरील आळेकरांचा हा टोला मन विषण्ण करतो.) एक लक्षात ठेवायचं, सामान टांग्यातून आणायचं, रिक्षातून नाही. कारण रिक्षात बांबू नीट बसत नाहीत. मागे चौगुल्यांची म्हातारी मेली तेव्हा त्यांच्या पुतण्याने बांबू ऐटीत रिक्षातून आणायचा प्रयत्न केला. त्यात बांबू आडवे धरलेन, रिक्षातून आणेपर्यंत पार दांडू झाले त्याचे. तेव्हा, टांगाच करा. (इतक्या थंडपणे केलेला हा विनोद प्रेक्षकांना धक्का देतो.) माठ घेताना मात्र बघून घे. कच्चा भाजलेला किंवा बारीक भोक असलेला चालेल. कारण तो लवकर फुटतो. शिवाय स्वस्त पण मस्त. मागे आपला दत्तू गेला माठ आणायला. एक नंबरचा व्रात्य. त्याने सिमेंटचे पाणी मारलेला माठ आणला विकत. त्याचीच आजी मेलेली. दत्तुचे नि बापाचे कधी पटले नाही. स्मशानात दत्तूचा बाप घालतोय चकरा चितेभोवती. पण माठ कशाला फुटतोय. शेवटी रखवालदाराकडून बत्ता आणून फोडला माठ. (हा अजून एक निर्घृण प्रहार.)

अशा अनेक एकामागून एक केलेल्या प्रहारांनी आळेकर आपला मुद्दा अतिशय प्रभावीपणे मांडण्यात यशस्वी झाले आहेत. मृतदेहाला तिरडीवर करकचून बांधणे, त्याच्या मुखात गंगोदक घालणे यावरही आळेकरांनी केलेले प्रहार भावना हेलकावून सोडतात–

भाऊराव– काय करणार मी ? देहांत झाला रे झाला, की गंगोदक मुखात घालणार. बरं, घालताना तरी नीट काळजी घ्यावी. मेलेला देह म्हणजे झोपलेले मूल. थेंबाथेंबाने गंगोदक सोडायचे. पण कोण सांगणार ? ... त्यातून गंगोदक इतके जुने की सुगंधित झालेले ... असो, प्रथेपुढे आपण काय करणार ? ... ताटी बांधलेली आहे. नव्हे, नव्हे चांगली करकचून आवळलेली आहे एक वेढा जबड्यातून गेल्यामुळे माझी जीभ कापली आहे. ...

हंसत खेळत गाणी म्हणत सर्व चाळकरी ताटी बांधून सज्ज होतात. पण प्रेताला अग्नी देण्याचा अधिकार असलेला भाऊरावांचा मुलगा नाना हा परगावी सामने खेळायला गेलेला असतो. तेव्हा तो येईपर्यंत थांबणे क्रमप्राप्त असते. एकमेकांची उणीदुणी काढत चाळकरी वेळ काढत बसतात. हा प्रसंग आळेकरांनी अप्रतिम लिहिला आहे–

चाळकरी १– काय कळलं का नाही ?

चाळकरी २– नानाचं ना ?

चाळकरी ३– हं.

चाळकरी ४– नाही, अजून नाही. आटयापाट्याचे सामने नक्की कोणत्या गावी आयोजित केले आहेत ह्यावर अजून एकमत होत नाहीये. नानाच्या आईला पण नक्की माहीत नाही.

चाळकरी ३– मला वाटतं गाणगापूरला असतील.

चाळकरी ४– नाही हो, गेल्याच वर्षी नाही का झाले सामने गाणगापूरला ? मला वाटतं सोलापूरला असतील.

चाळकरी ५– बघा, बघा, तुम्ही तिकडचेच म्हणजे सामने काय सोलापूरलाच होतात ? अवघा महाराष्ट्र उघडा पडलाय की ! सारखं आपलं सोलापूर, सोलापूर चाललंय.

चाळकरी ४– हे बघा, चेष्टा करू नका. पण बालपण घालवलंय मी सोलापूरात. तुम्हाला काय आस्था वाटणार ? तुम्ही फक्त सोलापुरी चादरी पांघरणार.

अनुक्रमणिका

चाळकरी ५– मुळीच नाही. दोनदा आणल्या आणि घस लागून गेल्या. जसं पेरावं तसं उगवतं.

चाळकरी १– मला वाटतं आपण भाऊरावांच्या अंत्ययात्रेसाठी जमलो आहोत.

चाळकरी ४– हो. पण प्रत्येक वेळी चेष्टा कोण ऐकून घेईल ? निदान आज तरी नको. भाऊरावांना काय वाटेल ? ते गेले तेव्हा त्यांनीसुद्धा सोलापुरी चादर पांघरली होती.

चाळकरी १– मग ती तुम्ही घरी आठवण म्हणून का नेणार आहात ?

चाळकरी ५– न्या, न्या अगदी प्रेताच्या टाळूवरचे लोणी खा.

चाळकरी ६– (प्रवेश करीत) फार महाग झालंय हो अलीकडे.

चाळकरी ५– काय महाग झालंय ?

चाळकरी ६– लोणी. चांगलं मिळतच नाही हल्ली.

चाळकरी ५– नाही, मी टाळूवरचं लोणी असं म्हणतोय. तुम्ही अगदी नुकतीच टाळू भरल्यासारखं करताय.

चाळकरी ६– हे बघा, माझी टाळू काढायचं काम नाही.

चाळकरी ४– बघा ना, मघाशी यांनी माझं सोलापूर काढलं. आता तुमची टाळू काढताहेत.

चाळकरी ५– अहो, टाळू काढत नाहीत ! ती भरतात.

अशा तऱ्हेने एकमेकांच्या कुचाळक्या करीत वेळ काढणारे, माठावरून, बांबूवरून विनोद करणारे चाळकरी पर्यायाने मृतदेहाची विटंबनाच करीत असतात. व हेही जणु थोडेच वाटले म्हणून ते नंतर चक्क भेंड्या लावायला सुरुवात करतात. शेवटी "नाना आला" असे एक चाळकरी म्हणताच सर्व नाचून, गाऊन आनंद व्यक्त करतात. मृत देहाची याहूनही भयंकर विटंबना ती कोणती ? **महानिर्वाण** मध्ये जाताजाता आळेकरांनी इतर अनेक गोष्टींची चर्चा केली आहे. ढासळत चाललेली कुटुंबव्यवस्था, बाप–मुलगा अथवा आई–मुलगा यांच्यातील लोप पावत असणारा संवाद त्यांच्यातील परस्परांबद्दल कमी होत चाललेली आस्था हा विषय दोन तीन प्रसंगांतून आळेकरांनी मांडला आहे. तसेच लहान मुलांना समजत नाही म्हणून काहीतरी खोटेनाटे सांगून त्यांची फसवणूक करून समजूत काढणे म्हणजेच मोठी झाल्यावर इतरांना त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन सहजपणे फसवावे कसे, ह्याचा संवेदनाक्षम बालवयात दिलेला जणू वस्तुपाठच ! हा प्रसंगदेखील परिणामकारक रीत्या रंगविला आहे–

भाऊराव– आमचा नाना ह्याहीपेक्षा बिलंदर. त्याने रामाचे आणि अश्वत्थाम्याचे उदाहरण डोळ्यापुढे ठेऊन हट्ट केला. कारण रमेने मोठ्या कौतुकाने त्याच्यावर संस्कार केलेले. तर एक दिवस...

नाना होतसे कष्टाळू ।
महाराष्ट्री पडे दुष्काळू ।।
त्यात नाना मागे जरदाळू ।
मती कुंठित जाहली ।।

अशी मती गुंग झालेली. नानाने भोकाड पसरलेले. जरदाळू पाहिजे म्हणतो आहे. राम, अश्वत्थामा आणि आमचा नाना असा त्रिकोण तयार झालेला. आख्खी चाळ धुंडाळली पण जरदाळू गवसेना. नानाचे भोकाड थांबेना. तो मी त्यास चिडून पुसिले जरदाळू, जरदाळू म्हणून रडतो आहेस, कधी बापजन्मात जरदाळू बघितला नव्हतास का ? तसे तो म्हणे नाही. रमेनेही दुजोरा दिला की जरदाळू अद्याप घरी आणलेला नाही. इतकेच नव्हे तर नानाने तो पाहिलेला पण नाही. मग काय मंडळी, महाभारत-रामायणाचे संस्कार आपल्यावर, बालमनाची फसवणूक करणे.

सुप्रभाती उठोन ।
तत्परी मंडईत जावोन ।।
आणिली ती जांभूळ ।
जरदाळू म्हणूनी ।।

अशी जांभळे नानाला आणून दिलेली आहेत. गुलाम खूष होऊन हसतो आहे.

"टिरनी ऑफ मोनॉगमी" ह्या आजच्या बहुचर्चित विषयाचाही पुसटसा उल्लेख **महानिर्वाण** मध्ये येऊन जातो–

भाऊराव– अरेरे, खरोखर काय दैवदुर्विलास आहे पहा. फक्त गैरसोय टळावी म्हणून जर बंडूनं अग्नी दिला असता तर कोण हा गहजब !

काय हे अकलेचे तारे! पण तसे मनातून वाटतेच की झाल्या रमा आणि बंडूची आई सवती सवती तर बिघडलं कुठे?... मग रमाच कधी बंडूची आई समजायची आणि गृहस्थाश्रमीचे प्रथम कर्तव्य पार पाडायचे...

भाऊरावांना ज्याप्रमाणे "रमा एके रमा व रमा दुणे रमा"चा कंटाळा आला आहे हे त्यांच्या वरील उद्‌गारांवरून कळते, त्याप्रमाणे रमेलाही "भाऊराव एके भाऊराव" ह्यात काहीतरी बदल व्हावा असे काही वाटत असलेलेच पाहिजे ह्याचा पुरावा म्हणजे डावीकडून तिसरा, सूट व काळा चष्मावाला!

महानिर्वाण ह्या नाटकात आळेकरांनी ग्राम्य भाषा, शिव्या, बीभत्स, किळस आणणारी वर्णने, अश्लीलता इत्यादींचा भरपूर वापर केला आहे. परंतु आपल्या सदसद्‌विवेकबुद्धीचा आवाज, आपली संवेदनशीलता तिथल्यातिथेच गोठवून टाकणारी रूढिप्रामाण्य वर्तणुकीची बर्फाची लादी वितळवून टाकण्यासाठी अश्लीलता बीभत्सता इ. सगळ्यांच्या धगीची आवश्यकता होतीच. **महानिर्वाण** ही निश्चितच मराठीतील सर्वोत्तम उपहासिका आहे.

सतीश आळेकरांचे **महानिर्वाण**, नंतर लिहिलेले **महापूर** तसेच अगदी अलीकडे लिहिलेले **शनिवार-रविवार** ही नाटके निव्वळ कलात्मकतेच्या दृष्टीकोनातून विचार केला असता कमी दर्जाची आहेत असेच म्हणावे लागते. परंतु तरीही उपहास हाच त्यांचा स्थायीस्वभाव आहे. या नाटकांमधील उपहासाची काही उदाहरणे आपण यापूर्वीच पाहिली आहेत.

मधुकर तोरडमल यांनी जॉर्ज ऑर्वेलच्या **ॲनिमल फार्म** ह्या औपहासिक कादंबरीवरून **क्रांती** ह्या नावाची उपहासिका लिहिली आहे. सर्वेसर्वांची एकतंत्री राजवट व कम्यूनिस्टांची राजवट यांच्यात गफलत केल्यामुळे तोरडमल यांचे **क्रांती** हे नाटक पूर्णपणे फसले आहे. कम्युनिस्ट राजवटीमध्ये "आपण सगळे सारखेच" असा घोष करीत करीत राज्यकर्ते लोकांचे गळे घोटीत असतात तर कोणताही सर्वेसर्वा अशा तऱ्हेचा दांभिकतेचा वापर करीत नाही याचे अवधान तोरडमल यांना राहिलेले नाही. त्यामुळे हे नाटक अपेक्षित परिणाम साधू शकत नाही.

आतापर्यंतच्या उल्लेखनीय उपहासिकांचा हा एक आढावा. या आढाव्यावरून एक गोष्ट सहज लक्षात येण्यासारखी आहे: औपहासिक लिखाण करता येण्यासारखे अनेक विषय आपल्याकडे उपलब्ध असूनदेखील व्हावे तितके ते झालेले नाही. याला अर्थातच आपल्या समाजाची असहिष्णुता हे एकमेव कारण आहे. उपहासकाला खरेखुरे स्वातंत्र्य प्राप्त झाल्याखेरीज या परिस्थितीत बदल होणार नाही.

संदर्भ ग्रंथ

1. *Satire* : Matthew Hodgart
2. *The power of Satire* : R. C. Elliot
3. *The Rise of Attic Comedy* : F. M. Conford
4. *Ancient Greek Literature* : Krishna Chaitanya
5. *Satire* : Arthur Pollard

ग्रंथ-परीक्षण

गझल (कविता) – मंगेश पाडगावकर; मौज प्रकाशन गृह, खटाववाडी, मुंबई–४; १९८२; किंमत रु. १७.५०.

'गझल' : नवा विद्रोह

गझल हा मूळचा भारतीय काव्यप्रकार नसला, तरी तो पाश्चात्त्यही नाही या मर्यादित अर्थानेच तो भारतीय कवितेस जवळचा आहे. मूळचा फारसी असलेला हा काव्यप्रकार मोंगल सम्राटांच्या आगमनानंतर भारतात प्रवेश करतो. काही वर्षे राजदरबारीच रमतो. फारसीतून उर्दूत प्रवेश करून भारतीय साहित्यात रुजतो.

मराठीमध्ये हा काव्यप्रकार येण्यासाठी पुन्हा चार-पाच शतकांचा काळ जावा लागतो. एवढा दीर्घकाळ गेला, तरी तो उर्दूतून मराठीत आलेला नसतो; तर फारसीतून मराठीत येतो. महाराष्ट्रातील शैक्षणिक विकास हे त्याचे कारण असते.

कवी माधव ज्यूलियन हे फारसी भाषेचे अभ्यासक होते. त्याच भाषेचे ते प्राध्यापक होते. त्यामुळे फारसी भाषेचा बराच प्रभाव असलेली मराठी गझल ते लिहितात. आजची पाडगावकर आणि सुरेश भट यांची गझल ही पूर्ण मराठी गझल आहे.

गझलचा शाब्दिक अर्थ– स्त्रियांनी केलेल्या प्रणयगोष्टी असा आहे. साहजिकच या काव्यप्रकारात मुख्यत: प्रेमभावनेचे चित्रण येते. सूफी संतकवींनी मात्र ईश्वर आणि भक्त यांच्यातील प्रेमसंबंध, भक्ताची तळमळ चित्रित करण्यासाठी या काव्यप्रकाराचा वापर केला. फारसीतील गझल, प्रेम, मदिरा आणि गूढवाद इतक्यांपुरतीच होती. उर्दू कवींनी मात्र गझल अधिक व्यापक बनविली. त्यांनी देशप्रेमाबरोबरच वैचारिक विषयांवरही गझल लिहिली. विषयाची विविधता प्रथम मिर्झा गालिबने मोठ्या प्रमाणावर आणली. काळाचा विचार करता गालिबची ही बंडखोरीच होती. मानव, त्यांच्या निष्ठा, आंतरिक विचार, प्रेम, मानसिक प्रक्रिया आणि प्रत्येकाच्या दैनंदिन जीवनातील विविध अनुभव अशा अनेक विषयांवर गालिबने लिहिले. त्याने प्रतिकात्मक शब्दांचा वापर करण्यास सुरुवात केली.

या काव्यप्रकारात एकापाठोपाठ एक शेर येतात. कमीत कमी पाच व जास्तीत जास्त सतरा शेर एकत्र करून गझल तयार होते. हा प्रत्येक शेर सुटा वाचला तरी तो अर्थपूर्ण व परिणामकारक वाचावा अशी अपेक्षा असते. या काव्यप्रकारात यमकास महत्त्व असते. एकाक्षरी यमकापेक्षा अधिक अक्षरीचे यमक अधिक परिणामकारक ठरतात. मात्र प्रत्येक गझलमध्ये किती शेर असावेत, प्रत्येक ओळीत किती अक्षरे असावीत याची काटेकोर बंधने कोणतीच नसतात. गेयता व उत्कट भावना हेच गझलचे विशेष. याच दृष्टीने कविवर्य मंगेश पाडगावकर यांच्या 'गझल' कडे पहावयाचे.

पाडगावकरांच्या 'जिप्सी', 'सलाम' आणि 'गझल' कडे पाहिले की त्यांच्या एकूण काव्यविषयात किती बदल झाला आहे हे ध्यानात येते. विषयाच्या आणि आशयाच्या बाबतीत बदललेले पाडगावकर गझलरचना करतात, तेव्हा पूर्वीच्या पाडगावकरांशी त्यांनी काहीतरी नाते शिल्लक ठेवलेच आहे असे वाटते. पूर्वीपासूनच त्यांच्या कवितेत असलेली गेयता, सफाईदार रचना, आणि परिणामकारता ही त्याची कारणे असावीत. म्हणूनच 'गझल' वाचताना आशयाच्या बाबतीत बदललेली पण अभिव्यक्तीच्या बाबतीत बहुतांश पूर्वीचीच असलेली कविता पाडगावकर लिहीत आहेत असे वाटते.

'गझल' मधील पाडगावकरांच्या कविता वाचल्या, की मर्ढेकरांच्या अभंगरचनेची, ओवीबद्ध रचनेची आठवण होते. त्याची कारणे अशी, की मर्ढेकरांच्या या रचनेत आणि पाडगावकरांच्या उपहासगर्भ रचनेत काही बाबतींत साम्य आहे.

अनुक्रमणिका

१) मर्ढेकरांनी कवितेचा बाह्य आकार तोच ठेऊन त्यात नवा उद्वेगजनक आशय भरला.

२) दोन महायुद्धे, यंत्रयुग यांच्या परिणामातून मानवी मनात आलेली एकाकीपणाची, क्षुद्रतेची जाणीव, वास्तवातील दारिद्र्य, लाचारी, ढोंग, दंभ यांचे वर्णन त्यांनी अध्यात्मप्रसारासाठी वापरलेल्या ओवी-अभंग छंदातून व्यक्त करून एक परिणामकारक विसंगती साधली.

३) मर्ढेकरांची ही, जीवनातील विसंगतीचे उद्वेगजनक तरीही परिणामकारक चित्रण करणारी कविता बाजूच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक स्थित्यंतराचा परिपाक होती. म्हणूनच ती व्यक्तिगत राहिलेली नाही तर समाजमनाचाच उच्चार बनली आहे.

वरील मुद्दे पाडगावकरांच्या 'गझल' बाबत कांही अंशी (-म्हणजे संदर्भाचे) फेरफार करून आहेत तसेच स्वीकारता येतील. शिवाय मर्ढेकरांच्या निसर्गकवितांपेक्षा ही उपहासगर्भ कविताच अधिक लक्षात राहते. तसेच पाडगावकरांच्या गझलांच्या बाबतीतही होते.

नाजूक प्रेमभावनेच्या चित्रणासाठी वापरला जाणारा, मदिरेची धुंदी चढवणारा आणि कलावंताच्या कलंदर जगण्याची साक्ष असलेला गझल हा रचनाप्रकार (फॉर्म) पाडगावकरांनी, संधिसाधू राजकारणातून, गुंडगिरीच्या रक्षणासाठी चाललेल्या सत्तेच्या वापरातून, मृत झालेल्या संस्कृतीचे माहात्म्य गाणाऱ्या लांडग्यांच्या प्रवृत्तीतून आणि हे सर्व बघूनही अत्यंत चैतन्यहीन अवस्थेत असलेला समाज बघून येणारा संताप, चीड, एकाकीपणा व्यक्त करण्यासाठी वापरला आहे. ही व्यथा, एकाकीपण, संताप केवळ कवीचाच नसतो तर प्रत्येक डोळसाचा, पर्यायाने समाजाचाच असतो.

'गझल' वाचून झाल्यावर या कवितासंग्रहातील सामाजिक, राजकीय वास्तवाचे कवीने केलेले चित्रणच आपल्या अधिक लक्षात राहते. तसे पाहिले तर एकूण गझलांच्या संख्येत या प्रकारच्या गझला संख्येने कमी आहेत. तरीही असे का होते? कारणे दोन असू शकतात. एक म्हणजे या कविता अधिक उत्कट, परिणामकारक असाव्यात आणि दुसरे, ही चीड प्रत्येकालाच आपली वाटत असावी. पहिले कारण असंयुक्तिक आहे म्हणून या गझलांची उत्कटता नाकारून उपयोग नसतो तर या व इतर गझलांची उत्कटता मान्य करूनही याच प्रकारच्या कविता मनावर अधिक ठसतात याचा अर्थ समजावून घेणे आवश्यक असते.

'कोलाहलात साऱ्या माणूस शोधतो मी
गर्दीत माणसांच्या माणूस शोधतो मी'

हे- माणसाचे माणूसपण शोधूनही सापडत नसल्याचे दुःख कुणाचे नाही? तुमचे, माझे, सर्वांचेच आहे. तेच कवी बोलतो आहे. धर्ममंदिरांसारख्या पवित्र ठिकाणीही वासनांचे कल्लोळच पहावयास सापडतात. मग याला आग लावावी असे कुणाला वाटत नाही? तेच कवी बोलतो-

'या संस्कृतीस साऱ्या ही चूड लाविली मी
वणव्यात पेटलेल्या माणूस शोधतो मी'

आणि म्हणून ही समाजाची कविता बनते.

यशाच्या किल्लीने सर्व दारे खुली होताना कवी पाहतो; पण त्याचबरोबर इथले यश, इथली श्रीमंती, इथला डौल ही एक प्रकारची आत्मवंचनाच आहे हेही त्याच्या लक्षात येते.

'प्राशून ही कुबेरी प्रासाद झिंगलेले
या आत्मवंचनेच्या कुहरात हिंडलो मी'

राजकीय वास्तवाचे तर पाडगावकरांच्या इतके उपहासगर्भ व प्रभावी चित्र मराठी कवितेत आजवर क्वचितच आले आहे. हजारो वर्षांपासून चालत आलेल्या व वर्णव्यवस्थेतून निर्माण झालेल्या जातिव्यवस्थेविरुद्ध बंड करणारी दलित कविता ही विद्रोही कविता म्हणून मान्यता पावलीच आहे. तर सत्तेच्या वापरातून भांडवलदारी हितसंबंधांचे रक्षण करणाऱ्या व स्वतः उच्चवर्गीय होऊ पाहणाऱ्या शोषक राजकारण्यांविरुद्ध म्हणजेच निर्माण होऊ घातलेल्या वर्गव्यवस्थेविरुद्ध बंड पुकारणारा हा नवा विद्रोह आहे. सत्तेसाठी (भांडवलदार बनण्यासाठी) आदर्शाच्या गळ्याला नख लावून स्वतः किती लाचार होणारे लोक आहेत याचे ते चित्र रेखाटतात.

'सत्ता मिळेल तेथे हे लाळ घोटतील
हे झेलतील थुंकी खुर्चीमधे शिराया'

सत्तेसाठी वेडे झालेले हे लोक म्हणजे लांडगेच होत. लांडगे दोन अर्थाने- एक उंची घोषणा देऊन फसवणारे आणि दोन पशू. भर रस्त्यात पितामहांची

अब्रू स्वस्त दराने विकणाऱ्या या श्वापदांसमोर नेहमीच लाचार समर्थकांचे थवे असतात–

'जमले थव्यांथव्यांनी तांडे समर्थकांचे
लाचार गांडुळांची भक्ती भरात आली'

या फांदीवरून त्या फांदीवर उड्या मारणारी माकडे आणि सत्तेसाठी पक्ष बदलणारे लोक यांत कवीला फरकच दिसत नाही–

'धर्म यांचा मारणे सोईप्रमाणे या उड्या
याचसाठी लाभलेले पाय यांना फाकडे
काल ज्या झाडावरी ही आश्रयाला थांबली
आज ही शत्रूप्रमाणे पाहती त्यांच्याकडे'

स्वतःला संस्कृतीचे प्राते समजणारे हे लोकच मानवतेची होळी करीत असतात:

'हालवोनि शेपट्यांना घोषणा यांनी दिल्या
आणिली तुमच्या चितेस्तव शोधुनि ही लाकडे.'

अशा अवस्थेत नैतिकता कुठे राहते ?

'नेसणे गुंडाळिली डोईस थोरांनी
नागव्यांचे राज्य आता ठाकले येथे
द्रौपदी दुःशासनाला घालिते डोळा
नाव कृष्णाचे तिनेही टाकले येथे'

या सर्व कोलाहलात, चेहरे नसलेल्या जगात आपले नेमके कुणाशी नाते आहे हे कवीला कळेनासे होते.

'कोण मी यांचा अखेरी, आणि माझे काय
नाते ?
मी कशाचा येथ साक्षी ? मी म्हणू माझा
कुणाते ?'

अशी एकाकीपणाची तीव्र जाणीव कवीला होते. विफल प्रेमाच्या जाणिवेतूनही कधी हे एकाकीपण येते. परंतु अनेकदा ते या परिस्थितीतूनच जन्म घेते.

'काळीज हे जळाले तरीही पिऊन घेतो
हे एकलेपणाचे विष मी पिऊन घेतो'

या एकाकीपणात कुणाची साथ मिळावी म्हणून बाजूच्या अंधारदाटल्या जगात तो हाक घालतो तर–

'मी हाक घातली अन् माझेच शब्द आले'

असा प्रत्यय येतो.

सभासंमेलनातून टाळ्या मिळाल्या, कौतुक झाले तरीही अंतरीची वेदना तशीच असते.

'कौतुकाच्या झेलते टाळ्या कधी गर्दीमधे
आतला काळोख तेव्हा पापण्यांनी झाकते'

इतरांचे एक असो, पण जाणते कवी आणि लेखकही जेव्हा सत्तेपुढे लाळ घोटतात तेव्हा कवी चिडून जातो–

'येथ सत्तेच्या स्तुतीला बैल म्हातारे उभे
आवरेना लाळ ज्यांना, श्वास ज्यांचे धापले
कापलेली जीभ आहे खूण सत्याची इथे
चेहऱ्यावर आणि ज्यांच्या शेण आहे थापले'

आणखी व्यापक दृष्टीने पाहिले तर कवीला सर्व मानवी जीवनच स्वार्थामुळे निष्ठूर बनले आहे असे दिसते–

'रस्त्यावर उपाशी हे मूल माणसाचे
घाईत माणसे ही बघती, निघून जाती'

स्वातंत्र्य मिळून पस्तीस वर्षे झाली तरी समाजवादाच्या घोषणा देणारी लोकशाही उंच प्रासादांच्या रक्षणातच रमलेली दिसते. म्हणून स्वातंत्र्याचाच जाब मागावा असे कवीला वाटते. पण सर्व माणसे षंढ असल्यासारखी निमूट सहन करीत आहेत असे तो पाहतो. आणखी किती अन्याय झाला म्हणजे ही पेटून उठतील ? हा एक प्रश्नच आहे.

'चिडत का नाहीत इथली माणसे ?
कढत का नाहीत इथली माणसे ?
थंड प्रेतासारखी वस्ती दिसे
उठत का नाहीत इथली माणसे ?'

या शिवाय ज्या प्रियकरप्रेयसीचे नाते, विरहार्तता यांविषयीच्या कविता आहेत त्याही प्रत्ययकारी उतरल्या आहेत–

'डोळ्यावरुन माझ्या उतरून रात्र गेली
वचने मला दिलेली विसरून रात्र गेली' किंवा
'गीत हे गाशील तेव्हा मी जगी असणार नाही
प्रीत ही स्मरशील तेव्हा मी तुला दिसणार नाही'

यांतील 'दर्द' रसिकमनाचा ठाव घेत नाहीत असे कसे म्हणता येईल ? 'डोळ्यात सांजवेळी' सारखी विराणी तर केवळ पाडगावकरच लिहू शकतात. कधी अपुऱ्या प्रेमाची कहाणी गात असताना–

'गौरवाचे हार आता शोभती माझ्या गळां
आतली माझी व्यथा ही ना कुणी जाणी'

असे कवी म्हणतो. या प्रेमकवितांतून अनेकदा पूर्वीचेच पाडगावकर भेटतात.

' भेटसी रस्त्यात जेव्हा तू दुपारी
या उन्हाला चांदणे का मानतो मी ? '

हे उन्हाला चांदणे मानणारे पाडगावकर जुनेच आहेत. किंवा–

'कापऱ्या पाण्यात होडी सावळ्या तंद्रीत आहे
हात माझे लाजुनी हातात कोणी घेतलेले '

आणि

' गवतात झाकलेली विजनातली समाधी ' या कविता ' जिप्सी ' मधील कवितांचीच आठवण करून देतात.

गझल या गंभीर काव्यप्रकाराला पाडगावकरांनी ओजस्वी बनविले. कधी कधी तर गांभीर्य विसरून वात्रटिकेसारखे रूप दिले–

' जराशी पापणी लवता कुणी स्वामी ढिले झाले
तिने अन् ओढिता छाटी जवानी वाहुनी गेली'

हा किंवा

' माझा हिशोब नाही केला तिने पुरा
माझी तहान आता व्याजात भागली'

यांसारखे शेर केवळ शिळोप्याच्या मैफली गाजवण्याचेच आहेत.

आपण आयुष्यभर कविताच केली म्हणून व्यवहारी अर्थाने जीवनात अपयशी ठरल्याची आता कवीला जाणीव होऊ लागली आहे.

' शोधिले आयुष्यभर मी शब्द केवळ
शेवटी माझ्या गळ्याला दोर आहे
काय कवितांनी कुणाची भूक भागे ?
ते म्हणाले मी जिवाला घोर आहे. '

पण व्यवहारातील या अपयशामुळे कवी निराश नाही. उलट तो इतर कवींनाही व्यवहारापलीकडची श्रेष्ठ दर्जाची कविता लिहावी असा सल्ला देतो आहे.

' जगण्या भिऊन पळुनी शतदा मरू नका
थडग्यात कागदांच्या कविता पुरू नका
दगडाहुनी फुलांचे जगणे असो कमी
प्राणात गंध राहो, मरण्या डरू नका.

कविता कमी असली तरी सच्ची असावी अशी अपेक्षा तो व्यक्त करतो, त्यांनी व्यवहार विसरावा म्हणून–

' व्यवहार शाहण्यांनो, विसरा कधीतरी
या चांदण्यात छत्री धरुनी फिरू नका '

असे सांगतो.

पाडगावकरांचा हा विद्रोह केवळ संस्कृतिविरुद्ध नाही, तर भ्रष्ट राजकारणाविरुद्ध, गुलाम मनोवृत्तीच्या स्थितिशील समाजाविरुद्ध आणि श्रेष्ठ साहित्यिकांच्या लाळघोटेपणाविरुद्धही आहे आणि म्हणूनच हा नवा विद्रोह आहे.

– टी. आर. भोसले

वाचकांचा पत्रव्यवहार

संपादक,
" नवभारत " यांसी
स. न. वि. वि.

" नवभारत "च्या एप्रिल ८३ च्या अंकात प्रा. अ. के. भागवत यांनी श्री. शंकरराव खरात यांच्या "तराळ–अंतराळ" या आत्मचरित्राचे परीक्षण केले आहे (" एक प्रत्ययकारी आत्मकथा ").

(जागेवर रुजू होण्यासाठी आपण बसने जाऊ असे तो सांगतो, तेव्हा प्रा. दाभोलकर त्यांच्यासाठी खास मोटारीची व्यवस्था करतात !) असा निर्देश निवेदनाच्या ओघात एका कंसात प्रा. भागवत करतात. यातील शेवटच्या उद्गारचिन्हाने कदाचित काहींच्या मनात प्रश्नचिन्हे निर्माण होतील म्हणून हे पत्र. केवळ वस्तुस्थितीची नोंद म्हणून.

प्रश्न नियुक्त कुलगुरूने बसने प्रवास करावा की नाही अशा स्वरूपाचा नव्हता. मराठवाडा विद्यापीठाच्या तत्कालीन पार्श्वभूमीच्या संदर्भात श्री. शंकरराव खरात यांना प्रवासात कदाचित काही अडचणी निर्माण केल्या जातील अशी एक शंका होती. शासनाचे संरक्षण घेऊन त्यांनी हा प्रवास करणे तितकेसे उचित वाटत नव्हते. यासाठी वेगळा पर्याय काढला गेला.

स्वस्तिकचे श्री. बसंतराव वैद्य यांना मी अशी गाडीची व्यवस्था हवी आहे म्हणून टेलिफोनवर सांगितले. आणि त्यांनी एकही अधिक प्रश्न न विचारता लागलीच व्यवस्था करून दिली याचीही नोंद प्रकटपणे या ठिकाणी करणे मला अगत्याचे वाटते.

– देवदत्त दाभोलकर

अनुक्रमणिका

सार-संकलन

सार्वभौमत्वाच्या अंतर्गत मर्यादा

घटनेप्रमाणे भारतीय संघराज्य हे सार्वभौम, इहवादी (सेक्युलर) प्रजासत्ताक आहे. हे अंतर्गत सार्वभौमत्व हा उपचार आहे की वस्तुस्थिती आहे ? घटनेला अनुसरून प्रस्थापित झालेले कायदेशीर सरकार, कायदा व सुव्यवस्था यांचे पालन करण्याचे आपले मूलभूत कर्तव्य पार पाडण्यासाठीही जेथे पोचू शकत नाही अशी काही ठिकाणे ह्या देशातच आहेत का ? ह्या ठिकाणांच्या हद्दीवर संघराज्याचे सार्वभौमत्व संपते आणि देशातल्या देशातच दुसऱ्या सार्वभौम सत्तेचा अधिकार सुरू होतो असे आहे का ?

एप्रिल २५ रोजी श्री. अवतारसिंग अटवाल, डेप्युटी इन्स्पेक्टर-जनरल ऑफ पोलिस (जुलुंदर रेंज) यांचा अमृतसर येथील सुवर्णमंदिराच्या प्रवेशद्वाराजवळ गोळ्या घालून खून करण्यात आला. श्री. अटवाल हे गणवेशात नव्हते, नागरी पोषाखात होते. त्यांनी मंदिरात जाऊन प्रार्थना केली. ते मंदिरात एकटे गेले. त्यांच्या सोबत असलेला त्यांचा शरीररक्षक आणि चार शिपाई बाहेर गाडीत बसून राहिले होते. हे अर्थात योग्यच होते. मंदिरात ऐहिक वैभव आणि जामानिमा सोबत घेऊन प्रवेश करायचा नसतो. आपल्या संरक्षणाची तजवीज करायची नसते. सारा भार त्यावेळी तरी देवावर असतो. भक्तांच्या मेळाव्यात अभय असते.

श्री. अटवाल प्रार्थना आटोपून बाहेर पडले असताना मारेकरी मंदिरातून त्यांच्या मागोमाग आला असावा. स्टेनगनमधून त्यांच्यावर गोळ्या झाडून शिरोमणि गुरुद्वार प्रबंधक समितीच्या इमारतींच्या दिशेने तो पळून गेला.

संत जर्नैलसिंग भिंद्रनवाले यांनी, हा अत्याचार पंजाब सरकारने घडवून आणला आहे आणि अकाली आंदोलनाला शह देणे व शिखांची नालस्ती करणे हा त्याचा उद्देश आहे असे जाहीर केले.

एप्रिल २७ रोजी लोकसभेत झालेल्या चर्चेत गृहमंत्री श्री. प्रकाशचंद्र सेठी यांनी अकाली दल आणि शिरोमणी गुरुद्वार प्रबंधक समिती यांना असे आवाहन केले, की त्यांनी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून सुवर्णमंदिराच्या परिसरात एका उच्च पोलिस अधिकाऱ्याच्या झालेल्या ह्या खुनात सहभागी असलेले गुन्हेगार पोलिसांच्या स्वाधीन होतील अशी पक्की तजवीज त्यांनी करावी. शीख जमातीतील अतिरेकी घटकांविरुद्ध पंजाब सरकारने परिणामकारक कारवाई केलेली नाही ह्या आरोपाचा इन्कार करताना पंजाब सरकारने ‘ दल खालसा ’ तसेच ‘ खलिस्तान राष्ट्रीय मंडळ ’ ह्या बेकायदेशीर संघटना आहेत असे जाहीर केले आहे ह्या गोष्टीचे उदाहरण त्यांनी दिले. तसेच, ह्या मंडळाचा वरिष्ठ सचिव म्हणून स्वतःला म्हणवून घेणारे व पाच फौजदारी खटल्यांत गुंतलेले श्री. बलवीरसिंग सांडू हे ‘ घोषित गुन्हेगार ’ आहेत असे पंजाब सरकारने जाहीर केले आहे ह्याचाही त्यांनी उल्लेख केला.

पण एप्रिल २५ ह्या दिवशीच श्री. बलवीरसिंग सांडू यांनी असोसिएटेड प्रेसला दिलेल्या मुलाखतीत ‘ भारतापासून स्वतंत्र होण्यासाठी शिखांना अपरिहार्यपणे स्वातंत्र्ययुद्ध लढावे लागेल ’ असे विधान केले. ही मुलाखत त्यांनी सुवर्णमंदिराच्या प्रांगणातील गुरू नानक निवासात दिली. “ जेव्हा एखाद्या राष्ट्राला स्वतःचे सार्वभौमत्व प्रस्थापित करायचे असते तेव्हा रणभूमी हेच वाटाघाटींचे स्थळ असू शकते, प्रत्यक्ष लढाई अटळ आहे. शिखांना खूप त्याग करावे लागतील. ” असेही त्यांनी सांगितले.

मुलाखतीच्या वेळी खंजीर, तलवारी, बंदुका आणि काडतुसांच्या माळा धारण केलेले शीख रक्षक गुरू नानकनिवासातील दालनांत पहारा करीत होते. गृहमंत्री सेठी यांनी अलीकडे संसदेत केलेल्या एका भाषणात अकाली पुढाऱ्यांना, त्यांनी श्री. सांडू यांना सरकारच्या हवाली करावे अशी विनंती

अनुक्रमणिका

केली होती. पण अकाली दलाचे अध्यक्ष श्री. हरचंदसिंग लोंगोवाल यांनी 'आपण श्री. सांडू यांना कधी पाहिलेलेही नाही व म्हणून, त्यांना सरकारच्या हवाली करण्याचा प्रश्नच उपस्थित होत नाही' असे जाहीर केले. अ. प्रे. च्या बातमीदाराने श्री. लोंगोवाल व त्यांच्या शेजारच्या इमारतीत राहत असलेले सांडू या दोघांची पाच मिनिटांच्या अंतराने मुलाखत घेतली होती. शिरोमणि गुरुद्वार प्रबंधक समितीचे सचिव श्री. मानसिंग यांनी केलेल्या निवेदनात 'आमचा एक अधिकारी श्री. सांडू यांच्याविषयी माहिती गोळा करीत आहे व त्याचा अहवाल येण्याची आम्ही वाट पाहत आहोत' असे म्हटले आहे. उलट, श्री. सांडू यांनी असे जाहीर केले, की 'आपल्याला सरकारच्या हवाली केले तरी त्याने काही बिघडणार नाही. कारण खलिस्तानचे मुख्य केंद्र– हेडक्वॉर्टर्स– भूमिगत आहे व ते चंदीगड येथे आहे.

एप्रिल २८ रोजी राज्यसभेतील लक्षवेधी सूचनेच्या प्रसंगी बोलताना गृहमंत्री श्री. सेठी यांनी सुवर्णमंदिरातील शि. गु. प्र. समितीच्या अधिकारीवर्गाला श्री. अटवाल यांच्या मारेकऱ्याला सरकारच्या हवाली करण्यासाठी एका आठवड्याची मुदत दिली. ह्या मुदतीत जर मारेकऱ्याला सरकारच्या स्वाधीन करण्यात आले नाही, तर सरकार कडक कारवाई करील असा इशारा त्यांनी दिला. वारंवार विनंती करूनही श्री. सांडू यांना सरकारच्या स्वाधीन करण्यात आलेले नाही ह्याबद्दल त्यांनी खेद व्यक्त केला. सुवर्णमंदिराच्या परिसरात आश्रय घेतलेल्या गुन्हेगारांविषयी पंजाब सरकारने शि. गु. प्र. समितीला एक रजिस्टर्ड पत्र पाठविले होते; पण ते परत करण्यात आले असे श्री. सेठी यांनी सांगितले. पोलिसांना प्रार्थनामंदिरात प्रवेश करायला परवानगी न देऊन पंजाब सरकारने शिख जमातीच्या धार्मिक भावनांचा आदर केला आहे; पण त्याला शि. गु. प्र. समितीने योग्य तो प्रतिसाद दिला नाही असा खेद त्यांनी व्यक्त केला.

ह्यावर अकाली दलाचे अध्यक्ष संत लोंगोवाल यांनी आपल्या अनुयायांना, पोलिसांच्या सुवर्णमंदिरात होणाऱ्या प्रवेशाला प्रतिकार करण्यासाठी, सर्वोच्च आत्मत्यागाला त्यांनी सिद्ध व्हावे असे आवाहन केले. संत भिंद्रनवाले यांनी पोलिसांनी सुवर्णमंदिरात प्रवेश केला तर शिखविरोधी शक्तींचा नायनाट करण्यासाठी सैन्य व पोलिसदल यांतील धरून सर्व शिखांनी सिद्ध व्हावे असे आवाहन केले. "आम्ही आतापर्यंत शांतता राखली आहे आणि आमची तसेच करण्याची इच्छा आहे. पण सरकार आम्हाला वारंवार जे आव्हान देत आहे त्यामुळे आम्ही हा पवित्रा धारण करीत आहोत" असे उद्गार त्यांनी काढले. (पोलिसांबरोबर मानावाला येथे मार्च १६ रोजी झालेल्या एका चकमकीत संत भिंद्रनवाले यांचा एक अनुयायी ठार झाला होता व त्याचा सूड म्हणून श्री. अटवाल यांची हत्या करण्यात आली असावी असा केंद्रीय गुप्तचर विभागाच्या तपास पथकाचा तर्क आहे.)

गृहमंत्री श्री. सेठी यांनी शि. गु. प्र. समितीला निर्वाणीचा आदेश–अल्टिमेटम– दिला या स्वरूपात त्यांनी राज्यसभेत केलेल्या निवेदनाला वर्तमानपत्रांतून प्रसिद्धी देण्यात आली. तेव्हा एप्रिल २९ रोजी श्री. सेठी यांनी असा निर्वाणीचा आदेश अकाली दलाला किंवा शि. गु. प्र. समितीला दिलेला नाही असा खुलासा गृह-राज्यमंत्री श्री. वेंकटसुबिय्या यांनी केला. श्री. सेठी यांनी मनमिळावू शब्दांचा (कन्सिलिएटरी) वापर केला होता असे त्यांनी सांगितले. श्री. सेठी यांनी वापरलेली भाषा अशी होती, "आम्ही त्यांना (शि. गु. प्र. समितीला) असे सांगितले आहे, की ह्या प्रकारची माणसे त्यांनी एका आठवड्यात आमच्या हवाली करावी. हे जर करण्यात आले नाही तर त्यांचा ताबा घेण्यासाठी पावले उचलणे आम्हाला भाग पडेल", तसेच "आम्ही त्यांना (अकाली, शि. गु. प्र. समिती) असेही सांगितले आहे की, हे (गुन्हेगाराला हवाली करण्याची कारवाई) जर करण्यात आले नाही तर कठोर (ड्रॅस्टिक) उपाय योजण्यावाचून आम्हाला गत्यंतर उरणार नाही."

राष्ट्रीय एकतेच्या दृष्टीने राष्ट्राच्या सरहद्दीवरील राज्यात अशी गंभीर परिस्थिती निर्माण झाली असताना जबाबदार राजकारणी काय करीत होते? श्री. जॉर्ज फर्नांडिस यांनी बंगलोर येथे दिलेल्या मुलाखतीत असे विधान केले, की "सरकारने

सुवर्णमंदिराच्या अधिकारीवर्गाला पाठविलेल्या निर्वाणीच्या खलित्यावरून हे दिसून येते, की पंजाबच्या प्रश्नाच्या बाबतीत सरकारचे भान नाहीसे झाले आहे. ह्या निर्वाणीच्या खलित्यात पोलिसदल सुवर्णमंदिरात शिरेल असे अभिप्रेत आहे हे स्पष्ट आहे." श्रीमती इंदिरा गांधी यांनी राजीनामा द्यावा आणि संसदेसाठी मध्यावधी निवडणूक घेण्यात यावी अशी मागणी श्री. फर्नांडिस यांनी केली. कारण कॉं. (इं.) पक्षाला देशावर राज्य करण्याचा लोकांपासून मिळालेला अधिकार आता संपुष्टात आला आहे असे त्यांचे म्हणणे पडले. ह्याच वेळी पंजाब मंत्रिमंडळात अलीकडे निर्माण झालेला 'पेचप्रसंग' अधिकच तीव्र झाला आहे. मंत्रिमंडळातील पाच बंडखोर मंत्र्यांकडे महत्त्वाच्या फायली धाडू नयेत असा आदेश मुख्यमंत्र्यांनी मुख्य सचिवाकरवी मंत्र्यांच्या निजी सचिवांना दिला आहे.

ह्या एकंदर परिस्थितीत धार्मिक वृत्तीच्या भारतीय नागरिकांची मती गुंग करणारा प्रश्न असा, की प्रार्थनामंदिरांचे पावित्र्य नेमके कशामुळे गढुळले जाते ?

देशाची अब्रू

आज जगातील कित्येक देशांत निरपराध नागरिकांची राजकीय कारणासाठी हत्या करण्यात येते, हे हत्याकांड या देशातील खुद्द सरकारच करीत असते किंवा त्यात सरकारचा सहभाग किंवा त्याला सरकारचा पाठिंबा असतो असा आरोप कित्येक जबाबदार आंतरराष्ट्रीय संघटनांकडून होत असतो. अशा सतरा देशांची नामावळी देऊन त्यांचा निषेध करणारा ठराव ब्रिटिश हाउस ऑफ् कॉमन्समध्ये येणार आहे आणि ह्या नामावळीत भारताचा निर्देश करण्यात आला आहे अशी बातमी जेव्हा अलीकडे येऊन थडकली, तेव्हा संसदेतील अनेक लोकप्रतिनिधींनी तीव्र संताप व्यक्त केला. हे योग्यच होते. एक तर ब्रिटिशांचे इतिहासातील वर्तन किंवा त्यांचे आजचे, ब्रिटनमधील अन्यवंशीयांविषयीचे वर्तन सार्वत्रिक मानवी हक्कांचा आदर करणारे होते असे म्हणणे टिकणारे नाही. शिवाय भारतात लोकशाही राज्यघटनेवर आधारलेले कायद्याचे राज्य आहे. भारत स्वतंत्र झाल्याबद्दल ब्रिटिशांनी भारताला कधीही मनापासून क्षमा केलेली नाही ह्याच्या खुणा त्यांच्या बोलण्या-वागण्यातून मिळत असतात. त्यांतील ही एक खूण.

पण तरीही भारतात जे कायद्याचे राज्य चालू आहे त्याच्याकडे लोकप्रतिनिधींनी व सर्वसामान्य लोकांनीही अधिक लक्ष देणे इष्ट ठरेल. मार्च १४ रोजी प्रसिद्ध झालेली एक बातमी अशी आहे : मध्यप्रदेश राज्यातील बिलासपूर जिल्ह्यातील कोर्बा ह्या आदिवासींच्या गावी एका खुनाच्या तपासाच्या निमित्ताने गेलेल्या पोलीसपार्टीने सबंध गावालाच ताब्यात घेतले. त्यांनी दिसेल त्याला मारहाण केली; मुलेबाळे, म्हातारी कोतारी सोडली नाहीत; अनेक गावकऱ्यांचा शारीरिक छळ केला. स्त्रियांचे कपडे फेडले, दोन गावकऱ्यांची त्यांना नागडे करून धिंड काढली आणि त्यांना अभद्र कृती करायला भाग पाडले. कायद्याचे रक्षक गावकऱ्यांचा करीत असलेला हा छळ पाच दिवस चालला होता. सरतेशेवटी गावकऱ्यांकडून १३,५४९ रुपये वसूल करून पोलीसपार्टी निघून गेली. ही रक्कम उभी करण्यासाठी कुणाला जमीन विकावी लागली, कुणी सायकल, भांडीकुंडी, दागदागिने विकले आणि कित्येकांना जबर व्याजाने कर्ज काढावे लागले. जाताना पोलिसांनी गावकऱ्यांना धमकी दिली, की तुम्ही कुणापाशी तक्रार केली तर त्याची फळे तुम्हालाच भोगावी लागतील.

ही बातमी जेव्हा बाहेर फुटली तेव्हा बिलासपूरच्या पोलिस सुपरिन्टेन्डेन्टने कोर्बा येथील इन्स्पेक्टर आणि एक पोलीस शिपाई यांना निलंबित केले. मुख्यमंत्री श्री. अर्जुनसिंग यांनी या साऱ्या प्रकाराची मॅजिस्ट्रेटकडून चौकशी करण्यात येईल असे आश्वासन दिले. यानंतर पाच दिवसांनी आलेल्या बातमीत असे म्हटले आहे, की शारीरिक छळ करणे आणि पैसे उकळणे हे गंभीर स्वरूपाचे गुन्हे असले, तरी वरील प्रकारात भाग घेतलेल्या पोलिसांवर कोणतीही फौजदारी कारवाई करण्यात आलेली नाही. सुमारे सहा पोलिस ह्या प्रसंगात सहभागी होते. फक्त दोघांना निलंबित करण्यात आले आहे. उरलेले अजून ह्या विभागात कामावर आहेत व गणवेशात वावरत आहेत. मुख्यमंत्र्यांनी मॅजिस्ट्रेटकडून चौकशी होईल असे आश्वासन दिले होते; पण चौकशी होण्याची काही चिन्हे दिसत नाहीत.

हा प्रसंग नर्मदेच्या उत्तरेला घडला. नर्मदेच्या दक्षिणेला तामिळनाडू राज्यातील उत्तर अर्काट आणि धरमपुरी जिल्ह्यांत कायदा आणि सुव्यवस्था यांचे रक्षण करण्यासाठी पोलीस काय करतात याचा काही तपशील असा : येथे कायदा आणि सुव्यवस्था यांना मुख्यतः 'नक्षलवादी' तरुणांकडून धोका निर्माण झाला आहे. हे दोन्ही मागासलेले जिल्हे आहेत. शेतमजुरांना येथे दिवसाला दोन ते चार रुपये मजुरी मिळते. कायद्याने जे किमान वेतन लागू केले आहे त्याहून हे खूपच कमी आहे. शिवाय या जिल्ह्यात कर्ज फेडण्यासाठी कर्जदारांना बंदे-मजूर म्हणून राबविण्याची प्रथा अजून चालू आहे. जेव्हा लोक संघटित होऊन या प्रथांविरुद्ध दहशतीच्या मार्गाचा अवलंब करतात, त्यांची धरपकड करतात, शारीरिक छळ करतात आणि प्रसंगी त्यांना ठार मारतात. गतवर्षी पोलिसांबरोबर झालेल्या अशा सामन्यात २३ लोक बळी गेले. अशा सामन्यांतून जे मृत्यू ओढवले आहेत त्यांची चौकशी करावी, ह्या जिल्ह्यांत ठेवण्यात आलेल्या खास पोलीस व सशस्त्र पोलीस यांच्या तुकड्या मागे घ्याव्या आणि पोलीस ठाण्यातून बेपत्ता झालेल्या माणसांचा शोध घ्यावा अशा मागण्या जनता नागरी हक्क संघ– पीपल्स युनियन फॉर सिव्हिल लिबर्टीज– या संघटनेने केल्या आहेत.

पण या संघटनेकडे जमीनदारांकडूनही निवेदने आली आहेत. त्यांच्यात साम्यवादी कार्यकर्ते चोऱ्या व खून करतात अशा तक्रारी करण्यात आल्या आहेत आणि पोलिस जी कामगिरी बजावीत आहेत, त्याची प्रशंसा करण्यात आली आहे.

पोलिसांची एक कामगिरी अशी : उथनागिरी येथे गेल्या वर्षी जो गोळीबार झाला त्यापूर्वी पोलिसांनी आजूबाजूच्या घरांना दिवे मालवा आणि दारे-खिडक्या बंद करा असा हुकूम फर्मावला होता. दाट काळोखी, अरुंद रस्त्यात अडकलेल्या माणसांना पळून जायला वाटच मोकळी नव्हती. पोलिसांच्या गोळ्यांना ते सहज बळी पडले.

कायदा व सुव्यवस्था प्रस्थापित करण्याच्या ह्या कारवाईचे जे बळी ठरतात त्यांत दलित व्यक्ती बहुसंख्य असतात. गेल्या वर्षी पोलिसांबरोबर झालेल्या सामन्यांत जे २३ लोक ठार झाले, त्यांतील १२ दलित होते.

समाजविरोधी घटकाना दडपून टाकण्यासाठी आवश्यक ती सर्व ताकद वापरा; असे करताना वर्तमानपत्रांतून किंवा अन्य कुठून टीका होईल अशी फिकीर करू नका असे प्रोत्साहन तामीळनाडूचे मुख्यमंत्री श्री. एम्. जी. रामचंद्र यांनी दिले आहे. श्री. वॉल्टर, देवराम, डी. आय्. जी. यांच्या नेतृत्वाखालील पोलिसांनी 'नक्षलवाद्यां'-कडून भयग्रस्त झालेल्या प्रदेशात जी कारवाई केली तिच्याबद्दल तामीळनाडूच्या शासनाने त्यांना पारितोषिक दिले आहे.

अभिप्रेत ताकद वापरण्यात येत आहे आणि कारवाई सुरू आहे. आज पोलिस कॉन्स्टेबल कुठल्याही घरांत शिरून बायकांना दमदाटी करू शकतो, कोंबडी–बकऱ्या पळवू शकतो आणि कुणी विरोध केला तर त्याचा बिमोड करतो.

वरिष्ठ न्यायालयाचा निर्णय असा आहे, की "जर पोलिसांनी वॉरंटाशिवाय एखाद्या माणसाला पकडले तर त्यांनी ज्या कारणांसाठी त्याला धरले आहे ती त्याला ताबडतोब सांगितली पाहिजेत ... आणि जामिनावर सुटण्यासाठी अर्ज करण्याचा हक्क त्याला आहे ही माहिती त्याला ताबडतोब दिली पाहिजे. अशा प्रकारची धरपकड झाली आहे ह्या गोष्टीची माहिती पोलिसांनी सर्वांत जवळच्या कायदा साहाय्य समितीला ताबडतोब दिली पाहिजे." पण प्रत्यक्षात काय घडते ते असे : "श्रीमती अ. स. (वय १९) या मुलीला चोरीच्या आरोपावरून पकडण्यात आले. तिला दादर लॉक–अपमध्ये दोन महिने ठेवण्यात आले. ह्या अवधीत तिला चारदा मारहाण करण्यात आली. प्रत्येक सुनावणीनंतर तिला पकडून ठेवण्यात येत असे आणि आठवड्याच्या शेवटच्या दोन दिवसांत तिला मारण्यात येत असे. तिला टेबलावर उपडी झोपायला लावून तिच्या तळव्यावर बांबूने मारण्यात येत असे. तिचे हात खिडकीला बांधून तिला ठोक देण्यात येत असे." (ही हकीगत कॉलेज ऑफ् सोशल वर्क, मुंबई या संस्थेच्या चार प्राध्यापकांच्या चौकशी समितीने नमूद केली आहे.) ह्या घटना अपवादात्मक नाहीत. त्या नियमाने होतात. सुसंस्कृत समाज घडविण्यासाठी आपल्याला खूपच वाटचाल करावी लागेल.

अनुक्रमणिका

REGD. NO. SAT 29

हे मासिक श्री. ग. दीक्षित यांनी दी प्राज्ञ प्रेस, ३१५ गंगापुरी, वाई येथे छापून
मे. पुं. रेगे यांनी प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई यांच्याकरिता तेथेच प्रसिद्ध केले.